





# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार १७ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







## महिला आरक्षणावर पंतप्रधान मोदींचा विरोधकांना मैत्रीपूर्ण सल्ला

# विरोध करून स्वतःचे नुकसान करू नका





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संसदेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी केंद्र सरकारने नारी शक्ती वंदन अधिनियम (महिला आरक्षण) लागू करण्यासाठी तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. या अधिवेशनात एकूण तीन विधेयके सादर केली जाणार आहेत. महिला आरक्षण आणि लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेमुळे उत्तर आणि दक्षिण भारतात मोठे अंतर निर्माण होईल, असा आरोप विरोधक करत आहेत. लोकसभेत सादर करण्यात आलेली तीन विधेयके आणि महिला आरक्षण विधेयकाद्वारे कोणताही दुजाभाव किंवा अन्याय होणार नाही, असे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात दिले. तसेच या विधेयकामुळे कोणत्याही एका पक्षाचा लाभ होणार नाही, असेही ते म्हणाले. तुम्ही माझा विरोध करत असाल तर आमचा राजकीय फायदा होईल, पण तुम्ही आम्हाला पाठिंबा दिल्यास कुणाचाही लाभ होणार नाही, असेही पंतप्रधान मोदी यांनी यावेळी म्हटले.

### नारी शक्ती वंदन विधेयक संसदेच्या विशेष अधिवेशनात लोकसभेमध्ये सादर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव आणि द्रमुक पक्षावर उपरोधिक टीका केली. या दोघांनीही या विधेयकाला विरोध केला आहे. द्रमुक पक्षाने काळ्या रंगाचे कपडे परिधान करून विधेयकाचा विरोध केला. यावर बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, यांनी विधेयकाला काळा टिळा लावून विधेयकाला वाईट नजरेपासून वाचवले आहे.

महिला आरक्षण विधेयकाचे समर्थन करत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले की, राजकीय पक्षांनी या विधेयकाला राजकीय रंग देउ नये, असे आवाहन केले. सभागृहात महिलांना आरक्षण देण्याच्या विधेयकाला राजकीय रंग देण्याची गरज नाही, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.पंतप्रधान मोदींनी सर्व सदस्यांना इशारा दिला की, जे लोक आज महिला आरक्षण विधेयकाला विरोध करतील, त्यांना पुढे मोठी किंमत मोजावी लागेल. महिलांना आरक्षण देण्याची ही संधी सर्व खासदारांनी गमावू नये.विरोधकांना संदेश देताना पंतप्रधान मोदी म्हणाले, जर तुम्ही माझा विरोध केला, तर साहजिकच याचा राजकीय लाभ मला मिळेल. पण जर तुम्ही आम्हाला पाठिंबा दिला तर कुणालाही याचा लाभ होणार नाही. तसेच या विधेयकाचे श्रेय आम्हाला नको आहे, जर तुम्हाला (विरोधकांना) याचे श्रेय घ्यायचे असेल तर मी यासाठी तयार आहे. समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यावर टीका करत असताना पंतप्रधान मोदी म्हणाले, अखिलेशजी माझे मित्र आहेत. त्यामुळे ते अधूनमधून मला पाठिंबा देतात. हे खरे आहे की, मी मागासवर्गीय समाजातून आलो आहे, पण सर्वांना बरोबर घेउन जाणे, ही माझी जबाबदारी आहे. आम्हाला विकसित भारत ही संकल्पना सत्यात आणायची आहे. यासाठी धोरणनिर्मितीमध्ये सबका साथ, सबका विकास हे सूत्र असायला हवे. त्यामुळेच देशातील ५० टक्के लोकसंख्येचा भाग असलेल्यांना धोरणनिर्मितीमध्ये घेणे काळाची गरज आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

महिला आरक्षण विधेयक हे कुणावरही अन्याय किंवा दुजाभाव करणार नाही, ही माझी गॅरंटी आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले. याला तुम्ही गॅरंटी म्हणा, आश्वासन म्हणा किंवा कोणत्याही राज्यातील भाषेत असलेला शब्द वापरा. आमची भावना प्रामाणिक असून या विधेयकाचा लाभ कोणत्याही एका पक्षाला होणार नाही.

पंतप्रधान मोदी म्हणाले, विरोधकांना मी एक मैत्रीपूर्ण सल्ला देउ इच्छितो. देशात जेव्हापासून महिला आरक्षणाची चर्चा सुरू झाली, तेव्हापासून महिलांना मिळणा-या या अधिकाराचा ज्यांनी ज्यांनी विरोध केला, त्यांना देशातील महिलांनी निवडणुकांमध्ये माफ केलेले नाही.आपण खासदारांनी ही महत्त्वाची संधी हातातून जाउ देउ नये. आपण भारतीय एकत्र येउन देशाला नवी दिशा देणार आहोत. शासनप्रणालीत संवेदनशीलता रुजविण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाउल आहे. यामुळे देशाच्या राजकारणाला एक नवा आकार मिळणार आहेच, त्याशिवाय देशाची दिशा आणि स्थितीही निश्चित होईल, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

## दुबे म्हणाले -आदित्य ठाकरेंनी केली हिरोईनची हत्या

### अरविंद सावंत अन् सुळे संतापल्या



**नवी दिल्ली :** अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी महिला आरक्षणाच्या विधेयकावरून मोदींचे लोकसभेत भाषण झाले आहे. परंतु, या चर्चेमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांचे भाषण सुरू असताना भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी थेट आमदार आदित्य ठाकरेंचे नाव घेत त्यांनी हिरोईनची (अभिनेत्रीची) हत्या केली असल्याचे वादग्रस्त विधान केल्याने आता नव्या वादाला तोंड फुटले आहे.

संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक २०२६ जे महिला आरक्षण लागू करण्यासाठी आहे, त्यावर लोकसभेत चर्चा सुरू आहे. अधिवेशाच्या पहिल्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला आरक्षणाच्या विधेयकावर भाषण केले. यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी आरक्षणाच्या विधेयकाला पाठिंबा देत त्यातील परिसीमन विधेयकाला विरोध केला. यावेळी त्यांनी महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून जोरदार भाषण करत सत्ताधा-यांना खडेबोल सुनावले. महाराष्ट्रातील कर्तृत्ववान महिलांची नावे सांगत यावेळी सावंत यांनी महिलांचा गौरव केला. मात्र, या भाषणात त्यांनी सत्ताधारी नेतेमंडळी कशा प्रकारे महिलांचा अपमान करतात, याचे काही दाखले दिले.खासदार अरविंद सावंत यांनी त्यांच्या भाषणात कुलदीप सेंगर कोण आहे? कोणत्या पक्षातील आहे? असे प्रश्न उपस्थित केले. तसेच, बृजभूषण सिंहलाही विसरू नका, हे महिलांचे सन्मान करणारे लोक आहेत का? असाही प्रश्न उपस्थित केला. ज्यानंतर सत्ताधा-यांनी गोंधळ घातला. मात्र, बलात्कारी तुम्हाला इतके प्रिय आहेत का? असा सवाल विचारत अरविंद सावंत यांनी सत्ताधा-यांना डिवचले. त्या व्यक्तीचे नाव रेकार्डवर येउद्यात. मी जे बोललो तो आरोप सिद्ध झाला आहे, असेही यावेळी सावंत यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले. ज्यानंतर भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी सावंत यांना प्रत्युत्तर उत्तर देताना म्हटले की, जर हे कुलदीप सेंगर आणि बृजभूषण सिंह यांच्याबद्दल बोलणार असतील तर आदित्य ठाकरेंचाही विषय निघणार. कारण, त्यांनीही हिरोईनला मारून टाकले आहे, असे वादग्रस्त विधान निशिकांत दुबे यांनी केले. खासदार दुबे यांनी केलेल्या विधानावरून खासदार अरविंद सावंत यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे आणि विरोधकांमधील अन्य खासदार आक्रमक झाले. सेंगर तुरुंगात गेले होते. परंतु, आदित्य ठाकरेंबाबत असं बोलण्याचा त्यांना अधिकार नाही. त्यामुळे निशिकांत दुबे यांनी केलेल्या विधानावरून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी खासदार अरविंद सावंत यांनी केली. तर, दुबे अशा पद्धतीचे विधान करू शकत नाही. ते आदित्य ठाकरेंचे नाव घेउ शकत नाही, असे म्हणत खासदार सुप्रिया सुळे आक्रमक झाल्याच्या पाहायला मिळाल्या. यामुळे लोकसभेत गोंधळाचे वातावरण झाले होते.

## वारंवार दिशाभूल करणा-या पुरुषांना स्त्रिया लगेच ओळखतात

### प्रियंका गांधींचा पंतप्रधानांना टोला

**नवी दिल्ली :** लोकसभेत आज (१६ एप्रिल) महिला आरक्षण सुधारणा विधेयकावर चर्चा सुरू आहे. या चर्चेत सहभागी होताना काँग्रेस खासदार सोनिया गांधी वाड्रा यांनी स्पष्ट केले की, महिला आरक्षणाचा मुद्दा सर्वप्रथम



काँग्रेस पक्षानेच उपस्थित केला होता. राजीव गांधी यांनी महिला आरक्षणासंदर्भात ठराव मांडला होता आणि भाजपने त्याला विरोध केला होता. अशी आठवण करून देताना प्रियंका गांधी वाड्रा यांनी स्पष्ट केले की, आम्ही महिला आरक्षणाचे समर्थन करत असलो तरी, त्याच्या नावाखाली राबवल्या जाणा-या परिसीमन विधेयकाला आमचा विरोध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु वारंवार दिशाभूल करण्याचा प्रयत्न करणा-या पुरुषांना स्त्रिया लगेच ओळखतात, असा टोलाही त्यांनी लगावला. पंतप्रधान मोदी घाबरत आहेत कारण नवीन जनगणनेमुळे ओबीसींची प्रत्यक्ष लोकसंख्या समोर येईल आणि त्यामुळे त्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देणे अनिवार्य ठरेल. त्यामुळे हे सुधारणा विधेयक घाईघाईने मांडून आणि ते २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीवर आधारित ठेवून पंतप्रधान मोदी ओबीसी समाजाला त्यांच्या न्याय हक्कांपासून वंचित ठेवत आहेत. याच कारणामुळे मी या तिन्ही विधेयकांचा तीव्र विरोध करते. कारण या तिन्ही विधेयकांना वरूनवरून पाहिले तर विधेयकाच्या मसुद्यात कोणत्याही त्रुटी दिसत नाही. मात्र या प्रकरणाचा मूळ गाभा परिसीमन प्रक्रियेमध्ये दडलेला आहे. या विधेयकाचे कोणतेही राजकीय श्रेय घेण्याची सरकारची इच्छा नसल्याचा दावा सरकार करत असले तरी, वारंवार दिशाभूल करण्याचा प्रयत्न करणा-या पुरुषांना स्त्रिया लगेच ओळखतात. त्यामुळे सावध राहा, अन्यथा तुमचा खरा चेहरा उघड होईल, असा टोला त्यांनी मोदींना लगावला.

## विधेयकाला नाही, अंमलबजावणीच्या पद्धतीला आमचा विरोध

**नवी दिल्ली :** महिला आरक्षण लागू करण्यासाठी आजपासून (१६ एप्रिल) संसदेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत महिला आरक्षण कायदा लागू करण्याच्या उद्देशाने आज संसदेत नारी शक्ती अधिनियम मांडण्यात आले. या विधेयकावर पुढील दोन दिवस चर्चा होणार आहे. याव्यतिरिक्त, केंद्र सरकार या विशेष अधिवेशनात आणखी दोन विधेयके सादर करणार आहे. एक विधेयक लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांची संख्या वाढवण्याचा प्रस्ताव आहे, तर दुसरे विधेयक राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या विधान मंडळांमध्ये जागांच्या वाढीसह महिला आरक्षण लागू करण्याचा प्रस्ताव आहे. मात्र महिला आरक्षणाला समर्थन करताना विरोधक विधान मंडळांमध्ये जागांच्या वाढीसह महिला आरक्षण लागू करण्याचा प्रस्तावाला विरोधक करताना दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनीही लोकसभेत मराठीत भाषण करून भाजप सरकारवर जोरदार टीका केली आहे.

अमोल कोल्हे म्हणाले की, आज मी मुद्दाम डोक्यावर फुले पगडी घालून आलेलो आहे. कारण जेव्हा ढोल गंवार शूद्र नारी सब के अधिकारी हे ब्रह्मवाक्य मानलं जात होतं, तेव्हा स्त्री स्वातंर्त्याचा, स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे पहिले समाज सुधारक कोण होते, तर ते महात्मा ज्योतिराव फुले होते. जेव्हा पूर्ण चेहरा झाकला जाईल असा घुंगट ओढून चूल आणि मूल यापर्यंतच महिलेला राखून ठेवलं जात होतं, तिला बंधनात ठेवलं जात होतं, माणूस म्हणून सुद्धा जगण्याचा अधिकार नाकारला जात होता. तेव्हा ज्यांनी उंबरठा ओलांडला, शेणगारा सोसला, पण स्त्रीला अक्षरांची ओळख करून दिली, तिला तिच्या स्त्रीत्त्वाची जाणीव करून दिली, त्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या फुले दांपत्याचं फार मोठे योगदान या संपूर्ण प्रवासात आहे. आज नारी शक्ती वंदन



### फुले पगडी घालून कोल्हेंचे मराठीत भाषण

अधिनियमाच्या अंमलबजावणीची चर्चा करत असताना महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करणं आपणा सर्वांच कर्तव्य आहे. पण त्याचवेळी त्यांच्या द्विजन्म शताब्दी वर्षातही अजूनही त्यांना भारतरत्न पुरस्कार आपण देउ शकलो नाही हे देशाचं दुर्दैव आहे.अमोल कोल्हे म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले तथागत भगवान गौतम बुद्ध आणि संत कबीर यांना गुरुस्थानी मानणा-या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे इंग्लंड अमेरिकेला जमलं नाही, ते करून दाखवलं आहे. संविधानाच्या अंमलबजावणीपासून पहिल्या दिवसापासून हा महिलांना मतदानाचा अधिकार दिला. ही नररत्न ज्या महाराष्ट्रत जन्मली त्या महाराष्ट्राचा मी मावळा आहे. या महाराष्ट्रत एक फार मोठा मातृत्वाचा, नेतृत्वाचा आणि कर्तृत्वाचा वसा आणि वारसा आहे. जो मातृत्वाचा वसा आणि वारसा आहे, तो राष्ट्रमाता जिजाउ मासाहेबांचा कर्तृत्वाचा वसा आणि वारसा क्रांतिज्योती सावित्रीबाई फुल्यांचा आणि नेतृत्वाचा वसा आणि वारसा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचा आहे आणि त्यामुळे या महिला आरक्षण विधेयकाला विरोध असण्याचं काही कारणच उद्भवत नाही. इतकच नाही तर देशात पहिल्यांदा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण देणार राज्य हे महाराष्ट्र होतं आणि तेव्हाचे मुख्यमंत्री होते ज्येष्ठ नेते शरद पवार होते. देशाला पहिलं महिला धोरण देणारे, संरक्षण दलात महिलांना नोकरीची संधी देणार, वडिलोपार्जित संपत्तीमध्ये सुद्धा महिलांना आरक्षण देणार शरद पवार होते आणि त्यामुळे या महिला आरक्षण विधेयकाला विरोध करण्याचा मुळीच प्रश्न नाही. जर कोण बोलत असेल आणि कोणाला वाटत असेल की ही गोष्ट करून आपण उपकार करत आहोत, तर त्यांना मी एवढंच सांगतो की, उपकार आपण करत नाही तर त्या मातेने आपल्याला जन्म दिला आहे आणि हे जग बघण्याची संधी आहे, हे तिचे आपल्यावर उपकार आहेत.

## खासदार, आमदार वाढतील तर पेन्शनचा भारही वाढेल

**मुंबई :** सध्या दिल्लीत संसदेचे विशेष अधिवेशन सुरु आहे. यापुढे देशभरात नव्याने होणारी जनगणना व त्या अनुषंगाने वाढणारे लोकसभा व विधानसभा क्षेत्र यांची संख्या, म्हणजेच मोठ्या प्रमाणात खासदार व आमदारांची संख्या वाढणार आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी आमदार राजू पाटील यांनी मोठी मागणी केली आहे. पेंशन योजना कायमची बंद करायला हवी, अशी मागणी राजू पाटील यांनी केली आहे. माजी खासदार व माजी आमदार यांना पेंशन देण्याचे काहीच कारण नसल्याचे राजू पाटील म्हणालेत. तसेच प्रामाणिक करदात्या नागरिकांच्या पैशांची ही नासाडी थांबवावी असेही पाटील म्हणालेत. सध्या दिल्लीत संसदेचे विशेष अधिवेशन सुरू आहे.

### नागरिकांच्या पैशांची नासाडी नको

### माजी आमदाराची मागणी

यापुढे देशभरात नव्याने होणारी जनगणना व त्या अनुषंगाने वाढणारे लोकसभा व विधानसभा क्षेत्र यांची संख्या, म्हणजेच मोठ्या प्रमाणात खासदार व आमदारांची संख्या वाढणार आहे. सध्या दिल्लीत संसदेचे विशेष अधिवेशन सुरू आहे. यापुढे देशभरात नव्याने होणारी जनगणना व त्या अनुषंगाने वाढणारे लोकसभा व विधानसभा क्षेत्र यांची संख्या, म्हणजेच मोठ्या प्रमाणात खासदार व आमदारांची संख्या वाढणार आहे. एकंदरीत आपल्या देशात माजी खासदार व माजी आमदार यांना दिल्या जाणा-या पेंशन व इतर सुविधांचा भार पण भविष्यात वाढतच जाणार आहे. खरंतर माजी खासदार व माजी आमदार (यात मी पण आलो. ) यांना पेंशन देण्याचे काहीच कारण नाही. प्रामाणिक करदात्या नागरिकांच्या पैशांची ही नासाडी थांबविण्यासाठी ही पेंशन योजना कायमची बंद करायला हवी. संसदेच्या विशेष अधिवेशनात याविषयावर पण चर्चा व्हायला हवी राजू पाटील म्हणाले. केंद्र सरकार २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघांची पुनर्रचना करून लोकसभा सदस्य संख्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याच्या विचारात आहे, ज्यामध्ये महाराष्ट्रातील खासदारांची संख्या ४८ वरून ७२ पर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

## अखिलेश म्हणाले- आम्हाला आधी जनगणना हवी

**नवी दिल्ली :** अखिलेश म्हणाले, 'हे लोक मागासलेल्या वर्गातील ३३ टक्के महिलांना त्यांचे हक्क देउ इच्छित नाहीत. जेव्हा मतदारसंघ पुनर्रचनेचा प्रश्न आला, तेव्हा त्यांनी केवळ याच लोकांना फायदा होईल असे क्षेत्र तयार करण्यासाठी एक संपूर्ण रणनीती आखली. त्यामुळे, आम्हाला हवे आहे की आधी जनगणना व्हावी आणि आकडेवारी उपलब्ध झाल्यानंतरच मतदारसंघ पुनर्रचना केली जावी. म्हणून, आमची मागणी आहे की जनगणनेत मागासलेल्या आणि मुस्लिम महिलांचा समावेश केला जावा, ज्या लोकसंख्येच्या निम्म्या



आहेत.'जेव्हा आम्ही महिला आरक्षणावर चर्चा करत आहोत, तेव्हा आमच्या अगदी शेजारी ४०,००० लोक रस्त्यावर उतरले आहेत. तिथे महिला आंदोलन करत आहेत. त्यांना न्याय मिळत नसल्यामुळे त्या तिथे आहेत.आम्ही महिला आरक्षणाचे समर्थन करतो, पण भाजपच्या षडयंत्राच्या विरोधात आहोत. देशातील सर्वाधिक लोकसंख्येच्या बाबतीत ते गप्प आहेत.जेव्हा आम्ही पंतप्रधानांना ऐकायचो, तेव्हा ते म्हणायचे की ते मागासलेल्या वर्गातून आले आहेत. पण घटनादुरुस्तीच्या नावाखाली ते जी घाई करत आहेत, ती जात जनगणना होउ नये यासाठी आहे.



सत्ताधारी आणि विरोधी पक्षांतील महिला खासदारांनी संसदेत फोटो काढले.

- लोकसभेत सादर झालेल्या तिन्ही विधेयकांवर १७ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता मतदान होणार आहे. त्यावर आज आणि उद्या चर्चा होईल.
- सभागृहातील चर्चेच्या तासांवर चर्चा सुरू आहे. सरकारने चर्चेसाठी १२ तासांची वेळमर्यादा निश्चित केली आहे.

## परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात आणखी ४ गजाआड

### ■ आतापर्यंत ८ आरोपी ताब्यात ■ पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांची माहिती



**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा येथील लैंगिक शोषण आणि आक्षेपार्ह चित्रफिती समाज माध्यमांवर प्रसारित केल्याप्रकरणी पोलिसांनी आणखी चार आरोपींना अटक केली आहे. त्यामुळे आतापर्यंत या प्रकरणात अटक झालेल्यांची संख्या आठवर पोहचली आहे. या प्रकरणी अद्याप पीडित मुली किंवा त्यांचे पालक तक्रारीसाठी समोर आलेले नाहीत, अशी माहिती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी आज गुरुवार १६ एप्रिल रोजी पत्रकारांशी बोलताना दिली. त्यांनी सांगितले की, ऐफाज खान मंजूर खान (वय २६), मोहम्मद इम्रान मोहम्मद साजिद (वय २१) आणि शेख नावेद शेख हसन (वय २१, तिघेही रा. अचलपूर) व मानव दीपक सुगंधे (वय २०, आर्वी ह.मु अमरावती) यांना अटक करण्यात आली आहे. राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या या प्रकरणात पहिली अटक ही १९ वर्षीय मुख्य आरोपी अयान अहमद याची झाली होती. त्यानंतर अश्लील चित्रफिती आणि छायाचित्रे समाज माध्यमांवर प्रसारित करणाऱ्या आणखी तीन आरोपींना बुधवारी पोलिसांनी अटक केली. तर हेच साहित्य एकमेकांना पुरविणाऱ्या आणखी चार जणांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या. त्यात येथील गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कठोरा मार्गावरील एका सदनिकेत भाड्याने राहणाऱ्या एका युवकाचाही समावेश आहे. त्याने ही सदनिका आरोपी अयान अहमद याला उपलब्ध करून दिली होती. पोलिसांनी या घटनास्थळाचा पंचनामा पूर्ण केला आहे.

**सदनिका उपलब्ध करून देणारा ताब्यात-** चौकशी दरम्यान आरोपी अयानने पीडित मुलींचे लैंगिक शोषण त्याच्या मित्राच्या सदनिकेवर केल्याची कबुली दिली होती. ही सदनिका पुरवणारा मित्र मानव दीपक सुगंधे (वय २०, रा. आर्वी, ह.मु. अमरावती) याला पोलिसांनी अटक केली आहे. तसेच इतर आरोपींकडून आक्षेपार्ह चित्रफिती प्राप्त करून त्या समाज माध्यमांवर प्रसारित करणारे आरोपी ऐफाज खान मंजूर खान (वय २६), मोहम्मद इम्रान मोहम्मद साजिद (वय २१) आणि शेख नावेद शेख हसन (वय २१) यांना देखील अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणात तांत्रिक तपासाच्या आधारे अश्लील छायाचित्रे आणि चित्रफिती एकमेकांकडे प्रसारित करणाऱ्यापैकी ऐफाज या आरोपीच्या घरझडतीतून लॅपटॉप, टॅब आणि हार्डडिस्क जप्त करण्यात आले आहेत आणि त्याची फॉरेन्सिक तज्ज्ञांकडून तपासणी करण्यात येणार आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षकांनी दिली.

**चित्रफिती प्रसरित करणारे एसआयटीच्या 'रडार'वर-** या गुन्ह्याच्या तपासात आतापर्यंत एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली असून आणखी आक्षेपार्ह चित्रफिती प्रसारित करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेण्यात येत आहे. गुन्ह्याची व्याप्ती आणि गांभीर्य पाहता सखोल तपास व्हावा, यासाठी सहायक पोलीस अधीक्षक शुभमकुमार यांच्या नेतृत्वात विशेष तपास पथक गठित करण्यात आले आहे. पथक इतर आरोपींचा शोध घेत आहे.

**अल्पसंख्याक आयोगाची टीम परतवाडयात-** प्रकरणाचे गांभीर्य पाहून अल्पसंख्यांक आयोगाची टीम परतवाडा येथे दाखल झाली आहे. आयोगाचे अध्यक्ष प्यारेखान यांचे ओएसडी मुस्ताक पठाण यांच्या नेतृत्वात ९ सदस्यीय टीम आली आहे. या टीम मध्ये तीन महिला अधिकाऱ्यांचा सहभाग आहे. एसआयटी प्रमुख शुभम कुमार व तपास अधिकारी पोलीस निरीक्षक सुरेश मस्के यांच्यासोबत टीमने चर्चा केली आणि प्रकरणाची विस्तृत माहिती दोन्ही अधिकाऱ्यांकडून घेतली आहे.



# १० वरिल उर्वरित

## नवसारी मार्गावरील फॉर्म हाऊसमध्ये

दलाच्या तीन वाहणाणे घटनास्थळावर पोहोचून दोन ते तीन तासाच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण आणले. तोपर्यंत बांबू आणि हॉटेल मधील साहित्य जळून २५ ते ३० लाखाचे नुकसान झाले होते. सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही. अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे यांच्या मार्गदर्शनात केंद्र प्रमुख प्रेमानंद सोनकांबळे , पाळी प्रमुख सुनील काकडे यांच्या आदेशाने नितीन इंगोले, कासम खान, शेखर कोल्हे ,सागर टपके, राजेश, गौरव फुके, राजेश गजबे, विकी उराळे, सागर माकोडे, निशांत राठोड, रोशन आरुडे, अतुल कपले यांनी आग नियंत्रणासाठी प्रयत्न केले.

## चाकू घेऊन दहशत पसरविणारा

मेन गेट समोर आरोपी चाकू घेऊन दहशत निर्माण करत आहे. यावरून पोलिसांनी तिथे कार्यवाही करून हर्षित प्रकाश नंदेश्वर याला चाकू सह ताब्यात घेतले. ४/२५ आर्म ॲक्ट,सहकलम १३५ अन्वये त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे ,सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईमच्या विजया पंधरे, समाधान वाठोरे यांच्या नेतृत्वात डीबी पथक प्रमुख उपनिरीक्षक सागर ठाकरे, भारत वानखडे, राजेश गुरेले, मतीन शेख ,सुशांत प्रधान, धनराज कुमरे ,अविनाश आत्राम, हिरासिंग साखरपवार यांनी केली.

## विहिंप पदाधिकाऱ्याचा महिलेवर

असे या आरोपीचे नाव असून तो विश्व हिंदू परिषदेचा अमरावती जिल्हा महामंत्री असल्याचे सांगितले जात आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाला आहे. माहिती नुसार आरोपीने ३६ वर्षीय पीडित महिलेला मध्यरात्री तिच्या मोबाईलवर वारंवार फोन केले. सविस्तर बोलायचे आहे, असे सांगून महिलेकडे शारीरिक सुखाची मागणी केली. त्यामुळे या महिलेला मोठा मानसिक धक्का बसला. दुसऱ्या दिवशी ही महिला आरोपीचे घर शोधत जेव्हा त्याच्याकडे पोहचली, तेव्हा महिलेने जाब विचारण्याचा प्रयत्न केला. एवढ्या रात्री फोन का केला, असे विचारले. आरोपीने त्यावेळी महिलेवर अत्याचाराचा प्रयत्न केला. पीडित महिलेने आरडाओरड केल्यानंतर या प्रकाराची वाच्यता केल्यास तुझ्या मुलाचे काही खरे नाही, असे सागून पीडित महिलेच्या मुलाला मारण्याची धमकी दिली.

आरोपी रुपेश राऊत हा विश्व हिंदू परिषदेचा जिल्हा महामंत्री असल्याचे सांगितले जात आहे. तो अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाच्या गुरूकुंज आश्रम येथील अध्यात्म संस्कार समितीचा सदस्य देखील आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केल्यानंतर तो फरार झाला आहे.

## धामणगाव मतदारसंघात कॉँग्रेसचे

काळात सामान्य माणसाचा आवाज बुलंद करण्यासाठी कार्यकर्त्यांनी बुथ स्तरावर सक्रिय होणे ही काळाची गरज आहे.'

याप्रसंगी अभियानाचे मुख्य निरीक्षक भाई जगताप आणि आफताबजी अहमद यांनीही मार्गदर्शन केले. त्यांनी कार्यकर्त्यांना पक्षीय शिस्त आणि आगामी संघटनात्मक बदलांबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख आणि माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनीही आपल्या भाषणातून कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह भरला. यावेळी निरीक्षक संजय दुबे व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थित होते.

**मुलाखती आणि संवाद:**

आनंद सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात केवळ भाषणेच झाली नाहीत, तर निरीक्षकांनी तासनतास बसून स्थानिक पदाधिकारी आणि इच्छुकांच्या थेट मुलाखती घेतल्या. मतदारसंघातील प्रत्येक गावाची राजकीय परिस्थिती, बुथ कमिटीची रचना आणि कार्यकर्त्यांच्या सूचनांवर यावेळी सखोल चर्चा करण्यात आली. ८०० कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे सभागृह पूर्णपणे ओसंडून वाहत होते.

विविध सेलचा सक्रिय सहभाग:

या बैठकीत युवक कॉँग्रेस, महिला कॉँग्रेस, एनएसयूआय, सेवादल आणि ओबीसी, अनुसूचित जाती-जमाती विभागाच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. प्रत्येक सेलच्या प्रतिनिधीने आपल्या विभागाचा प्रगती अहवाल निरीक्षकांसमोर सादर केला.

या भव्य मेळाव्यामुळे धामणगाव विधानसभा मतदारसंघात कॉँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मोठे चैतन्य निर्माण झाले असून, आगामी काळात पक्ष अधिक आक्रमकपणे जनतेच्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे संचलन अशोकराव चौधरी यांनी केले. कार्यक्रमाला श्रीकांत गावंडे, गोविंदराव देशमुख, गणेश आरेकर, अमोल होले, परीक्षित जगताप, पंकज वानखडे, प्रवीणजी घुईखेळकर, समीर पाटील, अमोल धवसे, विनोद चौधरी, श्रीनिवास सूर्यवंशी, प्रभाकरराव वाघ, शिट्टु दादा सूर्यवंशी, अरुणराव शेळके, प्रशांत कोल्हे, प्रवीण चीनचे, नितीन कोपरकर, पवन चौधरी, संजय डुकरे बाळासाहेब ठाकरे, सुधीर नालगे, गजानन गोरडे, हरिभाऊ ठाकरे, अनिल सौदागर, नितीनजी गोंडाने, नितीन दगडकर, सुरेश निमकर, अनिता मेश्राम, गजानन पाटील, शैलेश निस्ताने, नंदकुमार मानकर, चंदू डहाणे, अविनाश इंगळे, मुकुंद मावरे, भाऊराव बमनटे, मयूर दुबे, ऋषी जगताप, आशिष शिंदे, गजानन चौरे, महादेव सोमसे, रियाज भाई, राहुल गुल्हाने, सविता रंगारी, जोशनाताई धावसे, नरेंद्र थोरात, अमोल गुल्हाने, विनोद चौधरी, सुनील शिरभाते, दीपक सवयी, सुधीर पाटेकर, सुशील थोरात, मोरेश्वर डीवटे, देवेंद्र सव्वालाके,सलीम पठाण, देवानंद खुणे, प्रफुल कोकाटे, स्वप्निल मानकर, प्रतीक भाईचे,रुपेश पुडके सारंग देशमुख, राजू लांजेवार, सागर गरुड, वैभव चुकेकर, रितेश शेळके, भीमराव पवार, सागर भोंडे, गोपाल अविनाशी, राहुल राऊत, इत्यादी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## परतवाडा प्रकरणातील आरोपींविरुद्ध

प्रकरणाला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येत आहे, जो अत्यंत निषेधार्ह आहे. अशा वक्तव्यांमुळे समाजात तणाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

प्रकरणाची जलदगतीने विशेष तपास पथकाद्वारे चौकशी करण्यात यावी. दोषींवर कठोरात कठोर कारवाई करून पीडितांना न्याय मिळवून द्यावा. पीडित महिलांना आवश्यक ती सुरक्षा व मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आलेली आहे. यावेळी शहराध्यक्ष जयश्री वानखडे, नगरसेविका डॉ.अर्चना आत्राम, किरण चांदवडकर ,सीमा तिवारी, माया मावलकर ,रजनी घाटाडे, शाहीन शरीफ शेख, कांचन खोडके, शिल्पा तुषार राऊत, वृषाली जयंत मानकर, अश्विनी शशिकांत बोंडे आदि उपस्थित होते.

## अमरावती ते जामखेड बस

प्रवासीसेवा मिळत नसून सभ्यता,संस्कृती, धार्मिक परंपरा लोकविकास व लोकजीवनाचे सुद्धा आदानप्रदान असल्याचे प्रतिपादन युवानेते यश खोडके यांनी केले.

अमरावती मध्यवर्ती बसस्थानक येथून अमरावती ते जामखेड' एस.टी.बससेवेचा शुभारंभ आज दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी यश खोडके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळाचे अमरावती येथील विभाग नियंत्रक सचिन डफळे, बडनेरा येथील आगार व्यवस्थापक पवन देशमुख उपस्थित होते. याप्रसंगी अमरावती ते जामखेड या एसटी बसचे चालक व वाहक यांचा यश खोडके यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

अमरावती जिल्ह्यातील तसेच अमरावती शहरातील अनेक नागरिकांचे मूळगाव बीड व अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड, पाटोदा, शिरूर, आष्टी, करमाळा या तालुक्यांमध्ये आहे. सदर नागरिकांना गावी ये-जा करण्यासाठी सध्या मर्यादित बससेवा उपलब्ध असून त्यात अनेक अडचणी येत आहेत.

सध्या अमरावती ते बीड या मार्गावर सकाळी ०५.३० वा. व ९.०० वा. अशा दोनच बससेवा सुरु आहेत. परंतु या सेवांमध्ये विलंब अथवा बिघाड झाल्यास प्रवाश्यांना बीड येथे अडकून राहावे लागते. परिणामी बीडपासून पुढे जामखेड, पाटोदा, आष्टी, करमाळा या तालुक्यांतील प्रवाश्यांना, विशेषतः वृद्ध नागरिक व मुलांना, रात्रभर बसस्थानकात मुक्काम करावा लागतो व नाहक त्रास सहन करावा लागतो. या संदर्भात अमरावती विधानसभेच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पत्र देवून अवगत केले होते. तसेच अमरावती ते जामखेड अशी थेट एस.टी. बस सेवा सुरु झाल्यास प्रवाश्यांना बीड येथे थांबावे लागणार नाही, तसेच सकाळी नियोजित ठिकाणी वेळेत पोहोचणे शक्य होईल. यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा व मानसिक त्रास वाचेल. नागरिकांना दिलासा देण्याचे दृष्टीने अमरावती ते जामखेड अशी बस सेवा सुरु करण्याबाबत संबंधितांना योग्य ते आदेश द्यावेत, अशी विनंती आमदार महोदयांनी मंत्रीमहोदयांना केली होती. त्याअनुषंगाने मंत्री महोदयांनी राज्य परिवहन महामंडळ अमरावती विभागात संबंधिताना निर्देश दिल्याने अमरावती मध्यवर्ती बसस्थानक येथून अमरावती ते जामखेड' एस.टी.बससेवा सुरु करण्यात आली.

## नवसारीत आदिवासींच्या ६० पेक्षा

धाब्यासमोर गेल्या २२ वर्षापासून ६० ते ७० कुटुंबीय मनपाच्या जागेमध्ये झोपडी बांधून राहत होते. अशात गुरुवारी मनपा पथकाने तिथे पोहचून आदिवासींच्या झोपड्या पाडून त्यांच्या सामनाची नासधूस केली आणि त्यांना बेघर केले. यामुळे संतापलेले आदिवासी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले आणि त्यांनी राहण्याची योग्य व्यवस्था करून देण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली. या मुळे तेथे विचित्र परिस्थिती निर्माण झाली होती. यावेळी पूजा अमझरे, संगीता जाधव, भागीरथी धुर्वे ,कांता मावसकर, अंतु धुर्वे, शेवंती झकार, संतोष उईके, मुन्नी जांभेकर, भारती धुर्वे ,शिंका मरा, दीपक धूर्वे आदि उपस्थित होते.

## महात्मा बसेश्वर जयंती उत्सव

सुतार, हार्मोनियम वादक उद्धव महाराज साथ देतील.याच दिवशी दुपारी ५ ते ७ या वेळेत महात्मा बसेश्वरांचे प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. निबंध स्पर्धा घेतली जाणार आहे. रविवार १९ एप्रिल रोजी अक्षय तृतीयेच्या दिवशी शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. सायंकाळी ५ वाजता मृगेंद्र मठ परिसरातून निघणारी ही शोभायात्रा सिताराम बिल्डिंग, बुधवारा, नीलकंठ चौक, जुनी कोतवाली, दहिसाथ, सातखिराडी या मार्गाने होत मृगेंद्रमठ येथे विसर्जित होईल. शोभायात्रेमध्ये दोन दिंडी, तीन देखावे, भव्य रथ, पालखी, महिला भजन मंडळी, बँड यांचा सहभाग राहणार आहे. शोभायात्रे नंतर वीर शैव धर्मगुरू डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य, सदगुरू शिवशंकर शिवाचार्य स्वामी यांचे आशीर्वचन होईल. यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन डॉ. संगीता सौंदळे ,विजय ओडे, संजय आप्पा मुंजाळे, शितल कर्हे, उद्धव आप्पा गाडेकर, कैलास गिरोळकर, राजा हिरे, पराग गंनथडे, राजा माजलगावकर ,अशोक लोहारकर ,सुरेंद्र गुडधे,मनोहर कापसे, भारत मेंडसे, दत्तात्रेय फिस्के, रवींद्र अनवाने, रमेश जुनकर, बाबासाहेब कोल्हे, अभिमान डोईजड, श्रीकांत बालटे, सुभाष पत्रे ,शिवराव पाटकर, बाळासाहेब गाढवे, सुरेश टाकळे, दीपक वरणगावकर, डॉ. रविकांत कोल्हे ,प्रमोद मिटकरी, संजय संगेकर, उदय चाकोते, गुरु आप्पा हिंगमिरे आदीने केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये विजय ओडे ,सदानंद आप्पा कुर्रे, विलासआप्पा काळे, संजय आप्पा गव्हाले, कैलाशआप्पा गिरोळकर, शैलेश आप्पा मिसे, प्रवीणआप्पा चाकोते आदि उपस्थित होते.

**२० रोजी आरोग्य तपासणी व मान्यवरांचा सत्कार-**

२० एप्रिल रोजी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत भव्य आरोग्य शिबिर व रक्त चाचणी तपासणी शिबिराचे आयोजन मृगेंद्र मठ येथे करण्यात आले आहे. याच दिवशी सायंकाळी सात वाजता नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात येणार आहे. एडवोकेट वृषाली बोंद्रे यांच्या अध्यक्षतेत होणाऱ्या कार्यक्रमामध्ये सुरेंद्र आप्पा हुंडीवाले, शिरीषआप्पा रामापुरे, प्रवीण हरमकर, डॉ. जयेश आप्पा हातगांवकर उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमात नगरसेवक विलास इंगोले, अनिल अग्रवाल, डॉ. संजय शिरभाते, ललिता रतावा, डॉ. संजय तीरथकर, योगेश आप्पा विजयकर, सुनिता भेले यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यानंतर रात्री ८.३०वाजता पासून महाप्रसाद वितरीत होईल.

# अल्पवयीन मुलींचे आक्षेपार्ह व्हिडिओ प्रकरण

## अचलपूर-परतवाडा हादरले; शिक्षण क्षेत्रातून संतप्त प्रतिक्रिया

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अल्पवयीन मुलींचे आक्षेपार्ह फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केल्याच्या संतापजनक प्रकारामुळे अचलपूर–परतवाडा जुळ्या शहरात खळबळ उडाली आहे. या गंभीर प्रकरणामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून शिक्षण क्षेत्रातील नामवंत व्यक्तींनी तीव्र निषेध व्यक्त करत आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

'ही घटना अमानुष व घृणास्पद असून समाजाच्या मूल्यांना हादरा देणारी आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांमुळे महिलांचे व मुलींचे शोषण होते. दोषींवर तात्काळ व कठोर कारवाई होणे अत्यावश्यक आहे.'

**-प्रा. डॉ. राजेश चव्हाण, उपप्राचार्य, अचलपूर**

---

**'पालकांची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची'-**

'पालकांनी सावध होऊन मुलांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. त्यांना चुकीच्या मार्गापासून दूर ठेवणे ही काळाची गरज आहे.'

**-प्रमोद सुखदेवराव नैकेले,** माजी मुख्याध्यापक

---

**'संस्कार आणि योग्य मार्गदर्शन गरजेचे'-**

'ही घटना अत्यंत क्लेशदायक आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना संस्कार देऊन योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.'

**-उमेश धोटे, शिक्षक, परतवाडा**

---

**जागरूकता आवश्यक-**

'आजच्या खोट्या ग्लॅमरमुळे तरुण पिढी सहज बळी पडते. पालकांनी सोशल मीडियावरील हालचालींवर लक्ष ठेवणे आणि पोलीस यंत्रणेने अशा प्रवृत्तींचा शोध घेणे गरजेचे आहे.'

**-प्रा. विजय सातपुते, विदर्भ प्रांत अध्यक्ष, स्वाभिमानी शिक्षक सेना (शिंदे गट)**

---

## आधारभूत योजनेतंर्गत ज्वारी,

अशी माहिती महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित मुंबईचे संचालक नितीन हिवसे यांनी दिली आहे. यामुळे शेतकऱ्यांनी तातडीने नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी यांनी केले आहे.

## अचलपूर येथे तीन दिवसीय भव्य

म्हणून अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे,महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर संघाचे अध्यक्ष व माजी खासदार रामदास तडस,प्रसिद्ध कुस्तीपटू संजय तीरथकर, अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने,भाजपा चे नेते गजानन कोल्हे,प्रमोद कोरडे,अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड,माजी जिल्हा परिषद सदस्य प्रताप अभ्यंकर ,पुरुषोत्तम लकडे , नगरसेवक अक्षय पखाले,सुरेंद्र तांबे, चिंटू बहोरिया, रवी खंडेलवाल , अभय माथने आदी मान्यवर उपस्थितीत होते.यावेळी मान्यवरांचे हस्ते पहिल्या दिवशी उद्घाटन म्हणून कुस्ती लावण्यात आली. यावेळी प्रेक्षकाची मोठी गर्दी होती.

१६ एप्रिल पासून पुरुष व महिलांच्या विदर्भकेसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन विठ्ठलवाडी मैदान, तहसील रोड, अचलपूर येथे १८ एप्रिल पर्यंत करण्यात आले आहे. या स्पर्धेत बहुमान मिळवण्यासाठी पुरुष व महिला १५ संघातील ३०० पैलवान सहभागी झाले आहे. अचलपूरच्या नगराध्यक्ष रुपाली अभय माथने यांच्या पुढाकाराने तसेच विदर्भ कुस्तिगीर संघाच्या मान्यतेने श्री हनुमान आखाडा बिलनपुरा अचलपूर, नगरपरिषद अचलपूर व अमरावती शहर जिल्हा कुस्तिगीर संघाच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा कालपासून सुरू झाली आहे. यात २५ पंच निर्णय देणार असून खेळाडूंसोबत ५० प्रशिक्षक, व्यवस्थापकही उपस्थितीत होते. विदर्भ केसरी पैलवान यांना होंडा शाईन मोटारसायकल, ३१ हजार रु. रोख व चांदीची गदा मान्यवरांच्या हस्ते दिली जाणार आहे तर उपविजेत्याला २१ हजार, तृतीय क्रमांकावरील मल्लास ११ हजार रु. रोख मिळतील, तसेच महिला गटातील विजेत्या कुस्तीपटूला ३१ हजार, उपविजेतीला १५ हजार तर तृतीय स्थानावरील खेळाडूला १० हजार रु. रोख रक्कम देण्यात येणार आहे. या स्पर्धेत प्रेषक वर्गात मोठा उत्साह पाहायला मिळाला.

## आज रंगणार बुद्ध-भीम

हक्कांचे समर्थन करत त्यांनी कायद्याच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची चळवळ उभी केली. अशा या थोर युगपुरुषाच्या विचारांचे स्मरण करणे आणि त्यांच्या कार्याला संगीतमय मानवंदना देणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त माया केदार, सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी नागरिकांना या प्रबोधनात्मक सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आवाहन केले आहे.


### जाहीर नोटीस
### विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क, स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती.

आर.एम.जे.सी. १४७/२०२६ ने.ता. ३०/०४/२०२६

**अर्जदार : १. अख्तर बानो अफजल हुसैन,** वय- ७१ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा. थुगांव पिंपरी ता. चांदुर बाजार जि. अमरावती **२. अफसर हुसेन अफजल हुसेन,** वय - ६७ वर्ष व्यवसाय - मजूरी रा. पाकीजा कॉलनी, अमरावती ता. जि. अमरावती **३. शाहेद बी शेख रउफ अहेमद,** वय - ७० वर्ष व्यवसाय - घरकाम रा. घाझी कॉलनी, अचलपुर ता. अचलपुर जि. अमरावती **४. शाकीरा परवीन अब्दुल सादिक,** वय - ५८ वर्ष व्यवसाय - घरकाम रा. अमरावती ता.जि. अमरावती **५ फिरोजा अखतर सैय्यद अनीफ,** वय - ५३ वर्ष, व्यवसाय - घरकाम रा. छमन शाहा वली, कॅम्प, अमरावती ता. जि. अमरावती **६. तसव्वर हुसैन अफ्जल हुसैन,** वय- ५० वर्ष व्यवसाय - मजूरी **७. रेशमा अंजुम सैय्यद खलील,** वय - ४८ वर्ष व्यवसाय- घरकाम रा. अस्मा कॉलनी, अमरावती ता. जि. अमरावती **८. नाज अंजुम अनीस खान,** वय - ४६ वर्ष व्यवसाय - घरकाम रा. वार्ड नं. ३ भट्टी पुरा खेल महाल (करजगांव) अमरावती ता. जि. अमरावती **९. तौफीक हुसैन अफझल हुसैन** वय- ४६ वर्ष व्यवसाय - मजुरी रा. थुगाव पिंपरी ता, चांदुर बाजार जि. अमरावती **१०. फरहाना अंजुम शेख वसीम,** वय - ४४ वर्ष व्यवसाय - घरकाम रा. थुगांव पिंपरी ता. चांदुर बाजार जि. अमरावती

**......विरूध्द...... गैरअर्जदार :- निरंक**

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मृतक अफझल हुसेन मोहम्मद सुजात** यांचा **मृत्यु दि. १७/०९/२०२०** रोजी जिल्हा सीव्हील हॉस्पीटल अमरावती येथे झालेला असुन ते कायमचे रा. थुगाव पिंपरी ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथील रहीवासी होते. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. १४७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची दखल घेतल्या जाणार नाही अर्जदाराना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०२/०४/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली

**आदेशानुसार**

शिक्का

**सहाय्यक अधिक्षक सहायक अधीक्षक दिवाणी न्यायालय चांदूर बाजार**



**महाराष्ट्र शासन**
**तहसिलदार, चांदुर बाजार यांचे कार्यालय**
**(जन्म मृत्य प्रमाणपत्र शाखा)**

Emall-tah.chandurz@gmail.com क्र/स.म.अ./कावी ३/२/२०२६दिनांक १५.०४.२०२६

### जाहिरनामा

**अर्जदार :- दिपक जनार्धन भिसे** रा. टाकरखेडा पुर्णा ता. चांदुर बाजार जि. अमरावती

**-: विरुध्द :-**

**गैरअर्जदार :- निबंधक जन्म मृत्यु नोंदणी तथा ग्रामपंचायत टाकरखेडा पुर्णा ता. चांदुर बाजार जि. अमरावती**

याव्दारे गावातील सर्वत्र लोकांना जाहिरपणे कळविण्यात येते की, **दिपक जनार्धन भिसे रा. टाकरखेडा पुर्णा** ता. चांदुर बाजार जि. अमरावती यांनी स्वतः चे जन्म दिनांक **१८.०५.१९९२** चा राहत्या घरी झाला परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत टाकरखेडा पुर्णा ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे नोंद करण्यात आली नाही. जन्माची नोंद जन्म मृत्यु कार्यालय ग्रामपंचायत **टाकरखेडा पुर्णा** पंचायत समिती चांदुर बाजार जि. अमरावती हद्दीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोंदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत **टाकरखेडा पुर्णा** यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंदकरुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काहि आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आपला आक्षेप अथवा हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अथवा हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. सदर जाहिरनामा आज दिनांक १५.०४.२०२६ रोज़ी. माझ्या सहि व शिक्क्यानिशी प्रसिध्दी करण्यात येत आहे.

शिक्का

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी चांदुरबाजार**



### तहसीलदार मोर्शी यांचे न्यायालय
### रा.मा.क्र./ /MRC-८१//२०२५-२०२६
### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, **अर्जदार तमीजोद्दीन कुतुबोद्दीन** यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **पाळा** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निंबंधक ग्रा.पं.पाळा येथील जन्म मृत्यु नोंदवही अनुउपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषांगीक पुरावे दाखले केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय **पाळा** येथे स्वतःचे जन्म **दि.५.३.१९५७** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयच्या असेल त्यांनी, सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे** आंत लेखी स्वरूपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसिलदार, मोर्शी**



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७७४/२०२६
**साहेब व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२४.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Shoeb Ahmad Khan S/o Azizuddin Khan @ Gulambhai Moinkhan Age 70 Yrs. Occu.: Agriculturist
2. Farzana Ali (Name Before Marriage - Farzana D/o Azizuddin Khan @ Gulambhai Moinkhan) Age 69 Yrs. Occu.: Household R/o Shamiana Bldg. Flat No.7 15, Veronica Road, Opp.Mount Carmel Church, Bandra West-400050
3. Rizwana Jabeen (Name Before Marriage - Rizwana D/o Azizuddin Khan @Gulambhai Moinkhan) Age 67 Yrs. Occu.: Household R/o A/601, Pearl Bldg. Sanghavi Complex, Near Ganga Complex, Mira Road, East Thane
4. Imranuddin S/o Azizuddin Khan @ Gulambhai Moinkhan, Age 64 Yrs. Occu.: Service R/o 9-4-116-4-1, Flat No.501, Balreaddy Nagar, Tolichowki Golconda, Hyderabad-500008
5. Chand Bano W/o Mir Riyaz Ali, (Name before Marriage- Chand Bano D/o Azizuddin Khan @ Gulambhai Moinkhan) Age 61 Yrs. Occu.: Household R/o Rehmat Nagar, Juni Basti, Murtizapur, Dist. Akola
6. Ghufranuddin Khan S/o Azizuddin Khan @ Gulambhai Moinkhan Age 58 Yrs. Occu.: Agriculturist Appli.No.1 & 6 R/o Jahagir Pura Nandgaon Peth, Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **कमरजहा अजिजुद्दीन खान व अजिजुद्दीन सुलतान साहेब उर्फ गुलामभाई मोईनखान** हे अनुक्रमे दिनांक 02.01.2010 व 27.04.2016 रोजी **खानापूर, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शोएब व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शोएब व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



### तहसीलदार मोर्शी यांचे न्यायालय
### रा.मा.क्र./ /MRC-८१//२०२५-२०२६
### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, **अर्जदार काजी सलामद्दीन काजी वासिमुद्दीन देशमुख** यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **पाळा** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निंबंधक ग्रा.पं.**पाळा** येथील जन्म मृत्यु नोंदवही अनुउपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषांगीक पुरावे दाखले केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय पाळा येथे स्वतःचे जन्म **दि.१४.१२.१९८२** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयच्या असेल त्यांनी, सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे** आंत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसिलदार, मोर्शी**



### जाहीर नोटीस
### वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र. १७९/२०२६ ने.ता. ०८/०६/२०१६

**अर्जदार-१. सुहासिनी रामकृष्ण ठाकरे,** वय -७९ वर्ष, व्यवसाय -घरकाम रा. काळाशी, ता. दर्यापूर, जि. अमरावती **२. अविनाश रामकृष्णराव ठाकरे,** वय -५३ वर्ष, व्यवसाय - शेती, रा गांधी नगर, बनोसा, ता दर्यापूर, जि. अमरावती **३. माधुरी सुनिल गावडे** वय ५० वर्ष व्यवसाय -घरकाम रा. हिवरखेड रोड, जलतारे प्लॉट अकोट, ता. अकोट, जि. अकोला **४. तेजस्विनी पवन सवाई,** वय ४३ वर्ष,व्यवसाय -घरकाम रा. श्रीकृष्ण अपार्टमेन्ट, उदय कॉलनी, साईनगर, अमरावती, ता. जि. अमरावती

**विरूध्द. गैरअर्जदारः- निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **रामकृष्ण गुलाबराव ठाकरे** हे दिनांक १६/०८/२०२४ रोजी मरण पावले आहे.अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन. रामकृष्ण गुलाबराव ठाकरे** यांचे नाते मौजा सौरी, ता. दर्यापूर, जि. अमरावती, येथील शेत गट क. १३,० हे. २५ आर. आ.रु. ५.०८ व मौजा कळाशी, ता. दर्यापूर, जि अमरावती येथील शेत गट क. ३९१. १ हे. ६२ आर, आ.रु. ८.९५ येणे प्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतींची बाजारभाव किंमत ३०,००० रु. आहे.

आज दि. १६/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय व स्तर दर्यापूर**



### जाहीर नोटीस
### वि. दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क. १६६/२०२६ ने.ता. ०६/०५/२०२६

**अर्जदारः- १. शोभा अरूण मोरशे,** वय ६० वर्ष,व्यवसाय -घरकाम
**२. पंकज अरूण मोरशे,** वय ४० वर्ष, व्यवसाय - शेती
**३. अर्चना रविकिरण मोरशे,** वय ३५ वर्ष,व्यवसाय -घरकाम
**४. ओम रविकिरण मोरशे,** वय १४ वर्ष, व्यवसाय - शिक्षण अ.क. १ ते ४ रा. दारापूर, ता. दर्यापूर जि. अमरावती
**५संगीता गोपाळ कोकाटे,** वय ४५ वर्ष, व्यवसाय -घरकाम रा. अनभोरा, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला

**विरूध्द. गैरअर्जदारः- निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **अरूण पांडुरंग मोरशे हे दिनांक २२/१२/२०२५** रोजी मरण पावले आहे. अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट चे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन :- अरूण पांडुरंग मोरशे** यांचे नावे मौजा चंडीकापुर, ता. दर्यापूर येथे गट क. २२६ ही शेती ०.८.३ हे. आर आ.रु. ४.८२ ही मिळकत आहे.

आज दि. ०९/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय व स्तर दर्यापूर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# लाखोंच्या एमडी ड्रग्जसह आरोपी जेरबंद

## ६८.४३ ग्रॅम मेफेड्रोन जप्त ; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत सन २०२६ मधील एमडी (मेफेड्रोन) ड्रग्जविरोधातील पहिली मोठी कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने करत १३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत ६८.४३ ग्रॅम एमडी ड्रग्जसह एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.



स्थानिक गुन्हे शाखेला १६ एप्रिल रोजी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सिव्हील लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवीन बसस्थानकाच्या पाठीमागे असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ एक इसम अंमली पदार्थ विक्रीसाठी येणार आहे. या खात्रीलायक माहितीनुसार पथकाने शासकीय पंचांच्या उपस्थितीत सापळा रचून धाड टाकली.

या वेळी आरोपी मोहम्मद शफीक मोहम्मद जहिर शेख (वय ३५, रा. मुसा कसम चाल, एम.पी. रोड, मुंब्रा, जि. ठाणे) याला ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून ६८.४३ ग्रॅम एमडी ड्रग्ज (मेफेड्रोन) किंमत सुमारे १३ लाख ६० हजार रुपये व दोन मोबाईल फोन किंमत २० हजार रुपये असा एकूण १३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये सिव्हील लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक गोपाल जाधव, माजीद पठाण तसेच सीएमएस सेलचे पोलीस उपनिरीक्षक गणेश पांडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कारवाईत पोलीस अंमलदार शेख हसन, भास्कर धोत्रे, वसिमोद्दीन, अब्दुल माजीद, महेंद्र मलिये, किशोर सोनोने, एजाज अहेमद, अन्सार अहेमद, उदय शुक्ला, स्वप्नील चौधरी, अशोक सोनवणे, मनिष ठाकरे आणि रामसिकन डोईफोडे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# नगरसेविका पतीवर प्राणघातक हल्ला

## राजकीय वैमन्यसातून गुन्हा घडल्याची चर्चा

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरातील प्रभाग क्रमांक ९ च्या वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेविका मुमताज खानम इमरान खान यांचे पती इमरान खान यांच्यावर गुरुवारी दुपारी आठ ते दहा जणांनी कुऱ्हाड, फावड्याने हल्ला चढविल्याची घटना घडली. याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते इमरान खान व त्यांचा पुतण्या कामरान खान दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अकोल्यातील सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरू आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, अकोट शहरातील वंचित बहुजन आघाडीच्या प्रभाग क्रमांक ९ च्या नगरसेविका मुमताज खानम इमरान खान यांचे पती इमरान खान हे गुरुवारी दुपारी आपल्या पुतण्या कामरान खान यांच्यासह लग्नात जाण्यासाठी निघत असतानाच ८ ते १० जणांनी कुऱ्हाड, फावड्याने हल्ला चढविला. यामध्ये त्यांचा पुतण्या कामरान खान याच्या डोक्याला चांगलीच गंभीर दुखापत झाली तर इमरान खान यांच्या डोळ्याला, छातीला व चेहऱ्यावर गंभीर मार



लागला आहे.

सदर वाद हा राजकीय वैमान्यसातून झाला असल्याची चर्चा अकोट शहरात रंगली असून याप्रकरणी पुढील तपास अकोट शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्री. मावळे यांच्या मार्गदर्शनात पोलिस कर्मचारी करीत आहे.

### सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल

निवडणुकीच्या काळातही पोलिंग बूथ जवळील परिसरात अश्याच प्रकारे हल्ल्याचा प्रयत्न झाला होता. त्याच्या व्हिडिओ सुद्धा त्यावेळी अनेकांच्या मोबाईलमध्ये काढण्यात आला होता. गुरुवारी झालेल्या हल्ल्यानंतर निवडणूक काळातील तो व्हिडिओ मोठ्या प्रमाणात सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

# सीबीएसई दहावी परीक्षेत वेदिका आरूची चमकदार कामगिरी

## ९७ टक्के गुणांसह 'हॅप्पी फेसेस विद्यालया'त द्वितीय क्रमांक; जिल्ह्यात कौतुकाचा वर्षाव

■ प्रतिनिधी | वाशिम ■

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) दहावी परीक्षेचा निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निकालात मालेगाव तालुक्यातील खिर्डा येथील रहिवासी तथा वाशिममध्ये प्राचार्य म्हणून कार्यरत असलेले रमेश आरू यांची कन्या वेदिका रमेश आरू हिने उल्लेखनीय यश संपादन करत सर्वांचे लक्ष वेधले आहे.



वेदिका हिने सीबीएसई दहावी परीक्षेत ९७ टक्के गुण मिळवत वाशिम येथील 'हॅप्पी फेसेस विद्यालय'मधून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशामुळे खिर्डा गावासह संपूर्ण वाशिम जिल्ह्यात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. वेदिकेच्या या यशाबद्दल शिक्षक, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नियमित अभ्यास, योग्य नियोजन आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाल्याचे वेदिकाने सांगितले. अभ्यासाबरोबरच विविध शालेय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्याने तिच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळाली आहे. तिचे वडील रमेश आरू हे रेखाताई राष्ट्रीय कन्या शाळेत प्राचार्य पदावर कार्यरत असून त्यांनी वेदिकेला सातत्याने शैक्षणिक मार्गदर्शन केले. आईचे प्रोत्साहन व कुटुंबीयांचा भक्कम पाठिंबा यामुळेच हे यश मिळाल्याची भावना कुटुंबीयांनी व्यक्त केली. वेदिकाच्या यशामुळे परिसरात तिचे सर्वत्र कौतुक होत असून, भविष्यातही ती उच्च शैक्षणिक शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# प्रभावी योजनांमुळे महिलांच्या सर्वांगीण विकासाला गती

**अकोला :** महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सक्षमीकरणासाठी महिला व बालविकास विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. मातृवंदना योजना, लेक लाडकी योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मनोधैर्य योजना तसेच आदिशक्ती अभियान यांच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासाला गती मिळत आहे.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य व सुरक्षेसाठी व्यापक आराखडा तयार करण्यात आला आहे. मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

# प्रामाणिकतेचा आदर्श : पोलीस अंमलदार अशपाक बेनिवाले यांचा सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त वाशिम शहरात विविध ठिकाणी मिरवणुका सुरू असताना एका प्रामाणिक आणि सतर्क पोलिस कर्मचाऱ्यामुळे एका महिलेची मौल्यवान पर्स सुरक्षित परत मिळाल्याची घटना घडली. या घटनेमुळे पोलीस दलाची प्रतिमा उंचावली असून सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. १४ एप्रिल रोजी शहरात आंबेडकर जयंतीच्या मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यावेळी पोलीस अंमलदार अशपाक भिका बेनिवाले (बकल नं. १२९५) हे वाशिम शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत मच्छी मार्केट परिसरात बंदोबस्तासाठी तैनात होते. याच दरम्यान, एक महिला आपल्या पतीसोबत दुचाकीवरून पाटणी चौकाकडून छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जात असताना तिची पर्स अनवधानाने रस्त्यावर खाली पडली. ही बाब लक्षात येताच पोलीस



अंमलदार बेनिवाले यांनी तत्काळ त्या महिलेला आवाज देऊन थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र ती महिला पुढे निघून गेली. याच वेळी एका दुचाकीस्वाराने ती पर्स उचलून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, बेनिवाले यांनी तत्परता आणि सतर्कता दाखवत त्या दुचाकीस्वाराला जागेवरच थांबवून त्याच्याकडील पर्स आपल्या ताब्यात घेतली. यानंतर त्यांनी घटनास्थळीच थांबून संबंधित महिलेची वाट पाहण्याचा निर्णय घेतला. सुमारे १५ मिनिटांनंतर ती महिला आपली हरवलेली पर्स शोधत पुन्हा त्या ठिकाणी आली. पोलीस अंमलदारांनी तिची विचारपूस करून ओळख पटवली. पर्स उघडून पाहिल्यावर त्यामध्ये सुमारे एक तोळा सोन्याचे दागिने (अंदाजे किंमत १ लाख ४० हजार रुपये) असल्याचे आढळून आले. सदर महिलेचे नाव सौ. रेखा प्रल्हाद चव्हाण (रा. वारा जहाँगिर, सध्या वास्तव्यास वाशिम) असे असल्याचे समोर आले. ठाणेदार संजय चौधरी यांना या घटनेची माहिती देण्यात आली. आवश्यक पडताळणीनंतर पर्समधील सर्व मुद्देमालासह ती सुरक्षितपणे संबंधित महिलेकडे सुपूर्द करण्यात आली.

दरम्यान, या प्रामाणिक कार्याची माहिती पोलीस अधीक्षक अनुज तारे यांना मिळताच त्यांनी पोलीस अंमलदार अशपाक बेनिवाले यांना कार्यालयात बोलावून त्यांचा विशेष सत्कार केला. यावेळी त्यांना शाल, श्रीफळ व रोख ५,००० रुपयांचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले. या घटनेमुळे वाशिम शहरात पोलीस दलाबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला असून, अशा प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष पोलिस कर्मचाऱ्यांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# महिलांच्या योगदानाशिवाय गावाची स्वच्छता अशक्य : सारिका कारले- हिंगे यांचे प्रतिपादन

## पाणी व स्वच्छता विषयक प्रशिक्षण संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गावे स्वच्छ झाली परंतु ही स्वच्छता शाश्वत राहण्यासाठी महिलांचे योगदान अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन मंगरूळपीर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सारिका कारले- हिंगे यांनी केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे क्षमता बांधणी सल्लागार प्रफुल्ल काळे जनसंपर्क अधिकारी राम श्रुंगारे, प्रशिक्षक विलास भालेराव, प्रभू कांबळे, प्रतीक्षा भगत, प्रवीण पट्टेबहादूर, तालुका समन्वयक प्रवीण आखाडे, अभिजित गावंडे यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा -२ अंतर्गत मंगरुळपीर पंचायत समितीत महिलांसाठी पाणी, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

सदर प्रशिक्षण कार्यक्रम दि. १५ ते १६ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणात बचत गटातील महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासनाच्या राज्य पाणी व स्वच्छता मिशन आणि ए. एफ. सी. इंडिया लिमिटेड यांच्या वतीने करण्यात आले होते. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी गटविकास अधिकारी सारिका कारले-हिंगे यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, 'दैनंदिन जीवनात महिला या पाणी आणि स्वच्छतेशी अधिक संबंधित असतात. कुटुंबाच्या घडणीत महिलांची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे गावातील स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापन या विषयांचे प्रशिक्षण महिलांना देणे अत्यंत आवश्यक आहे.' त्यांनी पुढे सांगितले की, या प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना गावपातळीवर स्वच्छता टिकवून ठेवणे, कचऱ्याचे वर्गीकरण व पुनर्वापर, सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन तसेच सुरक्षित पिण्याच्या पाण्याची काळजी कशी घ्यावी याबाबत महिलांना प्रशिक्षण दिल्यास ते गावाला योग्य दिशा दाखवतील. गावाची स्वच्छता कायमस्वरूपी राखण्यासाठी महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे असेही त्या म्हणाल्या.

प्रशिक्षणादरम्यान तज्ज्ञ प्रशिक्षकांनी विविध प्रात्यक्षिकांद्वारे महिलांना माहिती दिली. तसेच ओडीएफ प्लस (ODF Plus) संकल्पना, प्लास्टिक मुक्त गाव, घनकचरा व द्रवकचरा व्यवस्थापन (SLWM) यासंबंधी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे महिलांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार असून गावांच्या सर्वांगीण विकासासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषदेचे क्षमता बांधणी सल्लागार प्रफुल्ल काळे यांच्यासह प्रवीण आखाडे, अभिजीत गावंडे यांनी परिश्रम घेतले.

# भुमि सुपोषण व मृदा आरोग्य व्यवस्थापन या विषयावर कार्यक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय कृषि अनुसंधान नवी दिल्ली पुरस्कृत कृषि विज्ञान केंद्र वाशिम व्दारे सोमवार दिनांक १३ एप्रिल रोजी दत्तक गाव मौजे गोकसांवगी ता.मालेगाव येथे भुमि सुपोषण व मृदा आरोग्य व्यवस्थापन या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.आर.एल.काळे उपस्थीत होते तर प्रमुख अतिथी मध्ये कृविकेचे शास्त्रज्ञ डॉ.एस.के.देशमुख व डॉ.डि.एन.इंगोले मंचावर विराजमान होते.



प्रास्ताविकात डॉ.एस.के.देशमुख यांनी भुमि सुपोषण अभियानाचे उदिष्ट्ये व महत्व विषद करतांना रासायनिक खतावरील वाढते अवलंबीत्व भविष्यात धोकादायक ठरु शकते असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात डॉ.आर.एल.काळे यांनी मातीतील सेंद्रिय घटक वाढविण्यासाठी गांडुळ खत, कंपोस्ट निर्मिती, पिक फेरपालट व पशुपालनाचा समावेश करण्याचे महत्व अधोरेखित केले. यापुढे बोलतांना त्यांनी सेंद्रिय कर्ब वाढविण्याच्या उपायांवर विशेष भर दिला. शेतीला उद्योगाचा दर्जा देऊन या क्षेत्रात बदल घडवावा असे प्रतिपादन केले. डॉ.डि.एन.इंगोले यांनी रब्बी हंगामातील पिकांची साठवणुक तंत्रज्ञान व बाजारपेठ व्यवस्थापन या बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यापुढे बोलताना माती नमुना घेण्याची पद्धती व चालू हंगामापूर्वी माती परीक्षण करावे व संत्र्याचा वापर वाढवावा असे आवाहन केले. शेतक-यांनी उपस्थीत केलेल्या शंकाचे निरसन शास्त्रज्ञाव्दारे करण्यात आले.

# महात्मा फुले–डॉ. आंबेडकर जयंती निमित्त मान्यवरांचा संविधान देऊन सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण, कला, क्रीडा व आरोग्य बहुउद्देशीय संस्था, उमरा शम. ता. जि. वाशिम यांच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य डिगांबर खोरणे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिवर्तन कला महासंघ वाशीमचे जिल्हाध्यक्ष शेषराव मेश्राम होते. या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजन संस्था अध्यक्ष शाहीर संतोष खडसे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

# महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्साहात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

नालंदा नगर, येथे महात्मा जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त दि. ११ ते १४ एप्रिल या कालावधीत जयंती महोत्सवाचे अध्यक्ष सहदेव चंद्रशेखर, उपाध्यक्ष सिद्धार्थ गायकवाड, एकनाथ धवसे, ॲड. नारायण पडघान, संजय पडघान व समितीचे इतर पदाधिकारी यांच्या माध्यमातून विविध सामाजिक, सांस्कृतिक व बौद्धिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले.

महोत्सव मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. यावर्षीच्या जयंती महोत्सवाची विशेष बाब म्हणजे प्रगल्भ विचारसरणी असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असलेली उत्सव समिती गठीत करण्यात आली होती. महोत्सवासाठी लागणारा संपूर्ण खर्च नगरातील समाजबांधवांकडून धम्मदानाच्या स्वरूपात पारदर्शक पद्धतीने जमा करण्यात आला. तसेच वर्गणीची दैनंदिनी वेळोवेळी अद्ययावत करून समाजासमोर सादर करण्यात आली. कार्यक्रमात कोणत्याही व्यक्तीचा सत्कार करण्याऐवजी, 'बाबासाहेबांपेक्षा कोणीही मोठे नाही' या भूमिकेचा आदर्श ठेवण्यात आला.

दि. ११ एप्रिल रोजी त्रिरत्न बुद्ध विहारातील प्रांगणात समितीचे अध्यक्ष तथा सर्व पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत भन्ते प्रज्ञापाल महाथेरो यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहणाने महोत्सवाची सुरुवात झाली. यानंतर राम शृंगारे व अनिल इंगोले यांनी महात्मा फुले यांचे अखंडाचे वाचन केले. दुपारी आरती ठोके यांच्या नेतृत्वात महिलांसाठी 'सोहळा भीम कन्येचा उत्सव नालंदा नगरचा' आयोजित करण्यात आला. संध्याकाळी स्वर सागर कलासंचच्या वतीने भीमगीत गायन 'भीम ज्ञानाचा पॉवर' कार्यक्रम सादर झाला.

दि. १२ एप्रिल रोजी इंडियन आयडॉल फेम चेतन उचितकर यांच्या 'चेतन सेवांकुर ऑर्केस्ट्रा'तर्फे दिव्यांग मुलांचा प्रेरणादायी सांस्कृतिक कार्यक्रम झाला.

दि. १३ एप्रिल रोजी बौद्ध धम्मावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षा घेण्यात आली तसेच लहान मुला-मुलींसाठी भीमगीतावर नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली.

दि. १४ एप्रिल रोजी त्रिरत्न बुद्ध विहार येथे पंचशील ध्वजारोहण करून भव्य धम्म रॅलीला सुरुवात करण्यात आली. महिलांच्या लेझीम पथकाने रॅलीत विशेष आकर्षण निर्माण केले. ही रॅली सर्वात मोठी व विक्रमी ठरली. नालंदा नगर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. परंपरेनुसार महोत्सव समितीचे अध्यक्ष सहदेव उत्तमराव चंद्रशेखर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पंचशील व त्रिशरण ग्रहण करत मिरवणूक कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

महोत्सवादरम्यान पाण्याची व्यवस्था प्रमोद खिल्लारे व आनंद रणबावळे यांनी केली, तर लाईनची व्यवस्था त्रिरत्न बुद्ध विहार चॅरिटेबल ट्रस्ट व राम खिल्लारे यांनी विनामूल्य उपलब्ध करून दिली. या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी महोत्सव समितीचे उपाध्यक्ष सिद्धार्थ गायकवाड, एकनाथ धवसे, ॲड. नारायण पडघान, संजय पडघान, संजय वानखडे, डॉ मुरलीधर ताजणे, भगवान ठोके, तलाठी राजू भुसारी, मेजर प्रल्हाद सरकटे यांच्यासह आरतीताई ठोके, मंदाताई हनुमंते, ईरावती अंभोरे, सुनिता कांबळे व सिद्धांत चंद्रशेखर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

तसेच रॅली शिस्तबद्ध व निर्विघ्न पार पडावी यासाठी समाजसेवक संतोष ठोके व नगरपरिषद वाशिमचे स्थायी समिती प्रमुख अनिल ताजने यांनी विशेष दक्षता घेतली. या चार दिवसीय महोत्सवाने समाजात एकात्मता, समता व बौद्धिक जागृतीचा संदेश देत नालंदा नगराची जयंती कार्यक्रम रॅली ही जिल्ह्यासाठी एक आदर्श निर्माण करणारी ठरली आहे.



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १४० ■ शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवकांचा सक्रिय सहभाग आवश्यक - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

## महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचा दीक्षांत समारंभ






**वर्धा जनमाध्यम :** वर्धा हा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे वास्तव्य लाभलेला जिल्हा आहे. गांधीजींनी त्यावेळी पाहिलेले विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांचे मोठे योगदान अपेक्षित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वैयक्तिक प्रगतीसोबतच देशाला सशक्त, आत्मनिर्भर आणि विकसित भारत बनविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले.

वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या सहाव्या दीक्षांत समारंभात त्या मुख्य अतिथी म्हणून बोलत होत्या. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर तसेच विश्वविद्यालयाच्या कुलपती उपस्थित होत्या.

राष्ट्रपती मुर्मू यांनी पदवीधर विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पदक विजेत्यांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञान व शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीपुरता मर्यादित न ठेवता समाज व राष्ट्राच्या उन्नतीसाठी करावा. महात्मा गांधी यांच्या आत्मनिर्भरतेच्या विचारांचा उल्लेख करत नवकल्पना, मूल्याधारित शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी यांच्या आधारावरच विकसित भारताचे स्वप्न साकार होऊ शकते, असे त्या म्हणाल्या.

भारतीय भाषांचा अभिमान बाळगून त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. इतर भाषांचा विरोध न करता मातृभाषेचा सन्मान राखणे आवश्यक आहे. जगातील कोणतीही भाषा शिका परंतू आपल्या भाषेला प्रथमस्थानी ठेवा. सेवाग्राम आश्रम भेटीदरम्यान महात्मा गांधी यांचा साधेपणा, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेच्या कार्यातून प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात विविध राज्यातील विद्यार्थी शिक्षण घेतात. येथे आंतरभाषा संवाद घडून येतो. हिंदी ही समृद्ध भाषा आहे. हिंदीसह भारतीय भाषांचा प्रत्येकाने गौरव बाळगला पाहिजे. राष्ट्रपिता महात्मा गांधी इंग्लंडमध्ये शिकले. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी सामाजिक चळवळ उभारली. परंतू भारतीय स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींनी भारतीय भाषेलाच प्राथमिकता दिली. हिंदीच्या प्रचार प्रसारासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केले, असे राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या.

पदवीदान समारंभात विद्यार्थीनींना अधिक पदके मिळाली. त्यासाठी विद्यार्थीनींचे राष्ट्रपतींनी कौतूक केले. सन २०४७ साली देशाच्या स्वातंत्र्याला १०० वर्ष पुर्ण होणार आहे. स्वातंत्र्यासाठी अनेक महिलांनी आपले योगदान दिले. आता विकसित भारताच्या निर्मितीसोबतच विविध क्षेत्राच्या प्रगतीसाठी युवकांसोबतच युवतींनी देखील खांद्याला खांदा लावून योगदाने द्यावे, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा म्हणाले, विद्यार्थ्यांनी सदाचार, नैतिकता व सामाजिक उत्तरदायित्व जपत राष्ट्रविकासात योगदान दिले पाहिजे. विद्यार्थ्यांनी कार्यनिष्ठा आणि मानवी मूल्ये जोपासत मागास घटकांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करावे. डिजीटल युगात हिंदी भाषेची भूमिका अधिक महत्वाची झाली आहे. ती केवळ भाषा नाही तर अभिव्यक्ती आणि संस्कृती, परंपरेचे दर्शन घडविणारे माध्यम आहे, असे राज्यपाल म्हणाले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावतीने विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत राज्य शासन शिक्षण क्षेत्रात रोजगाराभिमुख बदल घडवित असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी करावा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेले शिक्षण धोरण लवचिक, कौशल्य प्रदान करणारे आणि विद्यार्थी केंद्रीत असल्याचे श्री.बावनकुळे म्हणाले.

यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते विविध विद्याशाखेच्या आठ विद्यार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात पदवी प्रदान करण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलपती यांनी केले. त्यांनी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रम, संशोधन उपक्रम आणि विद्यार्थी विकास कार्यक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमास आ.दादाराव केचे, विशेष पोलिस महानिरिक्षक संदीप पाटील, माजी खासदार रामदास तडस, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, विद्यापीठाचे प्राध्यापक, विद्यार्थी, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

### हे अंडे की आंबा : सिंदीकर चक्रावले

## आंब्याच्या सीझनमध्ये अंड्याची करामत; नंदी चौकात लोकांची झुंबड



**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** आंब्याचा हंगाम सुरू असताना सिंदी शहरात मात्र वेगळाच 'आंबा' चर्चेत आला आहे, तोही थेट अंड्यात! नंदी चौकातील अंडी विक्रीच्या दुकानात आढळलेल्या आंब्यासारख्या आकाराच्या अंड्याने शहरात एकच खळबळ उडवली असून, हा निसर्गाचा चमत्कार की काही वेगळाच प्रकार, याबाबत जोरदार चर्चा रंगली आहे.

येथील बाजार लाईन परिसरातील नंदी चौकात सचिन तानाजी झाडे यांचे 'सचिन एग्ज' हे दुकान आहे.

गुरुवारी सकाळी नेहमीप्रमाणे अंड्यांचे ट्रे मांडत असताना त्यांच्या नजरेस एका ट्रेमध्ये वेगळ्याच आकाराचे अंडे पडले. साधारणपणे लंबवर्तुळाकार असणाऱ्या अंड्याच्या तुलनेत हे अंडे एका बाजूने वळलेले असून त्याचा आकार अगदी पिकलेल्या आंब्यासारखा दिसत होता.

ही बाब समजताच सामाजिक कार्यकर्ते रवि राणा यांनीही अंड्याची पाहणी केली. 'आंब्यासारखे अंडे अशी बातमी परिसरात वाऱ्यासारखी पसरली आणि नंदी चौकात बघ्यांची अक्षरशः रांग लागली. दिवसभर नागरिकांची दुकानात गर्दी उसळलेली पाहायला मिळाली. काहींनी मोबाईलमध्ये फोटो टिपले, तर काहींनी या अनोख्या अंड्याबाबत विविध तर्क-वितर्क लढवले.

या प्रकारामुळे निसर्गाच्या किमयेबद्दल पुन्हा एकदा चर्चा रंगली आहे. काही जाणकारांच्या मते, कोंबडीच्या शरीरातील जैविक प्रक्रियेत होणाऱ्या किरकोळ बदलांमुळे अशा विचित्र आकाराची अंडी तयार होऊ शकतात. मात्र, सर्वसामान्यांसाठी हे अंडे म्हणजे थेट निसर्गाचा 'चमत्कार'च ठरत आहे.

दरम्यान, या घटनेने सिंदी शहरात एक वेगळाच कुतूहलाचा विषय निर्माण केला असून, अंड्यातला आंबा पाहण्यासाठी नागरिकांची उत्सुकता अजूनही ओसरलेली नाही.

अनेक वर्षे अंड्यांचा व्यवसाय करतोय, हजारो क्रेट्स हाताळले; पण आंब्यासारख्या आकाराचे अंडे पहिल्यांदाच पाहतोय. हा अनुभव वेगळाच आहे, अशी प्रतिक्रिया अंडी विक्रेते सचिन झाडे यांनी दिली.

---

# मध्यरात्री कारंजात दरोडेखोरांचा थरार; घरात घुसून दरवाजे फोडण्याचा प्रयत्न

## चोरट्यांचा सुळसुळाट वाढला; नागरिक भयभीत, पोलिसांवर प्रश्नचिन्ह

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** शहरात चोरट्यांचा सुळसुळाट दिवसेंदिवस वाढत असून, आता दरोड्याच्या प्रयत्नांपर्यंत त्यांची मजल गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे सावट निर्माण झाले आहे. १५ तारखेच्या मध्यरात्री घडलेल्या एका धक्कादायक घटनेने कारंजातील सुरक्षा व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

बिहाडी रोड परिसरातील बांधकाम ठेकेदार विशाल भांगे यांच्या घरी रात्री सुमारे अडीच वाजताच्या सुमारास चोरट्यांनी मागील दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. घरातील हॉल व स्वयंपाकघरात त्यांनी मुक्त संचार केला. विशेष म्हणजे, चोरट्यांनी घरातील वृद्ध महिलेला खोलीत कोंडून ठेवत दरवाजा बाहेरून बंद केला, तर दुसऱ्या बाजूला झोपलेल्या विशाल भांगे यांच्या बेडरूमचा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला.

दरवाजा फोडण्याच्या प्रयत्नात झालेल्या मोठ्या आवाजामुळे विशाल भांगे जागे झाले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन त्यांनी तत्काळ शेजारी राहणाऱ्या भावाला फोन केला. भावाने बाहेर येताच लाईट सुरू केली आणि परिसर उजळताच चोरट्यांनी घटनास्थळावरून पळ काढला.

या प्रकारात चोरट्यांना चोरी करण्यात यश आले नसले तरी त्यांची हालचाल घराच्या आवारातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण अधिकच गडद झाले असून, नागरिकांकडून रात्रीच्या गस्त वाढवण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत असून, नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित होत आहे.

---

# गैरवर्तनाची ठिणगी, काजळसरात भीषण राडा; पोलिसांचा लाठीचार्ज



**देवळी जनमाध्यम :** तालुक्यातील काजळसरा येथे धार्मिक स्थळासमोर सुरू असलेल्या जेवणाच्या कार्यक्रमात महिलेशी गैरवर्तन झाल्याने वातावरण पेटले आणि संतापाचा उद्रेक झाला.

१५ तारखेला घडलेल्या या घटनेत परिस्थिती एवढी बिघडली की नागरिकांना पांगवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. या प्रकरणी रवींद्र भानुदास दुधे (रा. काजळसरा) याच्याविरुद्ध देवळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जेवणाचा कार्यक्रम सुरू असताना आरोपी रवींद्र दुधे हा तेथे येऊन उपस्थित नागरिक व महिलांना विनाकारण शिवीगाळ करू लागला. त्याच्या या कृत्यामुळे वातावरण चिघळले आणि आयोजक व आरोपी यांच्यात शाब्दिक खडाजंगी झाली. काही वेळातच हा वाद हाणामारीपर्यंत पोहोचला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले.

### तणाव, दगडफेक अन् घेराव

या घटनेनंतर गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. संतप्त जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. काही अज्ञातांनी पोलिसांच्या वाहनांवर दगडफेक केल्याने शासकीय वाहनांचे नुकसान झाले. दरम्यान, संतप्त महिलांनी आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करत देवळी पोलिस ठाण्याला घेराव घातला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी दंगल नियंत्रण पथकही घटनास्थळी दाखल करण्यात आले होते.

दरम्यान, पीडित महिलेच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध विनयभंगाच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती देवळी पोलिसांनी दिली.

---

# धनादेश अनादरात जामीनदाराला शिक्षा

## सहा महिन्यांचा कारावास; ५ लाखांचा दंड व भरपाईचा आदेश



**वर्धा जनमाध्यम :** धनादेश अनादराच्या प्रकरणात येथील न्यायालयाने जामीनदाराला दोषी ठरवत शिक्षा सुनावली आहे. व्यावसायिक रितेश भरतभाई गांधी यांना सहा महिन्यांचा साधा कारावास तसेच ५ लाख रुपयांचा दंड व भरपाई देण्याचे आदेश देण्यात आले. दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त चार महिन्यांच्या कारावासाची शिक्षा भोगावी लागेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

तृतीय अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी स्वाती फुलबांधे यांनी हा निकाल दिला.

मिळालेल्या माहितीनुसार, २०१९ मध्ये विशाल भाके यांनी जय महाकाली नागरी सहकारी पतसंस्था, वर्धा येथून ४ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जासाठी रितेश गांधी यांनी जामीनदार म्हणून जबाबदारी स्वीकारली होती. कर्जफेडीसाठी त्यांनी पतसंस्थेला ४ लाख रुपयांचा धनादेश दिला, मात्र खात्यात पुरेशी शिल्लक नसल्याने तो वटला नाही.

पतसंस्थेकडून वारंवार मागणी करूनही रक्कम जमा न झाल्याने अखेर न्यायालयात दावा दाखल करण्यात आला. सुनावणीदरम्यान सादर पुरावे आणि युक्तिवाद विचारात घेऊन न्यायालयाने गांधी यांना दोषी ठरवत शिक्षा सुनावली. या प्रकरणात फिर्यादी संस्थेच्या वतीने ॲड. अमोल पी. तळवेकर यांनी बाजू मांडली.

---

# खंडाळ्यात गोठ्याला भीषण आग; कापूस, वैरण व शेती साहित्य जळून खाक

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील खंडाळा येथे गुरुवारी दुपारी लागलेल्या भीषण आगीत शेतकऱ्याच्या गोठ्याची पूर्णपणे राखरांगोळी झाली. या आगीत कापूस, जनावरांची वैरण तसेच शेतीसाठी लागणारे महत्त्वाचे साहित्य जळून खाक झाले असून, सुमारे ३ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

खंडाळा येथील शेतकरी अभय कृष्णाजी निनावे यांच्या शेतातील गोठ्याला १६ एप्रिल रोजी दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. सुरुवातीला किरकोळ वाटणारी आग काही क्षणांतच भडकली आणि वाऱ्याच्या झोतामुळे तिने रौद्र रूप धारण केले. आगीच्या ज्वाळांनी संपूर्ण गोठा आपल्या विळख्यात घेतला.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. उपलब्ध साधनसामग्रीच्या सहाय्याने आग विझवण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र, आगीचा वेग प्रचंड असल्याने ती आटोक्यात येईपर्यंत मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. गोठ्यात साठवलेला २० ते २५ क्विंटल कापूस, जनावरांची वैरण, स्प्रे पंप, स्प्रिंकलर पाईप व इतर शेती उपयोगी साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले.

---

# आंजीत टाटा मॅजिकची धडक; एकाचा मृत्यू



**आंजी (मोठी) जनमाध्यम :** वर्धा-आर्वी मार्गावरील आंजी (मोठी) येथील बसस्टॉप चौकात गुरुवारी सायंकाळी भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अरुण मोतीराम भावरकर (५५) हे चिंतामणी ग्रामीण पतसंस्थेत डेली कलेक्शनचे काम करीत होते. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ते बसस्टॉप चौकात असताना आर्वीकडून येणाऱ्या एम एच ३२ एजे ४४६५ क्रमांकाच्या टाटा मॅजिकने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर स्थानिकांनी तातडीने मदत करत भावरकर यांना ॲम्बुलन्सने सावंगी येथील रुग्णालयात हलवले. मात्र उपचारासाठी नेत असतानाच त्यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला होता. स्थानिक नागरिकांनी पाठलाग करून येळाकेळी चौकात वाहन अडवले. पोलिसांनी गाडी ताब्यात घेत आंजी पोलिस चौकीत जमा केली आहे. वर्धा-आर्वी मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून, बाजाराच्या दिवशी येथे विशेषतः गर्दी वाढते. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक नियंत्रणासाठी कायमस्वरूपी पोलिस बंदोबस्त व बॅरिकेड्स उभारण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस कर्मचारी विनोद सानप करीत आहेत.

---

# ग्रामीण युवक आणि महिलांना उद्योजक बनविणार-मंत्री पंकजा मुंडे

## २५ कोटींच्या विविध विकासकामांचे भुमीपूजन




**वर्धा जनमाध्यम :** ग्रामीण भागातील जनतेने रोजगारासाठी शहरांकडे धाव घेण्यापेक्षा गावातच राहून स्वतःचा उद्योग उभा करावा. आमचे सरकार केवळ योजना जाहीर करत नाही, तर ग्रामीण तरुणांना आणि महिलांना स्वतःच्या पायावर उभे करित आहे. ग्रामीण युवक व महिलांना काम देणारा उद्योजक बनवल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.

सालोड (हिरापूर) येथे गोट मार्केट यार्ड, परिवहन विभागाच्या कार्यालयाची संरक्षण भिंत, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि विविध विकासकामांच्या २५ कोटी रुपयांच्या कामांचे भूमीपूजन मंत्री पंकजा मुंडे व पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी त्या बोलत होत्या. आमदार राजेश बकाणे, माजी खासदार रामदास तडस, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, वर्धा नगर परिषदेचे उपाध्यक्ष प्रदीपसिंह ठाकूर, सालोडचे सरपंच अमोल कन्नाके, उपसरपंच आशिष कुचेवार, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्नेहा मेढे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्निल बेले, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.जगदीश बुकतारे, कार्यकारी अभियंता एकनाथ टिकले, जिप बांधकामचे कार्यकारी अभियंता शुभम गुंडतवार, राहुल चोपडा आदी उपस्थित होते.

गोट मार्केट यार्डमुळे वर्धा जिल्ह्यात आता वेगवेगळ्या जातींच्या शेळ्या-मेंढ्यांचे संशोधन आणि प्रदर्शन होईल. यासाठी मोठे क्लस्टर तयार करण्यात येत आहे. ग्रामीण भागात 'गवळाऊ' जातीच्या गायींचे संवर्धन करणाऱ्या गवळी समाजाच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे आहे. या जातीच्या गायींची संख्या आणि दुधाचा दर्जा वाढवण्यासाठी आम्ही सर्व मिळून विशेष प्रयत्न करणार आहोत, असे पंकजा मुंडे यांनी सांगितले.

युवकांसाठी नवीन योजनांची माहिती देताना त्यांनी सांगितले की, ग्रामीण उद्योजकांसाठी सरकार ५० टक्के अनुदान देते. यासोबतच सोलर युनिट्ससाठी सबसिडी आणि व्याजात सवलत देऊन तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले जाणार आहे. तुम्ही गावातच उद्योग करा, असे आवाहन मंत्री पंकजा मुंडे यांनी तरुणांना केले. महिलांशी संवाद साधतांना पंकजा मुंडे यांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे कौतुक केले. वर्षाला १८ हजार रुपये देऊन महिलांचा स्वाभिमान जपत आहेत. आज महिलांना एसटी प्रवासामध्ये सुट देण्यात येते, त्यामुळे त्या स्वतःच्या हिमतीवर कुठेही जाऊ शकतात. आई मुलाला जन्म देते, पण त्याचे पोषण करण्याचे आणि त्याला सुदृढ करण्याचे काम अंगणवाडी ताई करतात. कुपोषणमुक्त महाराष्ट्र घडवण्यात त्यांचे योगदान मोलाचे आहे, असेही त्या म्हणाल्या.

### गोट मार्केट यार्ड संकल्पना मॉडेल योजना ठरू शकते-पालकमंत्री पंकज भोयर

गोट मार्केट यार्ड ही संकल्पना ग्रामीण युवकांना रोजगार उपलब्ध करून देणारी ठरणार असल्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांनी स्पष्ट केले. सालोडचा हा प्रकल्प राज्यातील इतर भागांसाठी 'मॉडेल योजना' ठरू शकतो. सालोडमधील युवकांनी नवीन प्रयोग करून गोट मार्केट यार्डला जिल्हास्तरावरून राज्यस्तरावर नेण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. पालकमंत्री आणि आमदार म्हणून सदैव त्यांच्या पाठीशी राहण्याची ग्वाही पालकमंत्र्यांनी दिली. गेल्या दहा ते अकरा वर्षांत केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून ग्रामविकासाच्या अनेक योजना सालोडमध्ये प्रभावीपणे राबविल्या. २०१५ सालोड हे मोठे गाव दत्तक घेऊन ते आदर्श गाव म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेतला होता. निधीअभावी अनेकांनी लहान गावांची निवड केली असताना, सालोडच्या विकासासाठी पुढाकार घेतल्याचे त्यांनी नमूद केले. गावकऱ्यांच्या पाठिंब्यामुळे आणि स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या आशीर्वादामुळे गावात मोठ्या प्रमाणावर विकासकामे करता आली, असे त्यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षानिमित्त पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे व पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी कृषि सखी, पशु सखी व उत्कृष्ट महिला शेतकरी यांचा सत्कार केला. कार्यक्रमाच्या सुरूवातीस मान्यवरांनी विविध विभागाच्या स्टॉलला भेट देऊन पाहणी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आशिष कुचेवार यांनी केले तर संचलन पल्लवी पुरोहित यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर

**मुंबई / प्रतिनिधी**

विधान परिषदेच्या ९ जागांसाठी येत्या १२ मे रोजी मतदान होणार आहे. निवडणूक आयोगाकडून विधान परिषदेच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या निवडणुकीच्या माध्यमातून जास्तीत जास्त सदस्य विधान परिषदेवर पाठवण्याची महायुती सरकारची तयारी आहे. संख्याबळ पाहता विरोधी महाविकास आघाडीला सदस्य निवडून आणण्यासाठी कसरत करावी लागणार आहे. या निवडणुकीत सर्वाधिक भाजपाचे सदस्य निवडून येतील इतके संख्याबळ त्यांच्याकडे आहे.

निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार १२ मे रोजी सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ पर्यंत मतदानाची वेळ असेल. या ९ जागांसाठी २३ एप्रिलला परिपत्रक निघेल. त्यानंतर ३० एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आहे. २ मेपर्यंत उमेदवारी अर्जांची छाननी होईल. ४ मे उमेदवारी



अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. १२ मे रोजी या जागांसाठी निवडणूक होईल. त्यानंतर १२ मे रोजीच संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी सुरू होईल.

विधान परिषदेच्या ९ जागा १३ मे रोजी रिक्तहोत आहेत. त्यात संजय केणेकर, रणजितसिंह मोहिते पाटील, उद्धव ठाकरे, नीलम गो-हे, संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, राजेश राठोड आणि शशिकांत शिंदे हे विद्यमान सदस्य निवृत्त होत आहेत. महाराष्ट्र विधान परिषदेचे एकूण ७८ सदस्य आहेत. त्यातील ३० सदस्य विधानसभा सदस्यांमार्फत निवडले जातात. त्यातील ९ जणांची मुदत येत्या १२ मे रोजी संपत आहे. नुकताच अर्थसंकल्पीय अधिवेशनात या सदस्यांचा निरोप सोहळा पार पडला.

**महायुतीला ८ तर मविआच्या पारड्यात १ जागा-** आमदारांच्या संख्याबळावरून विधान परिषदेच्या ९ जागांसाठी होणा-या निवडणुकीत महायुतीला ८ तर महाविकास आघाडीला केवळ १ जागा मिळेल असे चित्र आहे. उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर जाणार का याबाबत अद्याप अनिश्चितता आहे. जरी उद्धव ठाकरे जाण्याची शक्यता असली तरी मविआमध्ये एका जागेसाठी रस्सीखेच असेल. काँग्रेस एका जागेसाठी अडून बसली तर मविआत पेच निर्माण होईल. भाजपा व अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडे असणा-या अतिरिक्त मतांच्या आधारे महायुतीची आठवी जागा निवडून येउ शकते.



# महाराष्ट्र 'रेड झोन'मध्ये

## ऊष्माघातामुळे 3 जणांचा मृत्यू
## 30 वर्षांच्या तरूणाचे बस स्थानकावर निधन

**मुंबई /प्रतिनिधी-**महाराष्ट्रात सूर्य आग ओकतोय. सकाळी सात वाजल्यापासूनच कडाक्याचे उन जाणवत असून राज्य उष्णतेच्या रेड झोनमध्ये आले आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, राज्यातील काही जिल्ह्यांचा समावेश अति उच्च उष्णता धोका श्रेणीत करण्यात आला आहे. उष्माघातामुळे राज्यात ३ जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. अकोला, हिंगोली आणि वाशिम या ठिकाणी उष्माघातामुळे ३ जणांचा मृत्यू झाला आहे. हिंगोलीत बस स्थानकावर ३० वर्षांच्या तरुणाचा मृत्यू झाला तर वाशिममध्ये ४ दिवसांपूर्वी उष्माघातामुळे एकाचा मृत्यू झाला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांचे तापमान ४० च्या पुढे गेल्याची नोंद झाली आहे. उष्माघातामुळे हिंगोलीमध्ये पहिला बळी गेला आहे. हिंगोली शहरातील बस स्थानक परिसरात ३० वर्षीय तरुणाचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे अशी माहिती हिंगोलीच्या शासकीय रुग्णालयातील डाक्टरांनी दिली आहे. शेख रफिक शेख उस्मान असे उष्माघाताने मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. दरम्यान हिंगोली जिल्ह्यात सध्या तापमानाने मोठा उच्चांक गाठला आहे, सकाळी आठ वाजल्यापासून तापमानाचा पारा वाढण्यास सुरुवात होत आहे तर दुपारी चार वाजेपर्यंत हिंगोली जिल्ह्यात तापमानाचा पारा हा ४० अंश से. वर पोहोचला आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

**वाशिममध्ये उष्माघातामुळे एकाचा मृत्यू-**वाशिमच्या अनसिंग येथील नर्सरी परिसरात एका ४५ वर्षीय इसमाचा मृतदेह कुजलेल्या स्थितीत आढळून आल्याने खळबळ उडाली. बुधवारी मृतदेह आढळून आला. मृत व्यक्ती अनसिंग पोलिस स्टेशन हद्दीतील शेलू बु. येथील केशव गाढे आहे. त्याचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मृतदेह ४ ते ५ दिवसा अगोदरचा असल्याचा अंदाज आहे.

**सूर्य आग ओकतोय, काळजी घ्या..**मागील काही दिवसांपासून विदर्भासह महाराष्ट्र होरपळला आहे. सूर्य आग ओकत असल्यामुळे अनेक जिल्ह्यांचे तापमान ४० च्या पार गेले आहे. महाराष्ट्रात पुढील तीन दिवस अतिउष्णतेचा इशारा देण्यात आला आहे. गरज नसेल तर दुपारी घराबाहेर न पडण्याचा सल्ला आरोग्य विभागाकडून देण्यात आला आहे. अकोला, नंदुरबारसह विदर्भातील ४ जिल्हे देशातील सर्वोच्च तापमानात आले आहेत. सकाळी ७ वाजल्यापासूनच तापमानात वाढ झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे अनेकांना त्रास वाढत आहे. त्यामुळे राज्यात अनेकजण रुग्णालयात उपचार घेत आहेत.

**राज्यात उष्माघाताचे १७ रुग्ण-** मागील दीड महिन्यात उन वाढल्याने राज्यात उष्माघाताचे १७ पेक्षा जास्त रुग्ण आढळून आले आहेत. एक मार्च ते १५ एप्रिलदरम्यान उष्माघाताच्या १७ रुग्णांची नोंद झाली आहे. रत्नागिरी आणि पुणे जिल्ह्यांत सर्वाधिक रुग्ण आढळले आहेत. राज्यात आतापर्यंत उष्माघातामुळे एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक चार रुग्णांची नोंद झाली आहे. पुणे जिल्ह्यात तीन रुग्ण आढळले आहेत. जालना आणि पालघर येथे प्रत्येकी दोन रुग्ण नोंदवण्यात आले आहेत. पुणे जिल्ह्यात आढळलेल्या तीन रुग्णांपैकी दोन रुग्ण बुधवारी आढळले. गडचिरोली, गोंदिया, जळगाव, नंदुरबार, नाशिक आणि रायगड या जिल्ह्यांत प्रत्येकी एका रुग्णाची नोंद झाली आहे.

## चेक क्लिअरन्ससाठी विलंब झाल्यास बँक जबाबदार

**नवी दिल्ली** : बँकेने कोणत्याही योग्य कारणाशिवाय ग्राहकाचा चेक वेळेत क्लिअरन्ससाठी सादर केला नाही, तर ती सेवेतील त्रुटी मानली जाईल असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने १५ एप्रिल रोजी दिला. या प्रकरणी न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत कॅनरा बँकेला ठोठावलेला दंड कायम ठेवला आहे.संबंधित ग्राहकाने २९ मे २०१८ रोजी एकूण १,०६,१०,७६८ रुपयांचे दोन धनादेश (चेक) कॅनरा बँकेत जमा केले होते. या दोन्ही चेकची वैधता २ जून २०१८ रोजी संपणार होती. सुरुवातीला बँकेने तांत्रिक कारणास्तव हे चेक परत आल्याचे सांगितले. बँकेने ते तात्काळ पुन्हा सादर करणे आवश्यक होते, परंतु बँकेने विलंब केला. परिणामी, मुदत संपल्यानंतर ते चेक सादर केले गेल्याने जुना चेक म्हणून नाकारले गेले.

बँकेने ३० आणि ३१ मे रोजी पुकारलेल्या बँक संपाचे कारण देत विलंब समर्थनीय असल्याचा दावा केला होता. मात्र, न्यायालयाने हा दावा फेटाळून लावला. संपानंतर १ आणि २ जून हे कामकाजाचे दिवस उपलब्ध असतानाही बँकेने चेक सादर का केले नाहीत? असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला.

# डेटिंगच्या जाळ्यात अडकल्या 500 महिला

## लग्नाचे आमिष दाखवून २ कोटींचा गंडा घालणारा महाठग जेरबंद

**नवी दिल्ली :** चित्रपट असो वा नाटक वेगवेगळ्या ओळखी सांगून महिलांना प्रेमाच्या जाळ्यात ओढणा-या आणि त्यांची लाखो रुपयांची फसवणूक करणा-या ठगांच्या गोष्टी तुम्ही आजवर पडद्यावर पाहिल्या असतील. अशीच फिल्मी स्टाईल फसवणुकीची घटना समोर आली आहे. एका ठगाने तब्बल ५०० हून अधिक महिलांची सुमारे २ कोटी रुपयांची फसवणूक केली असून दिल्ली सायबर पोलिसांनी त्याला अटक केली आहे. त्याच्याकडून चार मोबाईल फोन, आठ सिमकार्ड, तीन डेबिट कार्ड आणि फसवणुकीच्या पैशातून खरेदी केलेले सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. मॅच, डेट, नाटक आणि फसवणूक या चार शब्दांभोवती पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा येथील रहिवासी आनंद कुमार याचे आयुष्य फिरत होते. कुमार डेटिंग आणि मॅट्रिमोनिअल (वैवाहिक) अ‍ॅप्सवर कधी डाक्टर, कधी व्यावसायिक, चित्रपट निर्माता तर कधी वकील असल्याची खोटी ओळख सांगून महिलांशी संपर्क साधायचा. काही काळानंतर तो त्यांच्याशी भावनिक नाते निर्माण करायचा आणि लग्नाचे आमिष दाखवायचा. काही प्रकरणांमध्ये त्याने मॉडेलिंगच्या संधी आणि नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवून देण्याचे आश्वासनही दिले होते.



**लग्नाचे आमिष दाखवून लूट**

डेटिंगच्या काळात कुमार ओळख झालेल्या महिलेबरोबर भावनिक नाते निर्माण झाल्याचे नाटक करायचा. यानंतर ओळख वाढवून लग्नाचे आमिषही दाखवायचा. याच काळात आपण खूपच दुःखी असल्याचे सांगायचा. मोठा आजार किंवा व्यवसायात झालेले नुकसान किंवा कौटुंबिक समस्या असल्याचे सांगायचा. महिलेची सहानुभूती मिळवून आर्थिक मदत मागायचा. एकदा का पैसे मिळाले की, तो गायब होत असे.

**एका महिलेची पोलिसात तक्रार**

एका पीडित महिलेने तक्रार दाखल केली. वैभव अरोरा नावाच्या इंस्टाग्राम प्रोफाईलवरून एका व्यक्तीने आपली ७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप तिने केला. या दोघांची ओळख एका डेटिंग अ‍ॅपवर झाली होती, त्यानंतर ते इंस्टाग्राम आणि व्हाट्सअ‍ॅपवर बोलू लागले. अरोराने तिला लग्नाचे वचन दिले आणि नंतर विविध कारणांनी तिच्याकडून पैसे उकळले. जेव्हा पीडितेने पैसे परत मागितले, तेव्हा त्याने प्रतिसाद देणे बंद केले. वैभव अरोरा याचा मृत्यू झाला असल्याचा दावाही त्या इंस्टाग्राम अकाउंटवरून करण्यात आला.

**तपासातून धक्कादायक वास्तव समोर-**या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एक विशेष पथक स्थापन करण्यात आले. पोलिसांनी आरोपीचा मोबाईल क्रमांक, सोशल मीडिया खाती आणि आर्थिक व्यवहारांची बारकाईने चौकशी केली. तपासात असे निष्पन्न झाले की, वैभव अरोरा बनून फसवणूक करणारा हा व्यक्ती प्रत्यक्षात पश्चिम बंगालचा रहिवासी आनंद कुमार आहे. सायबर पोलिसांनी बंगालमध्ये अनेक ठिकाणी छापे टाकून आरोपीला अटक केली.चौकशीत असे समोर आले की, कुमार एकाच वेळी अनेक नावांनी वावरत होता. त्याने डॉ. रोहित बहल, तरुण आणि आनंद शर्मा अशा वेगवेगळ्या नावांनी प्रोफाईल्स चालवले होते; अगदी शिखा या नावानेही तो सक्रिय होता. पोलिसांपासून वाचण्यासाठी तो अनेक मोबाईल फोन आणि विविध सिमकार्ड वापरत असे.

## पत्नीला पेट्रोल टाकून जीवंत जाळले
### सोलापूर येथील धक्कादायक घटना

**सोलापूर :**सोलापुरात पती-पत्नीच्या वादातून एका धक्कादायक घटनेने खळबळ उडाली आहे. फैजान शेखने पत्नी नर्गिसला पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न केला. गंभीर भाजलेल्या नर्गिसवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. लग्नाच्या काही महिन्यातच घटस्फोटाच्या वादातून हा प्रकार घडला. आरोपी पती फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. ही घटना घरगुती हिंसाचाराचे भयाण रूप दर्शवते.

सोलापुरात एक अत्यंत भयानक प्रकार घडला. लग्नाला दोन तीन महिनेच झाले होते. त्यातच दोघांच्या कुरबुरी वाढल्या. त्या इतक्या टोकाला गेल्या की संतप्त नव-याने पत्नीला पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे संपूर्ण सोलापुरात एकच खळबळ उडाली आहे. सोशल मीडियावरही याच घटनेवर जोरदार प्रतिक्रिया उमटत आहेत.सोलापूर शहरातील लोकमान्य नगर परिसरातील ही घटना आहे. या घटनेत महिला गंभीर जखमी झाली आहे. फैजान जावेद शेख असे आरोपी पतीचे नाव आहे. तर नर्गिस शेख असे पीडीत पत्नीचे नाव आहे. सुदैवाने ही महिला वाचली असून तिच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, ती गंभीर भाजली आहे.२०२४ साली नर्गिस आणि फैजान या दोघांचा विवाह झाला होता. मात्र लग्नाच्या अवघ्या २-३ महिन्यातच दोघांमध्ये वाद होउ लागल्याने दोघेही वेगळे राहत होते. तलाक देण्याच्या कारणावरून मागील काही दिवसापासून दोघांत सातत्याने वाद होत होते. काल बुधवारी रात्री १० च्या दरम्यान आरोपी फैजान हा नर्गिसच्या घरी आला आणि पत्नी सोबत बोलायचे असल्याने सांगून तिला एका खोलीत नेले. तिथे दोघांमध्ये परत वाद झाला. त्यानंतर संतप्त आरोपीने पत्नीच्या अंगावर पेट्रोल टाकले आणि तिला लायटरने पेटवून देउन फरार झाला.घरात आग लागल्याचे पाहून शेजारी धावत आले. त्यातच नर्गिसच्या ओरडण्याचा आवाज ऐकून लोक धावत सुटले. शेजा-यांना नर्गिसच जळत असल्याचे दिसली. त्यानंतर शेजारी आणि कुटुंबीयांना तात्काळ आग विझवली आणि कुटुंबियांनी नर्गिसला गंभीर अवस्थेत सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# इंधनाअभावी मोबाईल टॉवर बंद होणार?

## ■ मोबाईलचे नेटवर्क गायब होउ शकते ■ इंधन संकटामुळे सर्व स्तरांना बसणार फटका

**नवी दिल्ली** : अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील युद्धामुळे इंधन संकटाचे ढग संपूर्ण जगावर दाटले आहेत. डिझेलचा पुरवठा कमी झाला असून याचा मोठा फटका टेलिक?म कंपन्यांना बसत आहे. केंद्र सरकारने परिस्थितीचा आढावा घेताना एक महत्त्वपूर्ण समस्या समोर आली आहे. टेलिक?म क्षेत्राला अत्यावश्यक सेवा मानले जात असले, तरी प्रत्यक्षात मात्र ट?वरसाठी लागणारे डिझेल मिळवताना या कंपन्यांना प्राधान्य मिळत नाही आहे.अनेक ठिकाणी टॉवर चालवण्यासाठी झिलवर आधारित प?वर बॅकअप लागतो. डिझेल न मिळाल्यास मोबाईल आणि इंटरनेट सेवा खंडित होउ शकते. तसेच रुग्णालय, पोलिस आणि इतर महत्त्वाच्या सरकारी कामांमध्ये मोठे अडथळे येउ शकतात. टेलिक?म क्षेत्राला सरकारने अत्यावश्यक सेवा म्हणून घोषित केले असले, तरी प्रत्यक्षात मात्र वेगवेगळ्या राज्यांमध्ये डिझेल मिळवताना अनेक अडचणी येत आहेत. सध्या वीज जाण्याचे प्रमाण वाढले आहे, अशा वेळी ट?वर्स चालू ठेवण्यासाठी डिझेलची नितांत गरज आहे असे कंपन्यांनी सांगितले आहे. सरकारी नियमांची अंमलबजावणीच्या स्तरावर नीट अंमलबजावणी होत नसल्याने मोबाईल नेटवर्क आणि आपत्कालीन सेवा विस्कळीत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. केंद्र सरकार धोरणाची प्रत्यक्षात राज्य सरकार करत असलेल्या अंमलबजावणीत मोठी तफावत आहे.

केंद्र सरकारने दूरसंचार क्षेत्रासाठी नियम बनवले असले, अनेक राज्ये त्या नियमांचे पालन करण्यात अडचणी निर्माण करत आहेत. उदाहरणार्थ, मोबाईल टावर किंवा केबल टाकण्यासाठी लागणारी परवानगी देण्यास राज्य सरकारे उशीर लावतात आणि केंद्राने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा जास्त पैसे आकारतात.



राज्यांच्या अशा धोरणामुळे दूरसंचार कंपन्यांसमोर काम करताना मोठी आव्हाने उभी राहत असून, यामुळे सेवा पुरवण्यात अडथळे येउ शकतात.सध्या सुरू असलेल्या अमेरिका-इराण संघर्षामुळे उर्जा पुरवठ्यावर परिणाम होत असल्याने, दूरसंचार कंपन्यांनी इंधन आणि विजेच्या प्राधान्यप्राप्तीशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची मागणी केली आहे.देशात ड्रम किंवा कॅनमध्ये डिझेल विकण्यावर बंदी घातली आहे. मात्र, मोबाईल टावर्स चालू ठेवण्यासाठी डिझेल आणि एलपीजीची अत्यंत गरज असल्याने, या कंपन्यांनी सरकारकडे धाव घेतली. टेलिकाम सेवा विस्कळीत होउ नये म्हणून मोबाईल टावर साइट्सना प्राधान्याने वीज आणि इंधन पुरवठा मिळावा, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे.

**वीज तुटवड्याची मोठी समस्‍या**

अत्यावश्यक सेवा देखभाल कायदा, १९८१ (ईएसएमए) अंतर्गत दूरसंचार सेवांना अत्यावश्यक सेवा म्हणून, तसेच दूरसंचार कायदा, २०२३ अंतर्गत महत्त्वपूर्ण दूरसंचार पायाभूत सुविधा म्हणून परिभाषित केले आहे. याशिवाय, या सार्वजनिक उपयोगाच्या सेवा आहेत आणि इतर कायद्यांनुसार जीवनरेखा पायाभूत सुविधा आहेत, आणि म्हणूनच, अखंड नेटवर्क सेवा अत्यावश्यक आहे असे मनोज कुमार सिंह यांनी स्पष्ट केले आहे.

**तरच नेटवर्क अखंड सुरू राहील : दूरसंचार विभाग-** मागील आठवड्यात, दूरसंचार विभागाने राज्य सरकारांना विनंती केली की त्यांनी मोबाईल कंपन्यांना डिझेल खरेदी करण्याच्या नियमात थोडी सवलत द्यावी. सध्या अनेक ठिकाणी ड्रम किंवा गॅलनमध्ये डिझेल घेण्यावर बंदी आहे; पण मोबाईल टॉवर्स चालू ठेवण्यासाठी त्याची गरज असते. त्यामुळे, या कंपन्यांना गरजेनुसार डिझेल खरेदी, वाहतूक आणि साठवणूक करण्याची परवानगी द्यावी, असे विभागाने म्हटले आहे.








# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची बापुकुटीस भेट

**वर्धा, दि.१६ (जिमाका)** : भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सेवाग्राम येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे अनेक वर्ष वास्तव्य असलेल्या आश्रमास भेट दिली. या भेटीत त्यांनी प्रार्थना सभेत सहभाग घेतला तसेच परिसरात वृक्षारोपण केले.यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ.पंकज भोयर उपस्थित होते. आश्रमात आगमण झाल्यानंतर आश्रम प्रतिष्ठानच्यावतीने सचिव विजय तांबे व विश्वस्त चंदनपाल यांनी राष्ट्रपतींचे स्वागत केले. आश्रमात बापुंचे पहिले निवासस्थान असलेले आणि आता आदि निवास म्हणून ओळखाल्या जात असलेल्या आदि निवाससह बापुंचे अनेक वर्ष वास्तव्य असलेल्या बापु कुटीस भेट देउन पाहणी केली. सोबतच कस्तुरबा गांधी यांचे वास्तव्य असलेले बा निवास व बापुंच्या तत्कालिन कार्यालयास भेट देउन पाहणी केली. आश्रम प्रतिष्ठानचे सचिव विजय तांबे यांनी बापुंचे निवास व बापुंशी संबंधित अनेक बाबींची माहिती दिली. यावेळी राष्ट्रपतींनी चरख्यावर प्रत्यक्ष सुत कताई केली. आश्रम भेटीनंतर त्यांनी बापुकुटी परिसरात बेल प्रजातीच्या वृक्षाचे रोपण केले. यावेळी प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी वान्मथी सी, विशेष पोलिस महानिरिक्षक संदीप पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल तसेच आश्रम प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते.

प्रार्थनेस उपस्थिती, बेल वृक्षाचे केले रोपण

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'सम्राट' राज

'धनू किंवा मीन राशीतून सूर्याचे गोचर होते, तेव्हा सूर्याची ऊर्जा क्षीण होत असल्याने या काळात कोणतीही शुभकार्य करू नयेत, अशी उत्तरेच्या राज्यांतली श्रद्धा आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांची राज्यसभेवर निवड झाली १६ मार्च रोजी. त्यांनी राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली १० एप्रिल रोजी. पण, नियोजनाप्रमाणे त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला तो १४ एप्रिल २०२६ रोजी. वर सांगितलेला खरमास किंवा मलमास संपण्याची ते वाट बघत होते. काल सूर्याचे राशीपरिवर्तन झाल्याने हा काळ संपला आणि बिहारच्या सत्ता परिवर्तनाला वेग आला. आपल्या मंत्रिमंडळाची शेवटची बैठक घेऊन नितीश कुमार थेट लोकभवनात गेले आणि राज्यपालांकडे मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन मोकळे झाले. भाजपच्या विधिमंडळ पक्षाच्या गट नेतेपदी त्यानंतर लगेचच सम्राट चौधरी यांची निवड घोषित करण्यात आली. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान हे भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाचे प्रतिनिधी म्हणून त्यासाठी खास पाटण्याला गेले होते. चौधरी यांची मुख्यमंत्री म्हणून रीतसर घोषणा होईल. यावेळच्या विधानसभा निवडणुका झाल्यानंतर सरकार स्थापन करण्याआधीच भाजप आणि नितीश कुमार यांच्यात काही निर्णय झाले. नितीश कुमार यांनी सुरुवातीला मंत्रिमंडळ स्थापन करायचे; पण तीन चार महिन्यांनंतर होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीवेळी राज्यसभेत जायचे आणि बिहारचे मुख्यमंत्रीपद भाजपकडे विनासायास सुपूर्द करायचे, अशी ती योजना असावी. या सगळ्याच्या तारखाही तेव्हांच ठरल्या असाव्यात. कारण, कोणीच कसलीच खळखळ न करता अगदी सहजपणे घटना घडत गेल्या. चौधरी यांच्या मंत्रिमंडळात संयुक्त जनता दलाचे दोन उपमुख्यमंत्री योजण्यात आले असून त्यापैकी एक उपमुख्यमंत्रीपद नितीशपुत्र निशांत कुमार यांच्याकडे जाण्याची शक्यता आहे. दुसऱ्या उपमुख्यमंत्रीपदी विजय चौधरी यांची वर्णी लागेल, असा अंदाज आहे. गेली वीस वर्ष मुख्यमंत्री पदावर असलेल्या नितीश कुमारांनी पद देताना दोन उपमुख्यमंत्रीपदे पदरात पाडून घेतली आहेत. अन्य सत्ता पदांची वाटणी कशी ठरली आहे, ते येत्या महिन्याभरात स्पष्ट होईल.बिहारसारख्या राज्याच्या मुख्यमंत्रीपदी सलग २० वर्ष राहाणे, ही सोपी गोष्ट नाही. त्यामुळे, नितीश कुमार यांचा दिल्लीला प्रस्थान करण्याचा निर्णय बिहारच्या मतदारांच्या; अगदी त्यांच्या पक्षाच्या गळीही सहजासहजी उतरलेला नाही. पक्षातून निदर्शने झाली, बैठका झाल्या, मनधरणीही झाली. एका प्रतिष्ठित घेतलेल्या जनमत चाचणीत ५०.६ टक्के मतदारांनी नितीश कुमार यांच्या पद सोडण्याच्या निर्णयाबाबत नापसंती दर्शवली आहे. तरीही सत्तांतराची ही तडजोड कोणत्या अपरिहार्यतेतून झाली, हे समजायला मार्ग नाही. काही दिवसांनी या रहस्यावरचा पडदा दूर होईल, तोपर्यंत सम्राट चौधरी बिहार कसा सांभाळतात, ते कळेल. आधी राष्ट्रीय जनता दल, तिथून संयुक्त जनता दल आणि २०१७ मध्ये भारतीय जनता पक्ष असा सम्राट चौधरी यांचा प्रवास आहे. अवघ्या सहा वर्षांत ते भाजपचे उपमुख्यमंत्री झाले आणि आठ वर्षांत राज्याचे सर्वोच्च नेते झाले.भाजपचे बिहार प्रभारी, महाराष्ट्राचे खासदार विनोद तावडे यांची या निर्णय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका आहे.१९९० पासून बिहारचे राजकारण इतर मागासवर्गीय समाजाच्या हाती गेले आहे.२००५ नंतर ते या समाजातल्या अधिक छोट्या जातींच्या हाती गेले. बिहारच्या विधिमंडळात ५० टक्के सदस्य सध्या इतर मागासवर्गीय समाजाचे आहेत.अति मागास जातीचे ३७,सवर्ण ७१, मागास ३८, अल्पसंख्याक ११ आणि अनुसूचित जमातींचे २ असे तिथल्या विधानसभेचे आजचे चित्र आहे. नितीश कुमार यांच्या नंतरचा मुख्यमंत्रीही इतर मागासवर्गीय जातीतलाच असावा, असा बिहारमधला सूर आहे.पण,नव्या मुख्यमंत्र्याने केवळ जातीचे राजकारण न करता विकास आणि कायदा-सुव्यवस्थेवर लक्ष द्यावे, अशीही तिथल्या ५८.९ टक्के मतदारांची अपेक्षा आहे! नितीश कुमार यांच्या स्थलांतराच्या निर्णयाने बिहारच्या राजकारणाने ऐतिहासिक वळण घेतले आहे, हे खरंच आहे. १९९० पासून कालपर्यंत बिहारची सूत्रे सलग प्रादेशिक पक्षांच्या हाती होती. ती आता पुन्हा राष्ट्रीय पक्षाच्या हाती जात आहेत. गेली ३५ वर्ष विहारसाठी पाटणा हेच निर्णयांच केंद्र होते. आता सूत्र दिल्लीतून हलतील. लालूप्रसाद यादव यांनी 'सामाजिक न्यायाची भाषा करत अगदी खालच्या स्तरातील जातींना अस्तित्वाचं भान दिले. नितीश कुमार यांनी स्वतःची 'सुशासनवावू' अशी प्रतिमा निर्माण करून 'बिहारी अस्मिता' जागवली. नितीश कुमार आपल्या कारभाराची तुलना नेहमी लालूप्रसादांच्या राजवटीशी करत असत, आपले यश दाखवणे त्यामुळे त्यांना सोपे होते. सम्राट चौधरी यांना नितीश कुमार यांच्या राजवटीशी तुलना करत आपले यश सिद्ध करावे लागणार आहे. ते तितके सोपे नाही. २०११ च्या जनगणनेनुसार बिहारमध्ये जन्मलेले सुमारे ९० लाख लोक आपले पोट भरण्यासाठी स्थलांतरित मजूर म्हणून इतरत्र काम करताहेत. सम्राट चौधरी यांना या आघाडीवर सर्वप्रथम काही करावे लागेल. बिहारमधून होणारे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण कराव्या लागतील. जागतिक युद्ध परिस्थिती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात हे आव्हान निश्चितच सोपे नाही. गेल्या ३५ वर्षांत विहारमध्ये फार मोठा जातीय किंवा धार्मिक तणाव नाही. यापुढच्या काळात हे वातावरण बिघडले, तर त्याचा ठपका नव्या सरकारवर येईल. दोन उपमुख्यमंत्री, दिल्लीतून नितीश कुमार यांचे 'मार्गदर्शन' आणि पक्ष नेतृत्वाच्या पक्ष वाढीच्या अपेक्षा यात तोल सांभाळत सम्राट चौधरी यांना आपली छाप पाडायची आहे. भाजपने अव्याहत चिकाटी आणि प्रचंड संयमाने बिहारची सूत्र मोठ्या कष्टाने एकदाची मिळवली आहेत. उत्तर प्रदेशप्रमाणेच तिथेही पक्षाला स्थैर्य आणि वाढ हवी आहे. पण, त्याचे मार्ग इथे वेगळे असणार आहेत. ते मार्ग सम्राट चौधरी यांना किती लवकर सापडतात, यावर भाजपचे तिथले यश ठरणार आहे.

# बिहारमध्ये एका नव्या पर्वाला प्रारंभ



> सम्राट चौधरी हे मुळचे भाजपाचे नाहीत.त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पार्श्वभूमी नाही.त्यांचा राजकीय प्रवास राष्ट्रीय जनता दल ते संयुक्त जनता दल ते भाजपा असा झाला आहे.मात्र पक्ष नेतृत्वाचे त्यांना चांगले पाठबळ दिसत आहे.

२०२५ मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या दरम्यान भारताचे गृहमंत्री अमित शहा यांनी तारापूर मतदार संघात झालेल्या आपल्या प्रचार सभेत तेथील भाजपाचे उमेदवार सम्राट चौधरी यांच्याकडे निर्देश करुन सभेला उपस्थित असलेल्या लोकांना आश्वस्त केले होते की, सम्राट चौधरी यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणलेत तर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्यांच्याकडे महत्वाची जबाबदारी सोपवणार आहेत.अमित शहा यांनी आश्वासन दिल्यानुसार, सम्राट चौधरी यांच्याकडे बिहारचे मुख्यमंत्रीपद सोपवण्यात आले आहे.महत्वाची बाब म्हणजे, सम्राट चौधरी हे बिहार मधील भाजपाचे पहिले मुख्यमंत्री आहेत.२००५ सालापासून, बिहारमध्ये आपला मुख्यमंत्री विराजमान करण्याचा जो प्रयत्न भाजपाकडून सुरू होता,तो प्रयत्न आता फलद्रूप झाला आहे.२०२० च्या अगोदर, नितीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलाबरोबर दुय्यम भूमिकेत वावरणारी भाजपा आता बिहारमध्ये मोठ्या भावाच्या भूमिकेत आली असून बिहारचे मुख्यमंत्रीपद मिळवण्याचे भाजपाचे कित्येक दिवसांचे स्वप्न अखेर साकार झाले आहे.

२०२० मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाला नितीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलापेक्षा कितीतरी जागा जास्त मिळाल्यानंतरही भाजपाने बिहारचे मुख्यमंत्रीपद आपल्याकडे न घेता नितीशकुमार यांच्याकडे सोपवले होते. त्यानंतर २०२५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला ८९ जागा आणि संयुक्त जनता दलाला ८५ जागा मिळाल्या.यावेळीही संयुक्त जनता दलापेक्षा जास्त जागा मिळालेल्या भाजपाने मुख्यमंत्रीपद आपल्याकडे न ठेवता, नितीशकुमार यांच्याकडे सोपवले.त्यावेळी भाजपा आणि संयुक्त जनता दलामध्ये, नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रीपद मध्येच सोडण्याबाबत काही चर्चा झाली होती का,यासंबंधी कोणतीही माहिती बाहेर आली नव्हती.मध्यंतरी राज्यसभेच्या निवडणुकीची जेंव्हा घोषणा झाली तेंव्हा नितीशकुमार यांनी संयुक्त जनता दलातर्फे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तेंव्हा मुख्यमंत्रीपद सोडण्याचा त्यांचा इरादा स्पष्ट झाला.नितीशकुमार हे आपल्या पाच दशकांच्या राजकीय कारकीर्दीत दहा वेळा बिहारचे मुख्यमंत्री झाले.त्यांनी २१ वर्षे बिहारचे मुख्यमंत्रीपद सांभाळले. मुख्यमंत्रीपदाच्या आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांनी कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती मोठ्या प्रमाणात सुधारली आणि सुशासन बाबू असे नाव कमावले.

सम्राट चौधरी हे बिहारचे मुख्यमंत्री बनल्यानंतर नितीश पर्वाचा अंत झाला आहे.१९९९ साली सम्राट चौधरी यांनी राष्ट्रीय जनता दलातून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली.ते राबडीदेवी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये मंत्री होते.२०१४ साली त्यांनी संयुक्त जनता दलामध्ये प्रवेश केला.त्यांना पक्षाने विधानपरिषदेवर निवडून आणले.बिहारमध्ये अल्पकाळ मुख्यमंत्रीपद भुषवलेल्या जितनराम मांझी यांच्या सरकारमध्ये, सम्राट चौधरी यांनी मंत्रीपद सांभाळले होते.सम्राट चौधरी यांनी २०१७ मध्ये भाजपात प्रवेश केला.त्यांच्या कामाचा उरक पाहून २०२३ मध्ये त्यांच्याकडे बिहार भाजपाचे प्रदेशाध्यक्षपद सोपवण्यात आले.सम्राट चौधरी यांचे वडील शकुनी चौधरी हे समता पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते.नितीशकुमार आणि जॉर्ज फर्नांडिस यांनी समता पक्षाची स्थापना केली होती.शकुनी चौधरी हे सहा वेळा तारापूर मतदार संघातून निवडून आले होते.सम्राट चौधरी यांची आई एकदा तारापूर मतदार संघातून निवडून आली होती.स्वत: सम्राट चौधरी हे दोन वेळा तारापूर मतदार संघातून निवडून आले आहेत.अशाप्रकारे गेली अनेक वर्षे सम्राट चौधरी यांच्या कुटुंबातील कुणीतरी तारापूर मतदार संघातून निवडून येत आहे.थोडक्यात सम्राट चौधरी यांना राजकीय परंपरा आहे.२०१० साली झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय जनता दलाला केवळ २२ जागांवर विजय मिळाला होता.तेंव्हा संयुक्त जनता दल आणि भाजपा यांची लाट आली असतानाही त्या लाटेत सम्राट चौधरी यांनी राजदच्या तिकीटावर विजय मिळवला होता.एकंदरीत ते बिहारमधील मासबेस असलेले नेते आहेत.

२०२३ मध्ये सम्राट चौधरी यांच्याकडे भाजपाने प्रदेशाध्यक्षपद सोपवल्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही.२०२२ मध्ये नितीशकुमार यांनी भाजपाची साथ सोडली आणि ते राजदच्या नेतृत्वाखालील महाआघाडीत गेले आणि बिहारचे मुख्यमंत्री बनले.त्यानंतर सम्राट चौधरी यांनी नितीशकुमार यांच्यावर सातत्याने कठोर शब्दांत टीका केली होती.२०२४ साली नितीशकुमार यांनी महाआघाडीतून बाहेर पडून,भाजपा बरोबर जाण्याचा निर्णय घेतला आणि ते पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनले.त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये सम्राट चौधरी हे उपमुख्यमंत्री होते.त्यानंतर त्या दोघांनी एकमेकांशी चांगले जुळवून घेतले.बिहारचे माजी उपमुख्यमंत्री सुशीलकुमार मोदी यांचे नितीशकुमार यांच्या बरोबर अतिशय घनिष्ठ संबंध होते.तसेच घनिष्ठ संबंध सम्राट चौधरी आणि नितीशकुमार यांच्यात नंतर प्रस्थापित झाले.नितिशकुमार यांनी जेव्हा बिहारच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन राज्यसभेत जाण्याचा निर्णय घेतला तेंव्हा आपल्या जागी मुख्यमंत्रीपदावर सम्राट चौधरी यांची वर्णी लावण्यासाठी त्यांनी भाजपा नेतृत्वाकडे शब्द टाकल्याचे बोलले जात होते.भाजपा नेतृत्वाने बिहारचे मुख्यमंत्रीपद सम्राट चौधरी यांच्याकडे सोपवून नितिशकुमार यांच्या शब्दाचा मान राखल्याचे दिसून येत आहे.

सम्राट चौधरी हे नितीशकुमार यांच्या मर्जीतील असल्याने त्यांना नितीशकुमार यांचे मार्गदर्शन मिळू शकेल.शिवाय संयुक्त जनता दलाच्या नेत्यांकडून त्यांना चांगली साथ मिळू शकेल.नितिशकुमार यांना बिहारच्या मुख्यमंत्रीपदाचा प्रदिर्घ अनुभव असल्याने,त्यांचे मार्गदर्शन,सम्राट चौधरी यांच्यासाठी अतिशय मोलाचे ठरेल.सम्राट चौधरी हे मुळचे भाजपाचे नाहीत.त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पार्श्वभूमी नाही.त्यांचा राजकीय प्रवास राष्ट्रीय जनता दल ते संयुक्त जनता दल ते भाजपा असा झाला आहे.मात्र पक्ष नेतृत्वाचे त्यांना चांगले पाठबळ दिसत आहे.ते ओबीसी आहेत.बिहारमधील कुशवाहा या समाजातून ते आले आहेत.कुशवाहा समाजाची बिहारमध्ये ४ टक्के लोकसंख्या आहे.कुशवाहा हे कोएरी या नावानेही बिहारमध्ये ओळखले जातात.बिहारमध्ये कुशवाहा आणि कुर्मी या दोन्ही समाजाची मिळून ७ टक्के लोकसंख्या आहे.हा समाज नेहमी रालोआच्या पाठीमागे भक्कमपणे उभा राहिला आहे.बिहारमधील जातीची समिकरणे लक्षात घेऊनच,भाजपाने, मुख्यमंत्रीपद सम्राट चौधरी यांच्याकडे सोपवलेले दिसत आहे.आता पाहूया,भाजपा नेतृत्वाच्या अपेक्षा ते कितपत पूर्ण करतात.घोडा मैदान जवळच आहे.

**अभय गोखले**

# युद्धविराम करावाच लागेल

'न्यूयॉर्क टाइम्स' या अमेरिकेतील प्रतिष्ठित दैनिकाने असे म्हटले आहे की, इराण युद्धामुळे अमेरिकेची शक्ती क्षीण झाली आहे. तसेच त्या देशाचा जगावर असलेला नैतिक दबदबा देखील कमजोर झालेला आहे. उलट इराणची तेलव्यापारावरील पकड वाढताना दिसते आहे.

अमेरिकेत लोकशाही आहे. तिथली वृत्तपत्रे सरकारी धोरणांविरुद्ध निर्भीडपणे मते व्यक्त करू शकतात. इराण युद्ध सुरु झाल्यानंतर लाखो अमेरिकन नागरिकांनी रस्त्यांवर उतरून ट्रम्पच्या धोरणांचा निषेध केला आहे. तेथील काँग्रेसच्या (संसदेच्या) निवडणुका जवळ आल्या आहेत. ट्रम्प यांची लोकप्रियता झपाट्याने कमी होत आहे. एपस्टीन फाइल्स चा देखील परिणाम होत आहे. कॅथॉलिक ख्रिश्चन पंथाचे जागतिक धर्मगुरू म्हणजे सध्याचे पोप हे अमेरिकन आहेत. परंतु त्यांनी ट्रम्प यांच्या युद्धनीतीचा कडाडून विरोध केला आहे. स्वतःच्या बालिश स्वभावानुसार ट्रम्प यांनी लगेच फारसा विचार न करता पोप यांच्यावर वात्रट टीका सुरु केली. अमेरिकेत कॅथॉलिक नागरिकांची संख्या मोठी आहे. आपल्या धर्मगुरुंवर होणारी वाह्यात टीका ते सहन करणार नाहीत. युद्धामुळे महागाईचे चटके अमेरिकी नागरिकांनाही सोसावे लागत आहेत. त्यामुळे 'मी जिंकलो' असे ट्रम्प कितीही म्हणत असले तरी हे सगळे वास्तव त्यांना विसरता येत नाही. म्हणूनच इस्लामाबाद येथील इराणसोबतची चर्चा एकदा विफल झाली तरी पुन्हा चर्चेची तयारी ट्रम्प यांना दर्शवावी लागतेच.

इराण जवळ असेलला युरेनियम चा साठा अमेरिकेने ताब्यात घ्यावा व अण्वस्त्रे तयार करणार नाही अशी लेखी हमी घ्यावी, ही इस्त्राइलची- म्हणजे खरे तर नेतन्याहू यांची इच्छा आहे. तोपावेतो युद्ध विराम होऊ नये अशी खटपट ते करत राहतील. परंतु स्वतः नेतन्याहू यांच्यावर इस्त्राइल मध्ये गंभीर गुन्ह्यांचे खटले सुरु आहेत. त्यांची नरसंहारी धोरणे मान्य नसलेले अनेक ज्यू नागरिक इस्त्राइल मध्ये आहेत. एपस्टीन फाइल्स मध्ये असलेल्या काही गुपितांच्या आधारे नेतन्याहू हे ट्रम्प यांना ब्लॅकमेल करत असल्याच्याही चर्चा होतात.



सुमारे ८० वर्षापूर्वी स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघाचे जगातील सर्व स्वतंत्र देश सदस्य आहेत. ही घटना मानवजातीच्या इतिहासात अभूतपूर्व मानावी लागेल. प्रत्येक देशाच्या सार्वभौमत्वाचा इतर देश आदर बाळगतील आणि प्रत्येक देशाला स्वसंरक्षणाचा अधिकार राहील, हे धोरण त्यावेळी ठरले. तसेच सर्व देशांनी एकमेकांच्या सहकार्याने विकास साधावा आणि युद्ध टाळावे व त्यासाठी हळू हळू निरस्त्रीकरणाकडे वाटचाल करावी, असेही ठरले होते. निरस्त्रीकरण म्हणजे लांब पल्ल्यांची अस्त्रे विशेषतः अण्वस्त्रे -टप्प्याटप्प्याने नष्ट करणे होय. अमेरिका, सोवियत संघ, इंग्लंड, फ्रांस, चीन या मुठभर देशांजवळ अण्वस्त्रे होती. देशादेशांमधील शस्त्रास्त्र स्पर्धा कमी व्हावी आणि व्यापार वाढावा, ही तेव्हाची भावना होती. कारण पहिल्या दोन महायुद्धांचे भीषण परिणाम जगाने भोगले होते.

संयुक्त राष्ट्र संघाच्या (युनो) निर्मिती नंतर हळू हळू जगाची विभागणी तीन भागांत होऊ लागली. अमेरिका व पश्चिम युरोपीय देश ही एक महाशक्ती, रशिया व त्याच्या प्रभावाखालील साम्यवादी देश ही दुसरी महाशक्ती आणि उर्वरित शक्तीहीन देश हे तिसरे जग (थर्ड वर्ल्ड) म्हणून ओळखले जात. अमेरिका व रशिया मध्ये शीतयुद्ध सुरु असताना देखील त्या दोन्ही देशांनी आपसात चर्चा करून काही अण्वस्त्रे नष्ट करण्याची तयारी दर्शविल्याचे मला आठवते. तिसऱ्या देशांची आपसात एकजूट करून जागतिक राजकारणावर प्रभाव पडावा, या दृष्टीने नेहरूंच्या व इंदिरा गांधींच्या काळात भारताने पुढाकार घेतला होता.

रशियाच्या नेतृत्वातील सोवियत संघ कोसळून त्यातील घटक देश वेगवेगळे झाले त्यानंतर जगात अमेरिका हीच एक महाशक्ती शिल्लक राहिली. चीनने मात्र दिमाखदार प्रगती करून अमेरिकेच्या खालोखाल स्वतःची शक्ती वाढविली. भारत आणि पाकिस्तान यांनी अण्वस्त्रे निर्माण केलीत. सुरुवातीला जरी त्यावर अमेरिकेने काही निर्बंध घातले तरी नंतर ते काढून घेतले.

स्वतः जवळील अण्वस्त्रे सुरक्षित ठेवून जगातील इतर देशांनी मात्र त्यांची निर्मिती करू नये अशी दंडेली करण्याचा अमेरिकेला काहीही अधिकार नाही. अण्वस्त्रधारी देश जोपर्यंत स्वतःजवळची अण्वस्त्रे नष्ट करण्याची तयारी दर्शवित नाहीत, तो पर्यंत त्यांना इतर देशांना अण्वस्त्र निर्मितीपासून जबरदस्तीने वंचित ठेवण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही.

अणु - परमाणु हे ऊर्जेचेही स्त्रोत आहेत. खनिज तेलाचे साठे कधी ना कधी संपणार आहेत. त्यामानाने अणुऊर्जा अधिक स्वच्छ व टिकाऊ मानली जाते. भारतातही अणु ऊर्जेचा वापर होत आहेच. तसा वापर करणारा प्रत्येक देश कधीतरी अण्वस्त्र निर्मितीकडेही वळू शकतो. आपण अण्वस्त्रांची निर्मिती केलेली नाही, असा इराणचा दावा आहे. ओबामा अध्यक्ष असताना अमेरिकेसोबत केलेल्या करारात इराणने तशी हमीही दिलेली होती. परंतु तो करार ट्रम्प यांनी स्वतःच रद्द करून टाकला.

इराण मधील धार्मिक राजवटीविरुद्ध त्याच देशात मोठा असंतोष निर्माण झाला होता. इस्त्राइलच्या चिथावणीवरून अमेरिकेने उतावळा हस्तक्षेप केला नसता व इराणच्या नेतृत्वाच्या पहिल्या फळीला ठार केले नसते, तर कदाचित यथावकाश इराण मध्ये तेथील राजवट बदलली असती किंवा सध्याची राजवट अधिक उदार झाली असती.

चीन, रशिया व युरोपीय देशांचा एकूण दबाव येऊन अमेरिका व इराणला पुन्हा नव्याने करार करावा लागेल, अशी चिन्हे दिसत आहेत. इराणमधील अंतर्गत घडामोडीत अमेरिका हस्तक्षेप करणार नाही; युरेनियम पासून ऊर्जा निर्मिती करण्याचा इराणला अधिकार राहील, परंतु तो देश अण्वस्त्र निर्मिती न करण्याची हमी देईल अश्या आशयाचा तह त्यांच्यात होईल अशी शक्यता वाटते.

**किशोर देशपांडे**

# संवाद

## 'बेटी जागाओ, बेटी बचाओ' उपक्रम

नाशिक येथे घडलेल्या कार्पोरेट जिहादच्या घटनेमुळे सर्वत्र अस्वस्थता आणि असंतोष निर्माण झाला आहे. सरकारकडून हालचाली सुरू असल्या तरी मूलभूत प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे, तो म्हणजे मुली अशा सापळ्यात अडकतातच कशा? केंद्र सरकारच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या उपक्रमामुळे मुली शिक्षणातच नाही तर उच्च शिक्षित झाल्या, करिअरमध्ये आणि विविध क्षेत्रांत अग्रस्थानी पोहोचल्या. आज त्या फायटर पायलटपासून प्रशासकीय अधिकाऱ्यांपर्यंत सर्वच ठिकाणी आपली छाप पाडत आहेत.मात्र, या प्रगतीसोबत त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे. उच्च शिक्षण असूनही जर मुली अशा घटनांना बळी पडत असतील, तर केवळ शिक्षण पुरेसे नाही, हे स्पष्ट होते. यासाठी त्यांना धर्मशिक्षण देणे, त्या नुसार धर्माचरण करण्यास प्रोत्साहित करणे आणि स्वतःच्या मूळ शक्ती रूपाची ओळख करून देण्याची आवश्यक आहे.तसेच,संरक्षणाचे प्रशिक्षण देऊन तिला जागृत आणि खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे सरकारने आता 'बेटी जागाओ, बेटी बचाओ' उपक्रम हाती घ्यायला हवा असे वाटते.सरकारने आणि समाजातील प्रत्येकाने जागृत राहून मुलींच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी प्रयत्न केले, तरच असे लव्ह जिहाद सारख्या गंभीर प्रकारांना आळा बसेल.

**प्रांजली ब्रम्हे**

## हवामान खात्याने अचूक अंदाज वर्तवणे महत्वाचे

यंदाच्या वर्षी पाऊसमान कमी असल्याचे वृत्त समोर आले आहे.हवामान अंदाजासाठी प्रसिद्ध असलेल्या भारतीय हवामान खात्याने देशांत ९० ते ९५ टक्के पाऊस बरसेल असे भाकीत केल्याने यंदा पर्जन्यमान भारतीय उपखंडावर नाराज होणार की काय ? असा सवाल शेतकरी वर्गातून विचारला जात आहे जून ते सप्टेंबर दरम्यान अल निनोचा प्रभाव रहाणारं असेही सांगण्यात आले आहे. हा पहिला अंदाज असून मे अखेर दुसरा अंदाज वर्तवला जाणार आहे. आपला देश कृषिप्रधान म्हणून जगामध्ये ओळखला जातो.त्यामुळे येथील शेतकरी आपापल्या राज्यामध्ये कृषिपुरक हवामानानुसार विविध पिकांचे उत्पादन घेत असतो. पण गेल्या काही वर्षांपासून हवामानाचा अंदाज फोल ठरत असल्याचे वरचेवर निष्पन झाले आहे. शेतकरी महागडी औषधे, बि-बियाणे, कर्ज काढून शेती पिकवत असतो पण भारतीय हवामान खात्याच्या चुकीच्या अंदाजामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना फटका बसत आहे.काही शेतकरी संघटनांनी वेधशाळेवर प्रश्न उपस्थित केला होता. त्यामुळे भारतीय हवामान विभाग सक्षम, व अचूक ठरणे हिताचे आहे.

**राजू जाधव**

## तरुण पिढीला वाचवा

गोरेगाव येथील म्युझिक कॉन्सर्टमध्ये दोन तरुणांचा झालेला मृत्यू आणि राज्यात फोफावलेला अमली पदार्थांचा व्यापार, हे महाराष्ट्र 'उडता पंजाब' होण्याच्या दिशेने चालल्याचे लक्षण आहे.त्यामुळे सरकारने आता वेळ न घालवता तातडीने 'ड्रग्जमुक्त महाराष्ट्र' अभियान राबवावे; तसेच 'सनबर्न',म्युझिक कॉन्सर्ट, रेव्ह पार्ट्या आदी भारतीय संस्कृतीविरोधी कार्यक्रमांमुळे तरुण पिढीचे जीवन उद्ध्वस्त होत असल्याने,याला जबाबदार असणारे आयोजक तथा प्रशासकीय यंत्रणा यांवर कठोर कारवाई करावी,अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे. समितीने यापूर्वीही मुंबई आणि गोवा येथील 'सनबर्न फेस्टिव्हल'ला तीव्र विरोध केला होता, कारण अशा कार्यक्रमांतून मिळणाऱ्या महसुलापेक्षा होणारी सामाजिक आणि राष्ट्रीय हानी अधिक गंभीर आहे.अंमली पदार्थांचे हे पसरलेले जाळे केवळ व्यसनाधीनतेपुरते मर्यादित नसून देशाला पोखरण्याचे एक मोठे युद्धच आहे.'नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो'च्या आकडेवारीनुसार,वर्ष २०२५ मध्ये २००० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त होणे आणि नाशिक, मुंबई-साताऱ्यासारख्या शहरांत ड्रग्जचे कारखाने सापडणे, हे राष्ट्रीय सुरक्षेसाठी गंभीर आव्हान आहे. भारत हा 'गोल्डन क्रेसेंट' आणि 'गोल्डन ट्रँगल'च्या मध्यभागी असल्याने तस्करांकडून देशाचा वापर 'ट्रान्झिट रूट' म्हणून केला जात आहे. तरी सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन केवळ तस्करांच्याच नव्हे, तर अशा पार्ट्यांचे आयोजन करणाऱ्या आयोजकांच्या मुसक्या आवळून तरुण पिढीला या विळख्यातून वाचवावे.

**सुनील घनवट**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखय

# पाणी टंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे

## पाणी टंचाई निवारनार्थ उपाययोजनांचा पालकमंत्र्यांकडून आढावा, नागरिकांच्या तक्रारी येता कामा नये

**जनमाध्यम प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पाणी टंचाई निवारनार्थ उपाययोजनांबाबत जिल्ह्याचे पालकमंत्री ना.संजय राठोड आणि आदिवासी विकासमंत्री ना. डॉ. अशोक ऊईके यांनी गुरुवारी आढावा घेतला. जिल्ह्यातील कोणत्याही भागात पाण्यासाठी नागरिकांच्या तक्रारी येता कामा नये. त्यासाठी प्रशासनाने सज्ज राहून टिम वर्क करावे, असे निर्देश पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात झालेल्या या प्रशासकीय विभागांच्या आढावा बैठकीला आमदार किसन वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांचेसह उपविभागीय अधिकारी, विविध विभागांचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते. पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी या बैठकीत जिल्ह्यातील सरासरी पर्जन्यमान, धरण व बंधाऱ्यातील पाणीसाठा, पाणी टंचाई निवारनार्थ कृती आराखडा,



जनावरांसाठी चारापाणी, विहीर अधिग्रहण, जलसंधारणाचे काम, भूजल पाणी पातळी, राष्ट्रीय पेयजल योजना, टँकरने पाणी पुरवठा, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, नळ पाणी पुरवठा योजना, जलजीवन मिशन, नगरपरिषद पाणी पुरवठा यासह विविध विषयांचा तालुकानिहाय व नगरपरिषद निहाय आढावा घेतला. पाणी टंचाई निवारणासाठी ग्रामीण पाणी पुरवठा योजना, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा योजना, नळपाणी पुरवठा योजनांची कामे लवकरात लवकर पूर्ण कराव्यात. जिल्ह्यातील कोणत्याही भागात पाण्यासाठी नागरिकांच्या तक्रारी येता कामा नये. त्यासाठी लक्ष्य देवून टिम वर्क करावे. यात हयगय, कामचुकारपणा केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी अधिकाऱ्यांना दिले. जिल्ह्यातील मोठे, मध्यम आणि लघू प्रकल्पांमध्ये मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी जास्त पाणीसाठा उपलब्ध असून सद्यस्थितीत ४९.९९ टक्के पाणीसाठा आहे.

### पाणी वाटप सुरु झाल्यापासून विहिर अधिग्रहण मानले जाणार

ग्रामीण भागात पाणी टंचाई निवारनार्थ शासनाकडून खाजगी विहिरी अधिग्रहित करुन नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो. त्यापोटी संबंधितांना मोबदला दिला जातो, परंतू सदर मोबदला प्रत्यक्ष पाणी वाटप सुरु झाल्याच्या दिवसा ऐवजी अधिग्रहणाचा आदेश झाल्यापासून दिला जात असल्याच्या तक्रारींची दखल या बैठकीत घेण्यात आली. त्यानुसार ज्या दिवशी ग्रामसभेत विहिर अधिग्रहणाचा ठराव होईल, त्या दिवसापासून विहिर अधिग्रहण मोबदला दिला जाईल, असा निर्णय घेण्यात आला.

# सहारा नगर येथे कोणाच्या इशाऱ्यावर पाडले गरीब मजुराचे घर !

## यवतमाळ नगर परिषद व पोलीस चौकशीच्या घेऱ्यात, सहारा नगर पिंपळगाव येथे अनुसूचित जातीतील कुटुंबावर अन्याय

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - पिंपळगाव परिसरातील सहारा नगर येथे गरीब अनुसूचित जातीतील नागरिक सुखदेव गोडंबे यांचे घर अतिक्रमणाच्या नावावर जबरदस्तीने पाडण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली असून या प्रकरणात यवतमाळ नगरपरिषद व पोलीस प्रशासनावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. सुखदेव गोडंबे यांच्या नावावर नगरपरिषद नोंद व कर पावती असतानाही शेजारील व्यक्तीच्या सांगण्यावरून दादागिरी, दबाव व कथित आर्थिक व्यवहारातून कारवाई करण्यात आल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

सहारा नगर भागात मोठ्या प्रमाणात अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीय नागरिकांची वस्ती असून अनेक कुटुंबे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत राहत आहेत. गेल्या सुमारे २० वर्षांपासून येथे वास्तव्यास असलेले सिताराम गोडंबे हे आपल्या १७ वर्षीय मुलीसह उदरनिर्वाह करीत होते. मात्र त्यांच्या टीनाच्या घरामुळे शेजारील आलिशान घर धारकाला अडचण होत असल्याने व वीस हजार रुपयांची खिरापती देऊन घर खाली करण्याचा प्रयत्न झाल्याचे सांगितले जाते. संबंधितांनी हे आमिष नाकारल्याने चवताळलेल्या व्यक्तीने सूड भावनेने प्रशासनाचा वापर करून घर पाडण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिक करीत आहे. या कारवाईबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. परिसरात इतरही अतिक्रमणे असताना केवळ एकाच घरावर कारवाई का करण्यात आली? ही कारवाई एवढ्या घाईत आणि कोणाच्या सांगण्यावरून झाली? या मागे आर्थिक देवाण-घेवाण झाली का? असे सवाल नागरिकांमध्ये चर्चिले जात आहेत. दरम्यान, आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी यापूर्वी पट्टाधारकांना निवासी हक्क देण्याचे आश्वासन दिले होते तसेच यासंदर्भात विधानसभेत त्यांनी लक्षवेधी लावली होती. मात्र त्या आश्वासनाकडे दुर्लक्ष झाल्याचे या घटनेतून दिसून येत आहे.एकीकडे स्थानिक आमदार अतिक्रमित नागरिकांना न्याय मिळावा या संदर्भात विधानसभेत मत व्यक्त करतात व इकडे नगर परिषद यवतमाळ गरिबांवर जाणीवपूर्वक कारवाई करतात ही बाब नागरिकाच्या आकलना बाहेरील आहे. या संदर्भात सुखदेव गोडंबे यांनी या प्रकरणी जिल्हाधिकारी व पोलीस निरीक्षक यांच्याकडे निवेदन सादर करून मुख्याधिकारी, नगरपरिषद यवतमाळ तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरोधात सखोल चौकशी करून न्याय मिळावा, अशी मागणी केली आहे. घर पाडल्यामुळे कुटुंब बेघर झाले असून प्रशासन याकडे किती गांभीर्याने पाहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## • वेचक

### अक्षय तृतीयेला बालविवाह कराल तर होणार कडक कारवाई

यवतमाळ : येत्या अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर जिल्ह्यात बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेता, प्रशासनाकडून कडक पावले उचलली आहेत. बालविवाह लावल्यास थेट कारावासाची कारवाई करण्यात येणार आहे, असा स्पष्ट इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. १९ एप्रिल रोजी होणाऱ्या विवाह सोहळ्यांमध्ये बालविवाह होऊ नये, यासाठी विशेष दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मारोती पवार यांनी केले आहे. कायद्यानुसार विवाहासाठी मुलाचे किमान वय २१ वर्षे आणि मुलीचे १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी वयात विवाह करणे हे बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ अंतर्गत बेकायदेशीर आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रामसेवक, तर शहरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी यांची बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गावपातळीवर सरपंच, पोलीस पाटील आणि अंगणवाडी सेविका यांनी सतर्क राहून विवाहापूर्वी वधू-वरांचे वय तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बालविवाह हा दखलपात्र गुन्हा असून, यात केवळ पालकच नव्हे तर विवाह सोहळ्यात सहभागी होणारे वऱ्हाडी, भटजी, वाजंत्री, मंगल कार्यालय चालक तसेच बिछायत केंद्र चालक यांच्यावरही गुन्हे दाखल होऊ शकतात. दोषींना २ वर्षांपर्यंत सश्रम कारावास आणि १ लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते. जिल्हा बालविवाहमुक्त करण्याचा निर्धार केला असून, संशयास्पद विवाहाची माहिती तत्काळ देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बालविवाहाबाबत माहिती देण्यासाठी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा पोलीस विभागाचा ११२ हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध असून, माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवली जाईल.अशी माहिती जिल्हा व बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजूरकर यांनी दिली आहे.

### उष्माघातापासून बचावासाठी जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना जारी

यवतमाळ : जिल्ह्यात मागील चार ते पाच दिवसांपासून तापमानात लक्षणीय वाढ होत असून उष्णतेचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासनाने नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. उष्णतेच्या काळात उष्माघाताचा धोका टाळण्यासाठी "काय करावे" आणि "काय करू नये" याबाबत मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. जिल्हा प्रशासनाच्या सूचनेनुसार नागरिकांनी तीव्र उन्हात, विशेषतः दुपारी १२ ते ३ या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे. शरीरातील पाण्याची कमतरता होऊ नये म्हणून पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे. शक्यतो हलक्या रंगाचे सुती कपडे वापरावेत तसेच बाहेर जाताना छत्री, टोपी किंवा गॉगलचा वापर करावा. मद्य, चहा, कॉफी तसेच कार्बोनेटेड शीतपेयांचे सेवन टाळावे आणि शिळे अन्न खाणे टाळावे. उन्हात काम करताना चेहरा व डोके ओल्या कपड्याने झाकावे. शक्यतो दुपारी १२ ते ३ या वेळेत उष्ण वातावरणात कष्टाची कामे करू नयेत. चक्कर येणे किंवा आजारी वाटल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी ओआरएस, लस्सी, ताक, लिंबूपाणी यांसारख्या घरगुती शीतपेयांचे सेवन करावे. तसेच पशुधनाला सावलीत ठेवून त्यांना भरपूर पाणी उपलब्ध करून द्यावे. याचबरोबर प्रशासनाने काही गोष्टी टाळण्याचेही आवाहन केले आहे. त्यानुसार दुपारी १२ ते ३ या वेळेत उन्हात बाहेर जाणे टाळावे. गडद, घट्ट आणि जाड कपडे घालू नयेत. बाहेर तापमान जास्त असल्यास जास्त शारीरिक श्रमाची कामे करणे टाळावे. उष्माघात झालेल्या व्यक्तींची काळजी घेताना त्यांना त्वरित थंड जागी हलवावे आणि शरीराचे तापमान कमी करण्याचा प्रयत्न करावा. ओल्या कपड्याने अंग पुसून थंड करावे तसेच ओआरएस, लस्सी, ताक किंवा लिंबूपाणी द्यावे. बाधित व्यक्तीला तातडीने जवळच्या आरोग्य केंद्रात किंवा रुग्णालयात दाखल करून उपचार सुरू करावे. उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी आणि आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### जवाहर नवोदय विद्यालय बेलोराचा १० वीचा निकाल १०० टक्के

यवतमाळ : पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय बेलोरा येथील शैक्षणिक सत्र २०२५-२६ चा सीबीएसई १० वीचा निकाल १०० टक्के लागला आहे. दिनांक १५ एप्रिल रोजी जाहीर झालेल्या या निकालात विद्यालयातील एकूण ७६ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. विशेष म्हणजे या सर्व विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून, त्यापैकी ७५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच ६५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवून उज्ज्वल यश संपादन केले आहे. विद्यालयातून सात्विक गजानन गुंडेवार याने ९७.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार बहुजन समाजाच्या विकासाच्या सर्वांगिण उन्नतीसाठी आहे : कृष्णा पाटील देवसरकर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार हे बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी साठी आहे त्याच बरोबर लहान मुलांच्या जिवनात खऱ्या अर्थाने शिक्षणांचे संस्कार देण्यासाठी गरज आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर १३५ वी जयंतीनिमित्त हा कार्यक्रम बहुजन समाजाला शिक्षणात व विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आहे.

बहुजन समाजानी बाबासाहेब यांचे विचार व कार्य घरोघरी राबविले पाहिजे समाजातील मुलांनी शिक्षण घेऊन उच्च पद गाठावे असे प्रतिपादण कृष्णा पाटील देवसरकर सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती उमरखेड यांनी सांगितले . माजी जिप अध्यक्ष रमेशराव चव्हाण यांनी विचार व्यक्त केले समानतेचे बिजे कायदयाव्दारे पेरणारे महापुरुष होते असे विचार व्यक्त केले भिम जयंती सोहळा महिला च्या पुढाकाराने चिमुकल्यांनी विचार व्यक्त केले . वसंत नगर पोफाळी या पंचशिल ध्वजारोहण पंचशिल त्रिशरण चिमुकल्यांनी विचार व्यक्त इंग्रजी मराठी भाषेत व्यक्त केले . जाई कांबळे दिव्या



धुळे साक्षी बरडे स्मिता राठोड समता बरडे अन्यन्या कांबळे ईशिता सावते तन्वी सावते मयंका पाईकराव प्राप्ती गाडगे सुजाता खंदारे समिक्षा सावते अनुश्री पाईकराव भिमराव चंद्रवंशी विचार व्यक्त केले. अध्यक्षस्थानी माजी आमदार विजयराव खडसे यांनी मुला -मुलीचे शिक्षण हे सामाजिक विकास हे खऱ्या अर्थाने बाबासाहेबांना अपेक्षीत समाज रचनेचे मुळ या प्रसंगी दिसत आहे असे प्रतिपादन केले .

कार्यक्रमास माजी जिप सदस्य शंकरराव तालंगकर , मुख्याध्यापक एन बी राठोड राजेश क्षिरसागर डॉ फिरोज पठाण संतोष क्षिरसागर आनंदराव बरडे वैभव वाकडे बाळासाहेब खंदारे व महिला सदस्या जोती खंदारे, सविता घुगरे, गाडगे , सौ खडसे लोखंडे यांनी कार्यक्रमासाठी परीश्रम घेतलेत, भोजनदानाचा स्वाद वसंतनगर वासीयांनी व मार्गदर्शक मान्यवरांनी घेतला.

सराणे कुटूंबीय, चकोर, नागमोते, राठोड, सावते, घुगरे, पाईकराव, खडसे, भगत, धुळे, खंदारे,कांबळे, साळवे, बरडे आढागळे, खडसे, गाडगे, इंगोले, बनसोडे, राठोड यांचे सह परिसरातील मान्यवर शंकरराव तालंगकर माजी जि प सदस्य पोफाळी मुख्याध्यापक एन बी राठोड, राजेश क्षिरसागर, डॉ फिरोज पठाण, संतोष क्षिरसागर, माजी सरपंच आनंदराव बरडे प्रकाशराव चक्करवार कनवाळे दुकानदार, भागवत काळे पत्रकार, बावनथडे . वंजारे दुकानदार, सर्व रहीवाशी यांची उपस्थिती होती.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त प्रबोधन पर्वाच्या वतीने (४ चार) दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन !

## समिती अध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त तसेच राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांच्या 200 व्या जयंतीच्या पदार्पणा निमित्त प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती पुसद प्रबोधनपर्व 2026 यांच्या वतीने दिनांक 16 एप्रिल ते 19 एप्रिल 2026 पर्यंत भिमगित, गायन, तसेच विद्यार्थी व महिलांना मार्गदर्शनपर प्रबोधनाचे चार दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचा पहिला दिवस 16 एप्रिल 2026 रोजी रवी तायडे प्रस्तुत भीमगर्जना या बहारदार भीम गीतांचा आर्केस्ट्रा गायनाचा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाचे उद्घाटन बौद्ध धर्मगुरू भंते आर्याजी (बोरी खुर्द) पुसद यांच्या हस्ते होणार आहे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. इंद्रनील नाईक राज्यमंत्री म.रा.हे राहणार आहेत.



17 एप्रिल 2026 रोजी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन तथा चळवळीचे व्याख्याते मा.विठ्ठल कांगणे सर यांचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तथा सामाजिक प्रबोधन ठेवण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुख्य आकर्षन मा.नामदार संजय शिरसाट पालकमंत्री (छ. संभाजी नगर तथा सामाजिक न्याय मंत्री) महाराष्ट्र राज्य हे उपस्थित राहणार आहेत. तसेच विशेष उपस्थितीमध्ये समीर वानखेडे (आय आर एस) भारत सरकार,सोबत जयदीप कवाडे उपाध्यक्ष लघुउद्योग महामंडळ महाराष्ट्र राज्य यांची उपस्थिती लाभणार आहे. 18 एप्रिल रोजी महाराष्ट्राचे प्रसिद्ध गायक तथा गीतकार चेतन चोपडे (छत्रपती संभाजीनगर,औरंगाबाद) यांचा संगीतमय गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ. मोहम्मद नदीम भारतीय राष्ट्रीय काँग्रेस प्रदेश सचिव हे आहेत. तसेच दिनांक 19 एप्रिल रोजी विशेष महिलांसाठी प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजन करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या मा. स्नेहा टोम्पे अमरावती, डॉ.बाबासाहेबांचे महिला विषयी कल्याणकारी धोरण या विषयावर प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# बाभूळगावात उसळला "निळा जनसागर"

## ...लक्षवेधी'भीम रॅली'त डीजे व ढोल-ताशे आकर्षण, संविधान चौकातील प्रज्ञासूर्यापुढे भीम अनुयायी नतमस्तक

**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभुळगाव - प्रज्ञासुर्य, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी दि. १४ एप्रिल रोजी बाभुळगाव शहरात भव्य लक्षवेधक 'भीम रॅली' काढण्यात आली. ढोलताशे व डिजेच्या तालावर युवक युवतींनी मोठ्या जल्लोषात महामानवाला स्मरण करीत नमन केले. यावेळी मिरवणुकीत लावलेले निळे झेंडे, निळे दुपट्टे व निळ्या अबिराने मिरवणुकीस निळ्या जनसागराचे स्वरूप प्राप्त झाले होते.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचा उत्साह शेकडो भीम अनुयायांमध्ये शहरभर दिसून आला. 'भीमराया घे तुझ्या या लेकरांची वंदना' म्हणत निळ्या सागराने प्रज्ञासूर्याला अभिवादन केले. उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे हे भीम गीत तसेच जय भीमचा गजर सर्वत्र



कानी पडत होता. शहरातील संविधान चौक येथील प्रज्ञासुर्यापुढे भीम अनुयायी नतमस्तक झाले. बाबासाहेबांच्या प्रतीमेपुढे निळे ध्वज, पांढरा शुभ्र पोशाख परिधान केलेल्या अनुयायांनी गर्दी केली होती. तत्पूर्वी बाभुळगाव शहराच्या हृदयस्थानी असलेल्या संविधान चौकातून काढण्यात आलेली मिरवणूक शहरातील मुख्य मार्गावरून पथक्रमण करीत परत संविधान चौकात पोहोचली. यावेळी नगरसेविका ललिता मनवर, दीपक मनवर, उत्तम मनवर, विजय बनसोड, रमा बनसोड, इंदू धूळधुळे,मनीष मनावर, रत्नपाल डोफे, दिलीप वाघमारे, वैशुभ अलोणे, नंदू लांडे, नम्रता अलोणे, कुसुम खंडेराव, ॲड. मिलिंद दातार, राजेंद्र शेंडे, सुधाकर दातार, प्रकाश चव्हाण, सुरेश कांबळे, बिट्टू थूल, किरण आटे, दुर्गा मून, वंदना राऊत, अस्मिता थूल, नीलिमा वासे, नलिनी शेंडे, मंदा सोनटक्के आदींसह शेकडो भीम अनुयायी उपस्थित होते.

# होमगार्डच्या शिताफीने उलगडला खुनाचा गुन्हा..!

## एसपींकडून प्रशस्तीपत्र देऊन विशेष सन्मान, नेर पोलीस ठाणे हद्दीतील गंभीर गुन्ह्यात निर्णायक मदत

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : पोलीस दलाच्या खांद्याला खांदा लावून कार्य करणाऱ्या होमगार्ड जवानाने पुन्हा एकदा आपल्या धाडसाची आणि कर्तव्यनिष्ठेची प्रचिती दिली आहे. नेर पोलीस स्टेशन हद्दीतील खुनाच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेऊन त्याला अटक करण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्या बद्दल होमगार्ड जवान वसंता रामभाऊ राऊत यांचे जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी विशेष कौतुक केले.

नेर पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता-२०२३ च्या कलम १०३(१) अंतर्गत अपराध क्रमांक २६६/२०२६ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणातील आरोपी फरार असल्याने पोलीस तपासात अडथळे निर्माण होत होते.



पोलिसांकडून त्याचा कसून शोध सुरू असताना तो पोलिसांच्या हाती लागत नव्हता. दरम्यान, बंदोबस्ताच्या कर्तव्यावर असलेले होमगार्ड जवान वसंता राऊत यांनी स्वतःहून पुढाकार घेत परिसरातील शेतजमिनी व आजूबाजूचा भाग तपासण्यास सुरुवात केली. अत्यंत शिताफीने आणि जीवाची पर्वा न करता त्यांनी आरोपीचा शोध लावला.

आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असताना राऊत यांनी तत्काळ पोलिसांना माहिती देत त्यांच्या मदतीने आरोपीला जेरबंद करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

राऊत यांनी दाखवलेले धाडस, तत्परता आणि कामा प्रती असलेली निष्ठा उल्लेखनीय ठरली असून त्यांच्या या कार्यामुळे पोलीस विभागास मोठी मदत झाली आहे. तसेच जिल्हा गृहरक्षक दलाची प्रतिमा देखील उंचावली आहे.

या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी वसंता रामभाऊ राऊत यांना प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मानित केले व त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

# घाटंजीत भाजपा महिला आघाडीकडून नारीशक्ती वंदन विधेयकाचे स्वागत करत जल्लोष साजरा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी : नारीशक्ती वंदन अधिनियमाअंतर्गत लोकसभा आणि विधानसभेमध्ये महिलांसाठी 33% आरक्षण देवून भारतीय लोकशाहीला नवी दिशा देणाऱ्या नारीशक्ती अधिनियमाला पाठिंबा देण्यासाठी, नारीशक्ती वंदन अधिनियमांचे स्वागत करण्यासाठी या सुवर्णक्षणाचा आनंद साजरा करण्यासाठी आणि स्त्री शक्तीचा जागर करण्यासाठी सौ. प्रियाताई राजू तोडसाम (आर्णी विधानसभा संयोजिका )यांच्या नैतृत्वात आर्णी विधानसभेतील घाटंजी, केळापूर आणि आर्णी या तीनही तालुक्यातील महिला आघाडीच्या महिलांनी एक विशेष भव्यदिव्य अशी पदयात्रा काढून शासनास पाठिंबा दिला.

पदयात्रा जलाराम मंदिर येथूनशेकडो महिल्यांच्या उपस्थितीत प्रियाताई तोडसाम यांच्या नैतृत्वात जुना बस स्टॅन्ड मार्गे मेन लाईन शिवाजी चौक येथून सांस्कृतिक भवन घाटंजी येथे पदयात्रेची सांगता करण्यात



आली यात महिलांनी मोदी सरकारचे धन्यवाद मानले.यावेळी सौ.प्रियाताई तोडसाम, आर्णी विधानसभा संयोजिका,सौ. वर्षाताई पेंदोर,महिला तालुका अध्यक्षा घाटंजी, सौ.साधनाताई माडूरवार,शहराध्यक्षा घाटंजी शहर, सुषमाताई खांडरे उपाध्यक्ष घाटंजी,सौ. सोनलताई ठाकरे उपाध्यक्ष न. प. घाटंजी,भारती कुंटलवार सभापती न प. घाटंजी सौ. सोनालीताई सुहास पारवेकर सामाजिक कार्यकर्ता, सौ. लताताई ठाकरे सरचिटणीस घाटंजी शहर, संगीता पडलवार, वनिता खांडरे,यांच्या सह शेकडो महिला उपस्थित होत्या.

# "मोजणी-फेरफार प्रकरणांत संशयास्पद दिरंगाई"

## 'कुलूप ठोको' आंदोलनाची पूर्वसूचना : प्रशासनाला निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - येथील भूमी अभिलेख कार्यालयाच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर तक्रारी समोर येत असून, मोजणी, फेरफार व नोंदी प्रकरणांतील दीर्घकाळाची दिरंगाई नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. 'युवा टायगर फोर्स'कडे प्राप्त झालेल्या तक्रारींनुसार, आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरूनही नागरिकांची कामे महिनोन्महिने प्रलंबित ठेवली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मौजा पांढरकवडा परिसरातील शेकडो नागरिकांनी शेतजमिनींच्या मोजणी, फेरफार, आखीव पत्रिका व नोंदीसाठी अर्ज सादर केले असतानाही, सहा महिन्यांहून अधिक काळ उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. परिणामी नागरिकांना वारंवार कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत असून, संबंधित कर्मचाऱ्यांकडून टाळाटाळ व उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याची तक्रार आहे. काही प्रकरणांना प्राधान्य दिले जात असल्याच्या आरोपांमुळे संपूर्ण प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर 'युवा टायगर फोर्स'ने आक्रमक भूमिका घेत उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, तहसीलदार पांढरकवडा आणि पोलीस स्टेशन पांढरकवडा यांना अधिकृत निवेदन सादर केले आहे. निवेदनात प्रलंबित प्रकरणांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली असून, समस्येचे तात्काळ निराकरण न झाल्यास "कुलूप ठोको" आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील तरतुदींनुसार नागरिकांना वेळेत सेवा देणे बंधनकारक असताना, सद्यस्थिती त्या कर्तव्याशी विसंगत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांनुसार अर्जांवर अनावश्यक विलंब करणे अनुचित असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# यवतमाळ वनवृत्तातील ३२ वनरक्षकांना वनपाल पदोन्नती

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : यवतमाळ वनवृत्तातील विविध विभागांतील एकूण ३२ वनरक्षकांना वनपाल पदावर पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पदोन्नती समिती बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. यवतमाळ, पांढरकवडा, पुसद, वाशिम हे प्रादेशिक वनविभाग तसेच सामाजिक वनिकरण यवतमाळ व वाशिम आणि वन्यजीव पांढरकवडा हे विभाग मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यवतमाळ यांच्या अखत्यारीत येतात. सप्टेंबर २०२५ ते ऑगस्ट २०२६ या कालावधीतील पदोन्नती प्रक्रियेसाठी १३ एप्रिल रोजी बैठक पार पडली. या बैठकीस मानकर मुख्य वनसंरक्षक अध्यक्ष डॉ. किशोर एस, उपवनसंरक्षक, सामाजिक वनिकरण अमरावती सुमित कुमार, उपवनसंरक्षक वाशिम अभिजित वायकोस, विभागीय वनाधिकारी पांढरकवडा उत्तम फड तसेच प्रशासकीय अधिकारी, सदस्य सचिव प्रविण जाट उपस्थित होते. पदोन्नतीसाठी एकूण ४८ वनरक्षकांसह इतर संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवा नोंदी, शैक्षणिक पात्रता, विभागीय परीक्षा, गोपनीय अहवाल, प्रलंबित चौकशी व इतर बाबींची सखोल छाननी करण्यात आली. त्याअनुषंगाने सध्या रिक्त असलेल्या २१ वनपाल पदांवर वनरक्षकांना तत्काळ पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत रिक्त होणाऱ्या ११ पदांवरही पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आल्याने एकूण ३२ वनरक्षकांना वनपाल पदाचा लाभ मिळणार आहे. याशिवाय, इतर संवर्गातही पदोन्नती देण्यात आली असून १ लिपीकास लेखापाल, १ शिपाईस लिपीक, १ वाहनचालकास संवर्ग बदल करून लिपीक, तसेच १ शिपाईस नाईक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

# शहर स्वच्छतेबाबत मनपा आयुक्त आक्रमक

## विविध ठिकाणांची पाहणी; स्वच्छता, नालेसफाई व अतिक्रमणावर कारवाईचे निर्देश

**अमरावती/का.प्र.**

शहरातील स्वच्छता व नागरी सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी महानगरपालिकेच्या आयुक्त वर्षा लड्डा यांनी शहरातील विविध भागांची पाहणी करून संबंधित विभागांना समन्वय राखत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

आयुक्तांनी पंचवटी चौक, गाडगेनगर, नवसारी, आराधना स्पॉट तसेच इतवारा बाजार या प्रमुख व गर्दीच्या भागांना भेट देत स्वच्छतेची स्थिती तपासली. या ठिकाणी साचलेला कचरा, नाल्यांची साफसफाई, रस्त्यांची देखभाल व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता यांचा त्यांनी बारकाईने आढावा घेतला. काही ठिकाणी आढळलेल्या त्रुटींवर नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सुधारात्मक उपाय योजना करण्याचे निर्देश दिले.

कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी जबाबदारीने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हॉकर्स व दुकानदारांकडून रस्त्यावर कचरा टाकला जात असल्याबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कचरा डस्टबिनमध्ये जमा करून तो नियमितपणे घंटागाडीमार्फतच देणे अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच घंटागाडीचे नियोजन काटेकोरपणे करून ती वेळेवर व नियमितपणे फिरावी, यासाठीही



सूचना देण्यात आल्या.

इतवारा बाजार परिसरातील सर्व दुकानदारांना त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, प्रत्येकाने आपले सामान केवळ निर्धारित दुकानाच्या मर्यादितच ठेवावे.

रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करू नये तसेच नाल्यांमध्ये कचरा टाकू नये. परिसर स्वच्छ व सुंदर राखण्यासाठी व्यापाऱ्यांनी सक्रिय सहकार्य करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. यानंतर अर्जुन नगर येथील उद्यानाची पाहणी करत त्यांनी स्वच्छता, हरित क्षेत्र, तसेच नागरिकांसाठी उपलब्ध सोयी-सुविधांचा आढावा घेतला. उद्यानात येणाऱ्या नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व आनंददायी वातावरण मिळावे यासाठी आवश्यक दुरुस्त्या व सुधारणा तातडीने करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

तसेच उद्यानांच्या नियमित देखभाल व सौंदर्यीकरणावर विशेष भर देण्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी स्पष्ट केले की, शहर स्वच्छ व अतिक्रमणमुक्त ठेवणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून नागरिकांनीही त्यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

स्वच्छता नियमांचे पालन करून महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. पाहणीदरम्यान नगरसेवक दिपक साहू (सम्राट), प्रशांत धर्माळे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, उपअभियंता आशिष अवसरे, ज्येष्ठ स्वच्छता निरीक्षक राजू डिक्याव, श्रीकांत डवरे, शहर समन्वयक श्वेता बोके, उद्यान निरीक्षक मुकेश खारकर, महेश जोशी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सौर ऊर्जेतून कृषिपंपाना वीज देण्यात महावितरणची कामगिरी दिशादर्शक

**अमरावती/का.प्र.**

मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० तसेच मागेल त्याला सौर कृषिपंप या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत महावितरणची कामगिरी इतर राज्यांसाठी दिशादर्शक आहे. राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी सुरु असलेल्या या योजनांची माहिती घेतल्यानंतर पथकाकडून हे गौरवोद्गार काढण्यात आले.

अभ्यास दौऱ्यात महावितरणचे मुख्यालय प्रकाशगड येथे सौर ऊर्जेतून कृषिपंपांना वीजपुरवठा करणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती घेतली. संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर, मुख्य अभियंते ज्ञानेश कुलकर्णी, पंकज तगलपल्लेवार, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून योजनांची सविस्तर माहिती दिली.



### म.प्र.वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून कौतुकोद्गार

मध्यप्रदेशच्या पथकात मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक गुरुदीप सिंग कनुजा, धिरज कुमार मुनिया, चिंतामणी ठाकर शंकर नारायण अग्रवाल, विनोद राऊत यांचा समावेश होता.

जगातील १६ हजार मेगावॅट विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मध्ये आतापर्यंत ३ हजार १८७ कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल १२ लाख ८२ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा ४ हजार ७७९ मेगावॅट विजेचा पुरवठा उपलब्ध झाला आहे.

या योजनेमुळे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकी सह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे.

वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. देशभरात बसवण्यात आलेल्या एकूण ऑफ ग्रीड सौर कृषिपंपांपैकी ६४ टक्के कृषिपंप एकट्या महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत.

### मल्लखांब, सॉफ्टबॉल व कुस्ती स्पर्धांमध्ये

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थिनींची उल्लेखनीय कामगिरी

**अमरावती/का.प्र.**

छत्तीसगड येथे ३ ते ५ एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित खेलो इंडिया ट्रायबल गेम्स २०२६ अंतर्गत मल्लखांब या क्रीडा प्रकारात महाराष्ट्र संघाने उज्वल कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेत श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड. प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या नेहा दारशिंबे व निलाक्षी दारशिंबे या विद्यार्थिनींनी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत उत्कृष्ट प्रदर्शन केले.

स्पर्धेदरम्यान पोल मल्लखांब पिरॅमिड प्रकारात महाराष्ट्र संघाने द्वितीय क्रमांक, तर रोप मल्लखांब पिरॅमिड प्रकारात तृतीय क्रमांक मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध



केली. या यशामध्ये महाविद्यालयातील दोन्ही बहिणींचा मोलाचा वाटा राहिला. त्याचप्रमाणे आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये बीपीएड प्रथम वर्षा मध्ये शिकत असलेली वैष्णवी गिरी ही सुवर्णपदकाची मानकरी ठरली. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने आयोजित चौथी महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा सोलापूर येथे पार पडली. या स्पर्धेत गौरी धोटे या विद्यार्थिनीने उत्कृष्ट कामगिरी करत कास्यपदक पटकावले.

महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशाबद्दल श्री शिवाजी संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य प्रा. प्रकाश देशमुख यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या विजय स्पर्धक विद्यार्थ्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे आय क्यू एसी समन्वयक डॉ. पुष्पलता देशमुख महाविद्यालयाचे शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# उन्हाच्या तडाख्यात 'पानेरी'

**अमरावती/का.प्र.**

उन्हाच्या तडाख्यात ग्रामीण जनतेला दिलासा देणारा आणि कर्मचारी एकतेचा सुंदर संदेश देणारा 'पानेरी' उपक्रम यंदाही जिल्हा परिषद अमरावती परिसरात अत्यंत उत्साहात पार पडला. विशेष म्हणजे, सन २०१३ पासून सुरू असलेला हा उपक्रम दरवर्षी सातत्याने राबवला जात असून, आज तो एक प्रेरणादायी परंपरा बनला आहे.



### जिल्हा परिषद अमरावतीचा उपक्रम

जिल्हा परिषद कर्मचारी युनियन तसेच महाराष्ट्र राज्य लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेच्या वतीने आयोजित या उपक्रमाचे उद्घाटन आनंदमयी वातावरणात करण्यात आले. कार्यक्रमासाठी कर्मचारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून एकात्मतेची जाणीव अधोरेखित केली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके साहेब यांच्या हस्ते फित कापून 'पानेरी' चे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात कर्मचारी एकतेचे महत्त्व अधोरेखित करत अशा उपक्रमांमुळे संघटनेची ताकद आणि बांधिलकी अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त केले.

उन्हाळ्याच्या कडक परिस्थितीत ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व थंड पाणी उपलब्ध व्हावे, या सामाजिक भावनेतून 'पानेरी' मध्ये Aqua can ची व्यवस्था करण्यात आली आहे. हा उपक्रम केवळ पाण्याची सुविधा देणारा नसून, समाजाप्रती असलेली जबाबदारी जपणारा एक प्रेरणादायी उपक्रम असल्याचेही आयोजकांनी नमूद केले. उद्घाटनानंतर उपस्थितांनी या उपक्रमाच्या यशासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या परिश्रमांचे कौतुक केले. या उपक्रमामुळे कर्मचारी वर्गात आनंद, समाधान आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष पंकज गुल्हाने यांच्यासह निलेश तालन, ज्ञानेश्वर घाटे, श्रीकांत मेश्राम, विजय कोठाळे, मंगेश मानकर, नितीन माहोरे, संजय मुंद्रे, अर्पणा आत्राम, जीवन नारे, परमेश्वर राठोड, सतीश पवार, राहुल रायबोले, स्वप्निल कुरेकर, आदित्य तायडे, प्रमिलाताई उंबरकर, दिनेश खंडारे, विजय काळे, निशांत तायडे, अशोक धोटे, उत्तम डोंगरे, गजानन इंगळे, चांदुरे आदी मान्यवर उपस्थित होते. 'पानेरी' हा उपक्रम केवळ तहान भागवण्यापुरता मर्यादित नसून, तो माणुसकीची परंपरा जपणारा आणि समाजसेवेचा एक जिवंत आदर्श ठरत आहे. भविष्यातही अशाच समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# शिष्यवृत्ती परीक्षा सकाळ पाळीत घ्या

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची मागणी

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती वतीने २६ एप्रिलची शिष्यवृत्ती परीक्षा सकाळच्या सत्रात घेण्यात यावी याबाबतचे निवेदन व्हाट्सअप द्वारे व ईमेल द्वारे डॉक्टर नंदकुमार बेडसे साहेब अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद व आयुक्त महेश चौथे आयुक्त परीक्षा परिषद यांना पाठवले आहे.

परीक्षा परीषद पुणे व्दारा ४थी व ७वीची शिष्यवृत्ती परीक्षा येत्या रविवार २६एप्रिलला भर उन्हात पहीला पेपर ११ते१२.३० व दुसरा पेपर दुपारी २ते ३.३०या वेळे घेण्याचे नियोजीत आहे. संद्धा संपूर्ण महाराष्ट्रात उष्ण उन्हाची लाट आहे.

जिल्हा परिषद शाळेची परिस्थिती पाहली तर कीत्येक वर्ग खोल्या टिनाच्या पञ्याच्या आहे, वर्गात फॉन नाही, असले तर लाईन नाही. ग्रामिण भागात तिव्र पाणी टंचाई आहे. विद्यार्थाच्या आरोग्याचा विचार करता ही परीक्षा सकाळ पाळीत घेण्याची मागणी पालक, शिक्षक, शिक्षक संघटना करीत आहे.

संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये इयत्ता चौथी व इयत्ता सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा दिनांक २६ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. सध्या राज्यामध्ये उन्हाचा प्रखर तडाखा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. अनेक शाळांमध्ये पुरेशी पंख्यांची तसेच थंड पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत दुपारच्या वेळेत परीक्षा देताना विद्यार्थ्यांवर उष्णतेचा/उष्माघाताचा विपरीत परिणाम होऊन त्यांची एकाग्रता व मानसिक स्थिती ढासळण्याची शक्यता आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो.

म्हणून सदर परीक्षा त्याच दिवशी घेण्यात यावी, मात्र तिचे वेळापत्रक सकाळच्या वेळेत ठेवण्यात यावे, परीक्षेची वेळ पहिला पेपर : सकाळी ८.३० ते १०.००, दुसरा पेपर : सकाळी १०.३० ते १२.०० विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी विनंती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद आयुक्त पुणे यांच्या कडे केली आहे.

असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

### पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलचा

# सी.बी.एस.ई. १०वी चा १००टक्के

**अमरावती/का.प्र.**

येथील पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल, कठोरा रोड, अमरावतीच्या विद्यार्थ्यांनी सी.बी.एस.ई. बोर्ड, दिल्ली मार्फत मार्च २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या वर्ग १० विच्या परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा शाळेचा निकाल हा उत्कृष्ट लागला. या परीक्षेमध्ये एकूण ७८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणांची परंपरा कायम ठेवत सी.बी.एस.ई. १० विच्या परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. एकूण परीक्षेला बसलेल्या ७८ विद्यार्थ्यांमध्ये ९० % व त्यापेक्षा जास्त एकूण २४ विद्यार्थी तर ८०% टक्केच्या वर ३७ विद्यार्थी, ६०% ७२ पेक्षा जास्त मध्ये विद्यार्थी आले.

सी.बी.एस.ई. बोर्ड दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या १० विच्या परीक्षेमध्ये शाळेच्या गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये यांनी गुण प्राप्त केले आहे.

वेदिका मनोज देशमुख ९६.८०%, माही प्रफुल वऱ्हेकर ९६.४०%, स्वरा दिनेश हराळे ९६.२०%, अमोघ राजेश भुते ९६.००%, सोनाली रोहितदास पाटील ९५.८०%, शमिका सिद्धार्थ ढोणे ९५.६०%, चिन्मय भास्कर तोंडे ९४.००%, मानस नरेंद्र वानखडे ९४.००%, आर्या नितीन अस्वार ९३.६०%, भाविक नरेंद्र वानखडे ९२.८०%, हंसिका प्रवीण मावले ९२.८०%, सायली अविनाश देशमुख ९२.८०%, अर्जुन मुजुमले ९२.४०%, शिवम नंदकिशोर वानखडे ९१.४०%, प्रियांश शैलेश निकम ९१.००%, सिद्धेश प्रवीण पाटील ९०.२०%, खुशी राजेश बंग ९०.००%, स्वरा मोहन गाडे ९०.००%. इ. तसेच ६ विद्यार्थी मराठी ह्या विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. तसेच ६ विद्यार्थी घ्ऊ ह्या विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले.

यावेळी पी आर पोटे पाटील ग्रुप ऑफ एज्युकेशनल इन्स्टिटयूशनचे अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील, संस्था उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील, त्याचबरोबर शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे, उप-प्राचार्या सोनल निस्ताने, तसेच सर्वच शिक्षक यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशाबद्दल कौतुक केले व भावी शैक्षणिक प्रवासाकरिता शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय त्यांचे आई वडील तसेच पी आर पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य व शिक्षकांना दिले.



# संक्षिप्त

## जागतिक आरोग्य दिन साजरा

**अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे जागतिक आरोग्य दिन अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अधिष्ठाता डॉ. ए. टी. देशमुख यांनी वैज्ञानिक दृष्टीकोनाचे महत्त्व आणि या विषयामागील विचार स्पष्ट केले. कम्युनिटी मेडिसिन विभागाचे डॉ. शहाजी तिडके यांनी 'ऊदुपे इदे पेंटू, ऐंहें गूएम्गहम' या विषयावर आपल्या उद्घाटनपर भाषणातून सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. सायली मुरकुटे यांनी 'वन हेल्थ' या विषयावर सादरीकरण केल. संचालन डॉ. सुप्रिया गोमासे यांनी केले. प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्यांना अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख यांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली. कार्यक्रम कम्युनिटी मेडिसिन विभागामार्फत डॉ. ए. के. जावरकर (विभाग प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रकल्प समन्वयक डॉ. शहाजी तिडके यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला होता.



## जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे उद्घाटन



**अमरावती-** जलसंपदा विभागातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२६चे उद्घाटन नुकताच उर्ध्व वर्धा कॉलनीतील मनोरंजन सभागृहा मध्ये पार पडला. जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता ज. द. टाले अध्यक्षस्थानी होते. यावेळी अधीक्षक अभियंता योगेश दाभाडे, अधिक्षक अभियंता मनिष राजभोज उपस्थित होते. कार्यकारी अभियंता अनिकेत सावंत यांनी या पंधरवड्यामध्ये जलसंपदा विभागाने करावयाच्या कामामध्ये कालवा स्वच्छता मोहिम, पाणीपट्टी वसुली, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण, महानगरपालिका व ग्रामपंचायत क्षेत्रातील प्रत्यक्ष पाणी वापराचा जललेखा तयार करणे, अनधिकृत बांधकाम हटविणे, तसेच जलसंपदा विभागाच्या जमिनीच्या मालमत्तांचे स्थळ निश्चिती करणे, जलसंपदा अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण, स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, शेतकरी, पाणी वापर संस्था चर्चासत्र ही कामे प्राधान्यक्रमाने करण्याबाबतचे नियोजन सादर केले. यावेळी उर्ध्व वर्धा, सपन, चंद्रभागा, शाहनुर, पुर्णा या प्रमुख नद्यांचे जलपुजन करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. सहायक अभियंता श्रध्दा कथलकर यांनी सूत्रसंचालन केले. विवेक चव्हाण यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी मालमत्ता उपविभागाचे उपविभागीय अभियंता श्री. मुंडे, सुयोग वानखेडे यांनी पुढाकार घेतला.

## सातरगावात 'एचपीव्ही' लसीकरण विशेष सत्र

**अमरावती-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सातरगाव येथे मुलींमधील गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग रोखण्यानाठी 'एचपीव्ही' नभीकरण विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले. दाभा उपकेंद्र अंतर्गत गावातील ७ पात्र लाभार्थी मुलींनी लसीकरणाचा लाभ घेतला. भविष्यात होणाऱ्या कर्क रोगाला आळा घालण्यासाठी ही लस अत्यंत प्रभावी आणि फायदेशीर असल्याचे मत यावेळी उपस्थित पालकांनी व्यक्त केले. लसीकरणापूर्वी लाभार्थी पालकांचे समुपदेशन करण्यात आले. यासाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. प्रियंका धानुका, आरोग्य सेवक राजेंद्र चकुले, अभिनव विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुजा ब्राम्हणे यांचे सहाकार्य लाभले. मोहिमेसाठी आरोग्य सहायिका अनिता मुळे, गटप्रवर्तिका अनिता मेश्राम. साधना भेंडे, राजेश डिबे आणि मनोज धरपाळ यांनी परिश्रम घेतले. तसेच आशा स्वयंसेविका संध्या ठाकरे, विना शेजवे आणि सिंधू कलसाईत यांचे सहकार्य लाभले. लसीकरणानंतर सर्व लाभार्थी मुलींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे व वैद्यकीय अधिकारी डॉ. राजीव धोत्रे वाच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

## ९ मे रोजी राष्ट्रीय लोक अदालत

**अमरावती-** जिल्ह्यातील सर्व न्यायालयात शनिवार, ९ मे, २०२६ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात दाखल व दाखलपूर्व प्रकरणे तडजोड व सामंजस्याने निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश आर. जी वाघमारे, तसेच सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे डी. एस. वमने, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या सूचनेनुसार राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोक अदालतीत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाहीत. तडजोडपात्र प्रलंबित खटले राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ठेवण्यासाठी संबंधित न्यायालयात अर्ज करावा, तसेच दाखलपूर्व प्रकरणाबाबत नजिकच्या जिल्हा किंवा तालुका न्यायालयाकडे संपर्क साधावा. मेमध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे सामंजस्य आणि तडजोडीने मिटवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डी. एस. वमने यांनी केले आहे.

## सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षक नामतालिकेसाठी (पॅनल) अर्ज आमंत्रित

**अमरावती-** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ (१)(ब) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम- ६९(१)(फ) आणि नियम १९६१ मधील तरतुदींनुसार, सहकारी संस्थाच्या लेखा परिक्षणांसाठी सन २०२६-२०२८ या कालावधीसाठी राज्यस्तरीय लेखापरीक्षकांची नामतालिका तयार करण्यासाठी mahasahakar.maharashtra.gov.in या पोर्टलवर दि. २० एप्रिलपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी अर्ज करावेत, असे आवाहन विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. ऑनलाइन अर्ज संदर्भात परिपत्रकीय सूचना व सविस्तर माहिती सहकार विभाग/सहकार आयुक्त व सहकार निबंधक यांच्या संकेतस्थळावर आणि सर्व जिल्हा उपनिबंधक जिल्हा विशेष लेखापरीक्षक विभागीय सहनिबंधक यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.


# पर्यावरणीय धोरणांना दिशा देणारा टप्पा

**शोध बायोडिग्रेडेबल बायोपॉलिमरचा हा केवळ एक वैज्ञानिक प्रयोग नसून पर्यावरणाच्या रक्षणासाठीची एक आशादायी दिशा आहे. स्थानिक संसाधनांचा उपयोग करून जागतिक समस्येचे समाधान शोधण्याची ही प्रक्रिया भारताच्या वैज्ञानिक क्षमतेचे द्योतक आहे. योग्य धोरणे, तंत्रज्ञानाचा प्रसार आणि सामाजिक सहभाग यांच्या साहाय्याने हा पर्याय भविष्यात प्लास्टिक प्रदूषणाविरुद्धची प्रभावी लढाई ठरू शकतो**

जगभरात वाढत चाललेल्या प्लास्टिक प्रदूषणाने आणि विशेषतः मायक्रोप्लास्टिकच्या संकटाने मानवजातीसमोर एक गंभीर पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक आव्हान उभे केले आहे. हवा, पाणी, माती आणि अन्नसाखळीपर्यंत पोहोचलेल्या या सूक्ष्म प्लास्टिक कणांनी आता मानवी शरीरातही प्रवेश केला असल्याचे विविध संशोधनांमधून स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक आणि टिकाऊ पर्यायांचा शोध घेणे ही काळाची गरज बनली आहे. अशा परिस्थितीत भारतीय शास्त्रज्ञांनी विकसित केलेला बायोडिग्रेडेबल ब्रायोपॉलिमर हा केवळ वैज्ञानिक शोध नाही, तर भविष्यातील पर्यावरणीय धोरणांना दिशा देणारा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. नागालँड विद्यापीठाच्या नेतृत्वाखाली झालेल्या संशोधनातून 'पॉलिहायड्रॉक्सीब्यूटिरेट' (पीएचबी) या बायोपॉलिमरची निर्मिती करण्यात आली आहे. हा पदार्थ पारंपरिक प्लास्टिकप्रमाणेच उपयोगी असला, तरी सर्वात मोठा गुण म्हणजे तो नैसर्गिकरित्या विघटित होऊ शकतो. म्हणजेच, प्लास्टिकप्रमाणे शेकडो वर्षे पर्यावरणात टिकून न राहता, तो काही आठवड्यांमध्ये किंवा महिन्यांमध्ये सूक्ष्म जीवांच्या मदतीने नष्ट होतो. हीच त्याची खरी ताकद आहे. या बायोपॉलिमरची निर्मिती 'बॅसिलस सबटिलिस एफडबल्यूआय' या जीवाणूपासून करण्यात आली असून हा जीवाणू माशांच्या कचऱ्याच्या ठिकाणी आढळून आला. कचऱ्यातूनच उपाय शोधण्याचा हा दृष्टिकोन विज्ञानाच्या नव्या शक्यता अधोरेखित करतो. या संशोधनाचे महत्त्व केवळ पर्यावरणीय दृष्टिकोनातूनच नाही, तर आर्थिक आणि औद्योगिक पातळीवरही मोठे आहे.

**प्लास्टिक उद्योग प्रदूषणाचा मोठा भाग**

पेट्रोलियमवर आधारित प्लास्टिक उद्योग हा आजच्या अर्थव्यवस्थेचा मोठा भाग आहे; परंतु त्याच वेळी तो प्रदूषणाचा प्रमुख स्रोतही ठरतो. बायोपॉलिमरच्या स्वरूपात मिळालेला हा पर्याय या अवलंबित्वात घट पडवू शकतो. याचे उत्पादन आणि वापर शक्य झाल्यास प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण कमी होईल. मायक्रोप्लास्टिकची निर्मिती आटोक्यात येईल आणि कार्बन उत्सर्जनावरही नियंत्रण मिळवता येईल. परिणामी, 'सर्क्युलर बायोइकॉनॉमी' च्या दिशेने एक भक्कम पाऊल टाकता येईल. या बायोपॉलिमरच्या गुणधर्मावर नजर टाकली, तर तो पूर्णपणे बायोडिग्रेडेबल असून मानवी शरीरासाठी सुरक्षित आहे. उच्च तापमान सहन करण्याची क्षमता त्याला औद्योगिक वापरासाठी अधिक उपयुक्त बनवते. प्रयोगशाळेतील चाचण्यांमध्ये तो मानवी पेशींशी सुसंगत आढळला आहे. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातही त्याच्या वापराच्या शक्यता निर्माण होतात. उदाहरणार्थ, औषधनिर्मिती, सर्जिकल उपकरणे किंवा जैववैद्यकीय पॅकेजिंग यांसारख्या क्षेत्रांमध्ये हा पदार्थ उपयोगी ठरू शकतो. याशिवाय कृषी क्षेत्रातही पर्यावरणपूरक प्लास्टिक म्हणून त्याचा वापर करता येऊ शकतो. नागालँड विद्यापीठाच्या नेतृत्वाखाली देशातील संस्थांमधील अनेक शास्त्रज्ञांनी एकत्र येऊन असा बायोडिग्रेडेबल बायोपॉलिमर विकसित केला आहे, जो पारंपरिक प्लास्टिकला पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकतो. प्लास्टिकचे अत्यंत सूक्ष्म कण मायक्रोप्लास्टिक म्हणून ओळखले जातात. कपडे आणि इतर वस्तूंमधील मायक्रोफायबर तुटल्यानेही मायक्रोप्लास्टिक तयार होतात. साधारणपणे एक मायक्रोमीटर ते पाच मिलीमीटर आकाराचे प्लास्टिकचे तुकडे 'मायक्रोप्लास्टिक' म्हणून ओळखले जातात.




**पृथ्वीच्या प्रत्येक भागात सूक्ष्म कण**

आज परिस्थिती अशी आहे, की हे सूक्ष्म कण हवा, पाणी आणि मातीद्वारे पृथ्वीच्या जवळजवळ प्रत्येक भागात पसरले आहेत. चिंतेची बाब म्हणजे या कणांची उपस्थिती मानवी शरीरात तसेच इतर सजिवांमध्येही आढळून आली आहे. हे कण माशांपासून मानवांपर्यंत संपूर्ण अन्नसाखळीत साचत जातात. या प्रक्रियेला 'बायोमॅग्निफिकेशन' असे म्हटले जाते. त्यात प्रत्येक स्तरावर या कणांचे प्रमाण वाढत जाते आणि शेवटी मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. संशोधनानुसार, सरासरी प्रत्येक व्यक्ती वर्षाला सुमारे ५२ हजार मायक्रोप्लास्टिक कण गिळतो. कॉनकॉर्डिया विद्यापीठाशी संबंधित संशोधकांनी १४० पेक्षा अधिक वैज्ञानिक अभ्यासांचे पुनरावलोकन करून हा निष्कर्ष काढला आहे तसेच, बाटलीबंद पाणी पिणारे लोक नळाच्या पाण्याच्या तुलनेत सुमारे नावद हजार अतिरिक्त मायक्रोप्लास्टिक कण गिळतात, असेही या संशोधनात नमूद करण्यात आले आहे. प्लास्टिकचे हे कण इतके सूक्ष्म असतात, की डोळ्यांना दिसत नाहीत. मायक्रोप्लास्टिकचा आकार एक मायक्रॉनपासून पाच मिलीमीटरपर्यंत असतो, तर यापेक्षाही सूक्ष्म कणांना नॅनोप्लास्टिक म्हटले जाते. संशोधकांनी असेही स्पष्ट केले आहे, की प्लास्टिकच्या बाटल्या तयार करताना उन्हात किंवा उष्णतेत साठवण होत राहते आणि वापराच्या प्रक्रियेदरम्यान त्यातून सूक्ष्म कण सतत बाहेर पडत राहतात. बहुतेक वेळा या बाटल्या कमी दर्जाच्या 'सिंगल-यूज' प्लास्टिकपासून बनवलेल्या असल्यामुळे तापमानातील बदलांमुळे त्यातून वारंवार छोटे कण सुटतात. इतर प्लास्टिक कण अन्नसाखळीमार्फत शरीरात प्रवेश करतात, तिथे हे कण थेट पाण्याद्वारे शरीरात जातात.

**बाटलीबंद पाण्याचे धोके**

हा अभ्यास कॉनकॉर्डिया विद्यापीठाशी संबंधित पीएचडी संशोधक सारा साजेदी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला असून त्याचे निष्कर्ष 'जर्नल ऑफ हॉर्डस मटेरियल्स'मध्ये प्रकाशित झाले आहेत. या अभ्यासात बाटलीबंद पाण्याशी संबंधित आरोग्यधोके अधोरेखित करण्यात आले आहेत. संशोधकांच्या मते हे सूक्ष्म कण शरीरात प्रवेश केल्यानंतर रक्तप्रवाहात जाऊन हृदय, मेंदू आणि इतर महत्त्वाच्या अवयवांपर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे दीर्घकालीन सूज, पेशींवर ऑक्सिडेटिव्ह ताण, हार्मोनल असंतुलन,प्रजननक्षमतेत घट, मेंदूवरील परिणाम आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो; मात्र दीर्घकालीन परिणामांविषयी अद्याप पूर्ण माहिती उपलब्ध नाही. कारण यावर पुरेशा प्रमाणात संशोधन आणि मानक चाचणी पद्धती उपलब्ध नाहीत. साजेदी यांच्या मते सरकारे प्लास्टिक कचऱ्यावर नियंत्रणासाठी कायदे करत असली तरी त्यांचा भर मुख्यतः पिशव्या, स्ट्रॉ आणि पॅकेजिंगवर आहे. बाटलीबंद पाण्यावर मात्र तुलनेने कमी लक्ष दिले जाते. आपत्कालीन परिस्थितीत प्लास्टिकच्या बाटलीतील पाणी पिणे ठीक आहे; परंतु ते दैनंदिन सवय बनवणे टाळले पाहिजे. खरा धोका तत्काळ विषारी परिणामांपेक्षा दीर्घकाळ साचणाऱ्या विषारी परिणामांमध्ये आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय शास्त्रज्ञांनी 'पॉलिहायड्रॉक्सीब्यूटिरेट (पीएचबी)' नावाचा बायोपॉलिमर विकसित केला आहे. हा पदार्थ प्लास्टिकप्रमाणे वापरता येतो; परंतु तो नैसर्गिकरीत्या विघटित होतो.

हा घटक नागालँडमधील मोकॉकचुंग जिल्ह्यातील माशांच्या कचऱ्याच्या ठिकाणाहून शोधण्यात आला आहे. म्हणजेच कचऱ्यातूनच उपाय शोधण्याचा हा एक अभिनव प्रयत्न आहे. या बायोपॉलिमरची वैशिष्ट्ये अत्यंत महत्त्वाची आहेत. तो पूर्णपणे बायोडिग्रेडेबल असून मानवी शरीरासाठी सुरक्षित आहे तसेच उत्त्व तापमान सहन करू शकतो. संशोधनात आढळले की हा जीवाणू सुमारे ६९.२ टक्क्यांपर्यंत 'पीएचवी' तयार करू शकतो. प्रयोगशाळेतील चाचण्यांमध्ये हा पदार्थ मानवी वकृताच्या पेशींशी सुसंगत आढळला. याशिवाय मातीमध्ये गाडल्यावर तो २८ दिवसांमध्ये सुमारे साठ टक्क्यांपर्यंत विघटित होतो. संशोधकांच्या मते अशा प्रकारचे बायोपॉलिमर पेट्रोलियम-आधारित प्लास्टिकवरील अवलंबित्व कमी करू शकतात आणि 'सक्युलर बायोइकॉनॉमी'ला चालना देऊ शकतात. यांचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्यास प्रदूषण आणि मायक्रोप्लास्टिकची समस्या कमी होईल. कार्बन उत्सर्जन घटेल आणि वैद्यकीय, कृषी तसेच पर्यावरणपूरक पॅकेजिंग क्षेत्रात नवीन संधी निर्माण होतील. तथापि, या तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करण्यासाठी उत्पादन खर्च कमी करणे, मोठ्या प्रमाणावर उत्पादन शक्य करणे आणि विविध पर्यावरणीय परिस्थितींमध्ये त्याचे वर्तन समजून घेणे आवश्यक आहे. तसेच लोकांमध्ये जागरूकता वाढवणेही महत्त्वाचे आहे. या संशोधनाबरोबरच काही महत्त्वाच्या आव्हानांकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.

प्रयोगशाळेतील यश आणि प्रत्यक्ष औद्योगिक उत्पादन यामध्ये मोठा फरक असतो. या बायोपॉलिमरचे उत्पादन सध्या तुलनेने खर्चिक आहे आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे अवघड आहे. याशिवाय विविध पयांवरणीय परिस्थितींमध्ये त्याचे विघटन कसे होते, त्याचा दीर्घकालीन परिणाम काय असेल, याचाही सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. यासाठी धोरणात्मक पातळीवर गुंतवणूक, संशोधनाला प्रोत्साहन आणि उद्योग-शास्त्रज्ञ यांच्यातील समन्वय आवश्यक ठरेल. यासोबतच समाजातील जागरूकताही तेवढीच महत्त्वाची आहे. प्लास्टिकच्या पर्यायांचा स्वीकार करण्यासाठी ग्राहकांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. यामुळे शासन, उद्योग आणि समाज या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यासच पर्यावरणाला अत्यंत पूरक अशा या संशोधनाचे खरे फलित कळू शकते.

**- मिलिंद बेंडाळे**

# ईपीएस-९५ पेंशन धारकांना किमान ७५०० रूपये पेंशन मिळेल?

**१७** मार्च २०२६ ला एका संसदीय समितीने ईपीएस-९५ पेंशनधारकांना निवृत्तीवेतन किमान ७५०० रूपये करावे याकरिता सरकारकडून समिती स्थापन करण्यात आली.गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस-९५ पेंशन धारक किमान पेन्शन ७५०० रूपये मिळावे यासाठी सतत आंदोलन करून ही बाब सरकारच्या व लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणून देत आहे तरीही सरकार ईपीएस-९५ पेंशनधारकांकडे दुर्लक्ष करीत आहे.या गंभीर आणि जटील समस्येकडे सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे गेल्या १२ वर्षांपासून पेंशनचा मुद्दा तसाच रखडलेला आहे.ईपीएस पेंशन धारकांची गंभीरता लक्षात घेऊन या निवृत्तीवेतनाच्या संदर्भात गेल्या १२ वर्षांपासून अनेक खासदारांनी प्रत्येक अधिवेशनात वेळोवेळी प्रश्न उपस्थित केले आणि करीत असतात व त्यावर अनेक चर्चा सुध्दा झाल्यात.परंतू या सर्व चर्चावर सरकारकडून ठोस निर्णय होत नसल्याने संपूर्ण चर्चा फोल ठरून फक्त 'चर्चेत पे चर्चा' रहाल्या आणि यांवर सरकारकडून कोणतेही ठोस पाऊल उचलल्याचे दिसले नाही.

केंद्राच्या कर्मचारी निवृत्तीवेतन योजना १९९५ (ईपीएस) अंतर्गत सध्या मिळणाऱ्या एक हजार रूपयांच्या किमान मासिक निवृत्तीवेतनाचा तातडीने आणि सर्वसमावेशक फेरआढावा घेण्याची शिफारस एका संसदीय समितीने १७ मार्च २०२६ ला केली.वाढत्या महागाईच्या काळात निवृत्तांना दिलासा देण्यासाठी निवृत्तीवेतन अधिक वास्तववादी आणि सन्मानजनक पातळीवर नेण्याची गरज व्यक्त करतांना ते दरमहा किमान ७५०० रूपये करावे अशी महत्वपूर्ण शिफारस या समितीने केली आहे.किमान मासिक पेन्शन साडेसात हजार रुपये करावे या मागणीसाठी निवृत्तीवेतनधारकांनी ९ मार्चपासून जंतरमंतर येथे तीन दिवसांचे आंदोलन केल्याच्या पार्श्वभूमीवर कामगार, वस्त्रोद्योग आणि कौशल्यविकासविषयक संसदीय स्थायी समितीने केलेली ही शिफारस लक्षणीय मानली जाते.परंतु सरकारने ईपीएस -९५ पेन्शन बद्दल कोणतीही ठोस निर्णय घेतलेला नाही.असे वाटत होते की, पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकार किमान पेंशनवर ताबडतोब ठोस निर्णय घेईल. परंतु अजूनही ठोस निर्णय घेतलेला नाही.

आज महागाईमुळे देशातील कामगारवर्ग त्रस्त आहे याचे पडसाद आपल्याला आंदोलनाच्या माध्यमातून देशभरात पहायला मिळते तरीही सरकारला अजून पर्यंत जाग आलेला नाही. महागाईमुळे कामगारांचे किती हाल बेहाल होत आहे याचे जिवंत उदाहरण नोएडा,मानेसर (पंजाब), फरिदाबाद,(भिवडी) राजस्थान येथे नुकतेच आंदोलनादरम्यान दिसून आले. कामगारांचे आंदोलन एकुण ८३ ठिकाणी झाले आणि या आंदोलनात तब्बल ४२ हजार कामगार सहभागी झाले होते. यावरून आपण समजू शकतो की, महागाईमुळे कामगारांचे किती हाल होत असतील आणि गंभीर समस्यांचा सामना करावा लागत असावा.सध्याच्या परिस्थितीत देशातील अनेक कंपन्यांमध्ये कामाचे १२ तास झाल्याचे दिसून येते. यानूसार त्यांना त्यांच्या कामाच्या मोबदल्याचे वेतन मिळत नाही.त्यामुळे त्यांना आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागला व सरकार कामगारांसमोर झुकले.पुढेचालुन हेही कामगार पेंशन धारक होणार आहेत याचाही विचार सरकारने करने गरजेचे आहे.सरकारला जर पेंशन धारकांची एवढीच काळजी असती तर लोकसभा अधिवेशनात किमान पेंन्शन ७५०० रूपये व त्यावर महागाई भत्ता देण्याची शिफारस ताबडतोब केली असती. त्यामुळे सरकारच्या करनी आणि कथनीमध्ये जमिन आसमानचा फरक दिसून येतो.आज ईपीएस पेन्शन धारक अल्पशा पेंशनमध्ये जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही

**रमेश लांजेवार**

# स्वरांचे चिरतरुण लेणे

**१२** एप्रिलला सूरसम्राज्ञी आशा भोसले यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील एका महापर्वाचा अंत झाला. आशाताईंचा महान गायिका आशा भोसले बनण्यापर्यंतचा प्रवास सोपा नव्हता. जीवनातील आणि कला विश्वातील समस्यांवर धडाडीने मात करत त्या यशाच्या शिखरावर पोचल्या. त्यांनी गायन क्षेत्रात चौफेर फटकेबाजी केली. त्यांनी गायलेल्या गाण्यांमध्ये चित्रपटातील सर्व प्रकारच्या भावभावना दाखवणारी गीते, त्यामध्ये प्रेम गीते, गझल,उडत्या चालीची असंख्य गीते यांचा समावेश होता. नाट्य संगीतापासून कॅब्रे गाण्यापर्यंतच्या सर्व प्रकारच्या गायन प्रकारांमध्ये दर्जेदार आणि उत्कृष्ट गाणी देणाऱ्या अत्यंत दुर्मिळ गायिका होत्या. गीतां द्वारे मानवी मनाचा ठाव घेण्याची दुर्लभ क्षमता आशाताईंच्या गाण्यांमध्ये होती.

प्रत्येक भावनेला न्याय देणे ही गायकाची कसोटी असते ते सर्वांना जमते असे नाही. त्यामुळे कोणी गझल गायकीपुरता सिमित राहतो,कुणी भजन सम्राट होतो, तर कोणी आलापी गायनाद्वारे नाट्यगीते गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध करतो,तर कुणी तरल भावनांना हात घालणारी केवळ भावगीते गाऊन रसिकांच्या भावनांचा विश्वासचा प्रवास घडवून आणतो. आशाताईंचा आवाज प्रत्येक भावनांना न्याय देणार होता.'आईये मेहरबान' ज्या शैलीदार पद्धतीने गायल्या तितक्याच तोडीने 'पांडुरंग कांती' यासारखे अभंग ही गायले. 'रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा''विठ्ठल तो आला आला' हे अभंग आपल्यात भक्ती भाव निर्माण करतात. तर 'ओ हसीना जुल्फो



वाली' 'झुमका गिरा रे' या उडत्या लयबद्ध चालींची गाणी तितक्याच खटाळपणे आणि एक प्रकारच्या मस्तीत गायल्यामुळे संगीत प्रेमी मध्ये एक वेगळाच उत्साह निर्माण करत असत.आशा भोसले आणि सुधीर फडके ही मराठी चित्रपट सृष्टीतील सुवर्ण जोडी होती. त्यांनी आजवर अनेक भावगीते, चित्रपट गीते रसिकांना दिले आहे.अष्टपैलू गायकी ही त्यांना मिळालेली निसर्ग दत्त देणगी मात्र त्यासह त्यांनी घेतलेले कष्टही तितकेच महत्त्वाचे होते. गाण्याचे शब्द, गाण्याची चाल, गाण्याचा ताल,गाण्यातील भावना या सर्व गोष्टींच्या उत्कृष्ट मेळ घालत आशाताई गाणी गात. चित्रपटातील नायिका आणि चित्रपटातील तिची व्यक्तिरेखा यांच्याशी अत्यंत मिळते जुळते असे गाणे गाण्यात त्यांचा हातखंडा होता.

'अच्छा जी मै हारी चलो मान जाओ ना'हे मधुबालासाठी गायलेले गाणे जसे मधुबालाचे होऊन जाते तसे इजाजत मधील,मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा है' हे नायिका अनुराधा पटेल हिच्यासाठी गायलेले गाणे तिची व्यथा मांडते.सर्वच गायिकांचे आवाज सर्वच नायिकांना शोभतात असे नाही पण आशाताईचा आवाज गेल्या सहा पिढ्यातील सर्व नायिकांना शोभला नव्हे तो त्या नायिकांचाच होऊन गेला. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांनी अभिनेत्री तनुजा यांच्यासाठा'बाग में कली खिली' हे गाणे १९६५ मध्ये तितकेच लोकप्रिय झाले, तर त्यांची कन्या काजोल यांच्यासाठी १९९५ मध्ये गायलेल्या 'जरासा झुंम लू मैं' या गाण्यावर तरुण पिढी थिरकली.दोन्ही गाण्यांमध्ये तीस वर्षाचा कालावधी होता. एकाच गायिकेने आई आणि तिची मुलगी यांच्यासाठी पार्श्वगायन करणे आणि दोन्ही ठिकाणी तो आवाज तितकाच चपलख बसणे हे त्यांच्या अफाट कौशल्याचे प्रतिक होते.आशाताईंचे वय वाढले मात्र त्यांचा आवाज वृद्ध झाला नाही. वयापरतवे त्यांच्या आवाजाची धार वाढत गेली.आशाताई केवळ गात नसत तर त्या आवाजातून अभिनय करत.पडद्यावर अभिनेत्री कशी दिसणार आहे,तिची देहबोली कशी आहे हे ओळखून त्यांच्या गाण्यात व्यक्त होत असत म्हणूनच त्यांचा आवाज तनुजा यांच्या चंचलपणाला आणि काजोलच्या बिनधास्त व्यक्तिमत्त्वाला सारखाच साजेसा ठरला .


आशा भोसले यांचे आयुष्य संघर्षाने भरले होते. त्यांनी कष्टाने मुलांना वाढवले. तसेच गायन क्षेत्रातही स्वतःचा ठसा उमटला.ज्या काळात स्त्रीकडे केवळ चूल आणि मूल सांभाळणारी म्हणून पाहिले जात होते. त्यावेळी त्यांनी मिळवलेले यश म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण ठरते. त्यांचा मुलगा हेमंत याचे कर्करोगाने निधन तर मुलगी वर्षा यांनी आत्महत्या केली. तीन वर्षाच्या कालावधीत त्यांनी दोन्ही मुलांना गमावले.हा त्यांच्यासाठी मोठा आघात होता मात्र त्या डगमगल्या नाही उलट्या आणखीन कणखर,शांत,संयमी होत गेल्या.त्या आयुष्य खरा अर्थाने जगल्या. त्यांचे आयुष्यावर प्रेम होते किंबहुना यामुळेच ते त्यांच्या गाण्यात जो रसरशीतपणा किंवा उत्साह ओसंडून जातो त्यामागे त्यांना आयुष्य जगण्याची जी कला उमगली होती तेच कारण आहे. त्यांनी पराभव मानला नाही, संघर्ष करायला कधीही मागे हटल्या नाहीत. त्यांचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी त्यांच्यावरील आघातांचे कधीही भांडवल केले नाही किंवा त्याद्वारे लोकांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी जे यश संपादन केले ते स्वबळावर.

सहसा मोठा वृक्षाच्या छायेखाली लहान झाडांची वाढ खुंटते असे म्हटले जाते परंतु मंगेशकरांच्या घराण्यातील लतादीदी नावाच्या वटवृक्ष समान पवित्र, निखळ आणि घनदाट अशा स्वरवृक्षाच्या छायेत राहूनही आशाताईंनी स्वतःचा स्वतंत्र,बहरलेला आणि मोठा वृक्षाच्या मोठेपणाच्या अगदी समिप असलेला असा दुसरा स्वरवृक्ष उभा केला. या दोन्ही स्वरवृक्षांच्या अल्हाददायक छायेखाली केवळ भारतीयच नव्हे तर जगभरातील संगीत प्रेमींनी सात दशकाहून अधिक काळ मनमुराद स्वरानंद अनुभवला.

आशाताईंना अष्टपैलू गायिका म्हणून घडविण्यात संगीतकार ओ.पी. नय्यर आणि आर डी बर्मन यांचाही मोठा वाटा होता.आशाताईंचे गाणे कधीच संपत नाही तर ते आपल्या मनात आठवणीत आणि ओठावर कायम राहते. आशा भोसले हे केवळ एका गायिकेचे नाव नव्हते तर तो सुरांचा सुंदर प्रवास होता. या प्रवासात त्यांनी कानसेनांना अक्षरशः सुरांनी न्हावू घातले. हा प्रवास अलौकिक अर्थाने संपला असला तरी हे नाव भारतीय संगीताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. वर्ष १९३३ मध्ये सांगली येथे त्यांचा जन्म झाला.वर्ष १९४९ पासून त्यांनी गायनाला प्रारंभ केला. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, तामिळ, तेलगू आदी २० भाषांमध्ये १२ हजारापेक्षा जास्त गाणी गायली आहेत. सर्वश्रेष्ठ महिला पार्श्वगायिका म्हणून त्यांना १९८१ आणि १९८६ मध्ये राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला. त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तसेच चित्रपट क्षेत्रातील सर्वात मानाचा समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कारही प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र सरकारने मार्च २०२३ मध्ये त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविले होते. सर्वाधिक गाणी म्हणण्याचा त्यांचा विक्रम आहे. अष्टपैलू गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आशाताईंचा संघर्षमय प्रवास नवोदित गायकांसाठी प्रेरणादायी आहे.

**लीना गाडगीळ**

# अक्षय तृतीया: मांगल्याचा आणि समृद्धीचा अनमोल सण



भारतीय संस्कृतीत साडेतीन मुहूर्तांना अत्यंत महत्त्व आहे, त्यापैकी एक पूर्ण मुहूर्त म्हणजे 'अक्षय तृतीया'.वैशाख शुद्ध तृतीयेला साजरा होणारा हा सण केवळ धार्मिक दृष्टीनेच नाही, तर सामाजिक आणि आध्यात्मिक दृष्टीनेही विशेष मानला जातो.'अक्षय' म्हणजे ज्याचा कधीही क्षय होत नाही, जे कधीही संपत नाही असे. म्हणूनच या दिवशी केलेले दान, जप आणि सत्कर्म अक्षय फळ देणारे ठरतात, अशी लोकश्रद्धा आहे.

याच दिवशी त्रेतायुगाची सुरुवात झाली असे मानले जाते.विष्णूचा सहावा अवतार मानल्या जाणाऱ्या भगवान परशुरामांचा जन्म याच तिथीला झाला.भगीरथाच्या तपस्येमुळे गंगा नदी स्वर्गातून पृथ्वीवर अवतरली तो दिवस म्हणजे अक्षय तृतीया.महाराष्ट्रात आणि संपूर्ण भारतात हा सण उत्साहाने साजरा केला जातो.

या दिवशी पाण्याचे दान (उदकुंभ दान) श्रेष्ठ मानले जाते. कडक उन्हाळ्याचे दिवस असल्याने तहानलेल्यांना पाणी पाजणे, मातीचा माठ दान करणे किंवा गरिबांना अन्नदान करणे याला मोठे पुण्य लाभते.आपल्या पूर्वजांचे स्मरण करून त्यांच्या नावाने पाण्याचा घडा आणि छत्री दान करण्याची पद्धत अनेक ठिकाणी आहे.'अक्षय' समृद्धीसाठी या दिवशी सोने खरेदी करणे शुभ मानले जाते. यामुळे घरात लक्ष्मीचा कायमचा वास राहतो, अशी धारणा आहे.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा दिवस अत्यंत महत्त्वाचा असतो. या दिवशी नवीन पेरणीची किंवा शेतीकामाची सुरुवात केली जाते. विदर्भात आणि खान्देशात 'अक्षय्य तृतीये'ला मातीच्या घागरीची पूजा करून पितरांना नैवेद्य दाखवला जातो.स्वतःकडील संपत्तीचा काही अंश सत्पात्री व्यक्तीला अर्पण केल्यामुळे मनुष्यातील अहंकाराचा नाश होतो. सत्पात्री दान करताना धर्म प्रसार करणाऱ्या संस्था,संत,धार्मिक कार्य करणाऱ्या व्यक्ती,आध्यात्मिक संस्था,मंदिरे अशा ठिकाणी करणे योग्य ठरेल. निस्वार्थ भावनेने केलेले दान चित्त शुद्धीसाठी कारणीभूत ठरते, असे मानले जाते.

अक्षय तृतीया हा सण आपल्याला कृतज्ञता आणि दातृत्वाची शिकवण देतो. निसर्गातील बदल स्वीकारत, पूर्वजांचे आशीर्वाद घेत आणि दानाचा आनंद लुटत हा दिवस साजरा केला जातो. आपल्या आयुष्यातील सुख, शांती आणि समृद्धी अक्षय राहो, हाच संदेश हा सण आपल्याला देतो.

**वर्षा आवदे**
नागपूर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला जिल्हा विशेष

# शनिवारी वत्सल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल लोकार्पण सोहळ्याचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

कर्मयोगी शल्यविशारद डॉ. अरुण भागवत यांचे स्वप्नपूर्ती स्वरूप 'वत्सल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल'चा लोकार्पण सोहळा शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी सकाळी ९:३० सर्वांच्या उपस्थितीत संपन्न होत असून यात आधुनिक व विविध उपचाराची सोय उपलब्ध करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

डॉ. अरुण भागवत यांनी आपल्या जीवन काळात निर्माण केलेल्या वैद्यकीय संकल्पनेचे रुग्णसेवेत निष्ठेने व आग्रहाने परिपालन केले. 'शिव भावे जीव सेवा' हे सेवाव्रत त्यांनी निष्ठेने आचरणात आणले. मेळघाट परिसरातील दुर्गम आदिवासी भागामध्ये जाऊन अनेक व विविध व्याधी संबंधी शिबिरे आयोजित करून मोफत शल्यचिकित्सा व औषधोपचार यशस्वीरित्या पूर्णत्वास नेले. अनेक अत्याधुनिक प्रगत तंत्रज्ञान त्यांनी वऱ्हाड परिसरात सर्वप्रथम उपलब्ध केले. दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया त्यांनी स्वतः आत्मसात करून प्रयोगात आणली. त्याचा फार मोठा फायदा वऱ्हाडातील रुग्णांना घेता आला. गोरक्षण रोड स्थित असलेले 'वत्सल हॉस्पिटल' डॉ. भागवतांनी नेहमीच आधुनिक स्वरूपात सर्व सोयींनी उपलब्ध केले. लोकार्पण होत असलेले 'वत्सल सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल' जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान वापरून भव्य अशा वास्तुत बिर्ला कॉलनी, उड्डाणपूल जवळ, जठारपेठ येथे निर्माण केले. अशा या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचा लोकार्पण सोहळा संपन्न होत आहे. डॉ. अरुण भागवत यांचे प्रतीच्या आपल्या भावना व्यक्त करण्याकरिता या लोकार्पण सोहळ्यास पालकमंत्री आकाश फुंडकर, खा अनुप धोत्रे, आ रणधीर सावरकर, आ साजिद खान पठाण, आ नितीन देशमुख, माजी मंत्री गुलाबराव गावंडे, अजहर हुसेन, माजी आ वसंतराव खोटरे, गजानन दाळू गुरुजी, गोपीकिशन बाजोरिया, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे, शेतकरी नेते प्रकाशभाऊ पोहरे, एपीएमसी. चे सभापती शिरीष धोत्रे हे प्रामुख्याने राहतील. डॉ. अरुण भागवत यांनी गेली ४५ वर्षे शल्यचिकित्सेद्वारे रुग्णांना अविरत आरोग्य सेवा दिली. या काळात त्यांनी आपल्या कौशल्याने अनेक क्लिष्ट व गंभीर शस्त्रक्रिया यशस्वी केल्या. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे फायदे आपल्या भागातील रुग्णांना मिळावेत हा त्यांचा मानस आणि दृष्टिकोन होता. या प्रेरणेतून या अत्याधुनिक हॉस्पिटलची निर्मिती झालेली आहे.

'वत्सल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल' च्या स्वरूपात त्यांचा हा मानस पूर्णत्वास येत आहे. या हॉस्पिटलच्या लोकार्पण सोहळ्यास अगत्यपूर्वक उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. भागवत कुटुंबाच्या वतीने करण्यात आले.

## Change In Name

My Old Passport No is -(R9769818) I Have change my Name From
**GOPALDAS CHHAGANLAL CHANDAK**
-TO-
**GOPAL CHHAGANLAL CHANDAK**
My Residential Address is --5/24 Anand Bhavan Bhagwat plots Nisarg Residency Behind TWC Gym Umri pr jatharpeth Akola 444005

## Change In Name

I Have Change My Name in My Son's Passport No is (M1180165) From
**JAYA KHUPSE**
-TO-
**JAYSHRI MUKUND KHUPSE**
My Residential Address is-- Near Sudhir Colony Chowk, Ravi Nagar Akola Maharashtra 444005.

## Change In Name

I Have Change My Name in My Daughter's Passport No is (R5370092) From
**SAMMER BOSE**
- TO -
**SAMEER DILIP BOSE**
My Residential Address is -- Netaji Bengali Colony Bhadravati Post. Bhadravati Chandrapur Maharashtra 442902.

## Change In Name

Old Name:-
**MOHD NAASIR MOHD SAHEB**
New Name:-
**MOHAMMAD NASIR MOHAMMAD SAHEB**
ADDRESS:- HAFIZ PURA MANGRULPIR, TQ, MANGRULPIR, DIST, WASHIM

## Change In Name

Old Name:-
**ZAHORA ANJUM MOHD NAASIR**
New Name:-
**ZAHURA ANJUM MOHAMMAD NASIR**
ADDRESS:- HAFIZ PURA MANGRULPIR, TQ, MANGRULPIR, DIST, WASHIM

## जाहीर नोटीस

### वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ५२२/२०२६ प्रोसेस नं.४८२७/२०२६
चौ.ता. १५/०६/२०२६ दिनांक : ०८/०४/२०२६

**अर्जदार :** १. दिपिका अर्जुन ढोरे रा. हनुमान मंदिर जवळ, योगिराज सेठी नगर, खदान, अकोला. ता. जि. अकोला. २. मोनिका निखिल राजपूत रा. राजपूत वाडा, मुन्सीपाल सेल जवळ, शिरपरू, ता. जि. धुळे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अर्चना राजू काळे
**पत्ता :-** रा. हनुमान मंदिर जवळ, योगिराज सेठी नगर, खदान, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अर्चना राजू काळे यांचे दि. ०२/१०/२०१७ रोजी अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ५५१/२०२६ प्रोसेस नं.४९४७/२०२६
चौ.ता. ०९/०६/२०२६ दिनांक : ०९/०४/२०२६

**अर्जदार :** १. पुरूषोत्तम रामराव टोहरे रा. शरद नगर, शिवर, अकोला. ता जि. अकोला. २. मीना पांडुरंग विखे रा. शरद नगर, शिवर, अकोला. ता. जि अकोला. ३. मनोरमा विजय मोहोकार रा. बार्शिटाकळी, पुनोती बु, अकोला. ता. जि. अकोला. ४. शीलाबाई भीमराव वाघ रा. पावसाळे लेआउट, झाबाजी महाराज, अकोला. ५. सुरेखा माणिकराव मोहोकार रा. बार्शिटाकळी, पुनोती बु, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामराव तुळशीराम टोहरे
**पत्ता :-** रा. शरद नगर, शिवर, अकोला. ता जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामराव तुळशीराम टोहरे यांचे दि. ०९/०५/२०२१ रोजी शरद नगर, शिवर, अकोला. ता जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ५३२/२०२६ प्रोसेस नं.४८१४/२०२६
चौ.ता. ११/०६/२०२६ दिनांक : ०८/०४/२०२६

**अर्जदार :** १. गुणवंती ज्ञानदेव गावंडे रा. साई मंदिरा जवळ, साईनाथ नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. अनीता जयवंत मालोकार रा. दुध डेअरी जवळ, मालिपुरा, बार्शीटाकळी, अकोला. ता. जि. अकोला. ३. प्रदीपकुमार ज्ञानदेव गावंडे रा. पंचमुखी चौक, साई नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ४. संदीप ज्ञानदेव गावंडे रा. पंचमुखी चौक, साई नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : ज्ञानदेव पंढरी गावंडे
**पत्ता :-** रा. पंचमुखी चौक, साई नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ज्ञानदेव पंढरी गावंडे यांचे दि. १४/०३/२०२५ रोजी साई नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि.अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर असे होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ५२९/२०२६ प्रोसेस नं.४८१८/२०२६
चौ.ता. १५/०६/२०२६ दिनांक : ०८/०४/२०२६

**अर्जदार :** १. आशा प्रकाश शिंदे रा. मु. पो. सुकोडा, ता. जि. अकोला. २. किरण मंगेश गालट रा. ढोणे कॉलनी, साई नगर, शिवर, अकोला. ३. पल्लवी पांडुरंग काजे रा. पिंपरी निपाणी नांदगाव खंडेश्वर, अमरावती. ता. जि. अमरावती. ४. वैभव प्रकाश शिंदे रा. मु. पो. कानडी सुकोडा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रकाश रामकृष्ण शिंदे
**पत्ता :-** रा. मु. पो. कानडी सुकोडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रकाश रामकृष्ण शिंदे यांचे दि. १०/०१/२०२६ रोजी मु. पो. कानडी सुकोडा, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ५३५/२०२६ प्रोसेस नं.४८१२/२०२६
चौ.ता. ०२/०५/२०२६ दिनांक : ०८/०४/२०२६

**अर्जदार :** १. सविता रघुनाथ तेलगोटे रा. स्वामी समर्थ केद्रा जवळ, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. लता रघुनाथ तेलगोटे रा. स्वामी समर्थ केंद्रा जवळ, उदय नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. रवींद्र रघुनाथ तेलगोटे रा. पोलीस हेड क्वार्टर उप्पलवाडी, नागपूर. ४. अलका रघुनाथ तेलगोटे रा. स्वामी समर्थ केंद्रा जवळ, उदय नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ५. ज्योती रघुनाथ तेलगोटे रा. स्वामी समर्थ केंद्रा जवळ, उदय नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रघुनाथ पुंजाराम तेलगोटे
**पत्ता :-** रा. स्वामी समर्थ केंद्रा जवळ, उदय नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रघुनाथ पुंजाराम तेलगोटे यांचे दि. २४/०७/२०२५ रोजी स्वामी समर्थ केंद्रा जवळ, उदय नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), बार्शिटाकळी, जि. अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ४४/२०२६ प्रोसेस नं.१९५/२०२६
चौ.ता. २५/०३/२०२६ दिनांक : २०/०२/२०२६

**अर्जदार :** १) अंबादास तुळशीराम घोडे, २) भगवान तुळशीराम घोडे, ३) पुंडलिक तुळशीराम घोडे, ४) वत्सलाबाई नागोराव पवार, ५) संगीता विनोद खवेकर अर्जदार क्र. ०१ ते ०२ रा. पिंजर, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला अर्जदार क. ०३ रा. जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला, ता. जि. अकोला अर्जदार क. ०४ रा. माळीपूरा, महान, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला अर्जदार क. ०५ रा. संजय नगर, मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : परशराम जाणु घोडे
**पत्ता :-** रा. पिंजर, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत परशराम जाणु घोडे यांचे दिनांक २१/०१/१९९३ रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क.स्तर), बार्शिटाकळी जि. अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १३३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# महाराष्ट्र शासन
# कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
# सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला- ४४४००१
# दरपत्रक सुचना - २०२५-२०२६

जावक क्रंमाक २५६८/भांडार/२०२६/दिनांक १०/४/२०२६

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला हे या कामाचे/ साहित्याचे दरपत्रके ( Quotation ) अंदाजपत्रक तयार करणे करिता मागवीत आहेत/विहीत नमुना मध्ये भरुन कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांचे नावे बंद/सिलबंद लिफाप्यात दि. १७/०४/२०२६ ते दि.२४/०४/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यंत सादर करावेत. सदर ई-दरपत्रक सुचना महाराष्ट्र शासनाच्या PWD या वेबसाईड वर - www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर Pay PWD Onli या लिंकवर उपलब्ध आहे. तसेच या बाबतची संपूर्ण विस्तुत माहिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे.

**शती व अटी**

१ दर नमुद केलेल्या दिनांक व वेळेनंतर निविदा स्विकारल्या जाणार नाही.

२ कोणतीही निविदाकोणत्याही कारणायशिवाय नाकारण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवलेले आहेत.

३ ज्या निविदा धारकांचे दर सर्वात कमी राहील त्यांचे दर मंजूर केल्या जातील.

४ देयकाचे भुगतान उपलब्ध असलेल्या निधीतून करण्यांत येईल.

५ दरपत्रकासोबत पॅन कार्ड /शॉप ॲक्ट/जीएसटी ( प्रमाणपत्राची) छायाप्रत सादर करावी.

| Sr. No | Description | Quantity | Rate | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Providing And Fixing Corner enclosure with one fixed glass and openable door on the front apte fixed glass on the side covered with a roof on the top. Make Jarque or Equivalent ETC. Glass: 8mm / 10mm<br>Finish: Chromeas per directions and approval of Engineer-in-charge.<br>Size - 11: 2100W: 1200-160omm etc. complete. | NO | | |
| 2 | Providing and laying vitrified mirror / glossy finish tiles decorative type having size 2780 mm x 1200 mm of 8 to 10 mm thickness and confirming of approved make. shade and pattern for flooring in required position laid on a bed of 1.4 cement mortar including neat cement ftoat, filling joints, curing and clearing etc. complete as per directions and approval of Engineer-in-charge. | SQ.M | | |
| 3 | Providing and laying vitrified mirror / glossy finish tiles decorative type having size 1200 mm x 1200 mm of 8 to 10 mm thickness and confirming of approved make. shade and pattern for flooring in required position laid on a bed of?: cement mortar including neat cement float, filling joints, curing and clearing etc. complete as per directions and approval of Engineer-in-charge. | SQ.M | | |
| 4 | Providing and laying vitrified mirror / glossy finish tiles decorative type having size 58 mm x 250 mm of 8 to 10 mm thickness and confirming of approved make, shade and pattern for flooring in required position laid on a bed of 1:4 cement mortar including neat cement float, filling joints, curing and clearing etc. complete. as per directions and approval of Engineer-in-charge. | SQ.M | | |
| 5 | Providing and laying vitrified mirror/glossy finish tiles decorative type having size 2400 mm x 1200 mm of 8 to 10 mm thickness and confirming of approved make. shade and pattern for flooring in required position laid on a bed of 1-4 cement mortar including neat cement foat, filling joints, curing and clearing etc. complete as per directions and approval of Engineer-in-charge | SQ.M | | |
| 6 | Provide laying Artificial (300omm X 800 MM ) granite stone of 18 to 20 mm thick för door frame/ dado/ window boxing etc. On C.M. 1.6 including filling joints with polymer base filler One Numbering/moulding the sharp edges wherever necessary. curing, etc. complete as per directions and approval of Engineer-in-charge. | SQ.M | | |
| 7 | Providing and applying a single component, direct-to-metal. ambient curing anti-corrosion protective coating based on advanced grafted co-polymer technology. eliminating, the requirement of conventional primer and multi pack systems Of CORROSIL OR EQUIVALENT. The coating shall provide simultaneous barrier protection, adhesion promotion, and corrosion resistance in a single layer system. suitable for application on structurally prepared mild steel, galvanized steel, and previously coated surfaces. The coating shall be. Single pack, ready-to-use system with no mixing or induction time. Self-priming direct-to-metal coating providing strong adhesion on hand tool cleaned surfaces Zero VOC and solvent-free formulation ensuring safe application is operational industrial environments. Fast ambient curing enabling rapid recoating and early handling without oven baking ** Capable of providing long-term corrosion resistance under industrial, coastal, and chemical exposure conditions Surface preparation shall include mechanical cleaning using power tool / wire brushing to remove rust, scale, oil, grease, and loose contaminants, followed by dust removal. The coating shall be applied in the specified film thickness as per manufacturer recommendations to achieve durable corrosion protection. The contractor shall ensure coating performance including adhesion. corrosion resistance, and durability as per manufacturer guidelines and to the satisfaction of the Engineer-in-Charge. | SQ.M | | |
| 8 | Providing and applying two coats of single component, direct-to-metal, fire retardant anti-corrosion coating based on advanced grafted co-polymer technology, capable of providing simultaneous corrosion protection and flame retardant performance under ambient curing conditions Of CORRONIL FR OR EQUIVALENT. The coating shall be: Single pack, ready-to-use system with no mixing or induction time Self- priming and suitable for application directly on properly prepared mild steel / galvanized steel Zero VOC formulation, suitable for application in operational industrial insensitive environments? Fire retardant coating meeting relevant flame spread and fire performance standards as per approved test certifications Capable of providing long-term corrosion resistance in industrial, coastal and chemically aggressive atmospheres The coating shall be applied in the manufacturer's recommended dry film thickness to achieve both corrosion resistance and fire retardant performance, strictly as per manufacturer's specifications and as approved by the Engineer-in-Charge. | SQ.M | | |
| 9 | Providing and applying two coats of single component antibacterial bygienic internal coating suitable for pharmaceutical, healthcare, laboratory and controlled production environments, designed to provide microbial resistance and a smooth, easy-to-clean surface finish Of INTERGRANDE OR EQUIVALENT. The coating shall be Zero VOC and odour free, suitable for occupied interior areas, and shall demonstrate antibacterial performance as per relevant test standards. The coating thickness and methodology of application shall be strictly as per manufacturer's specifications and as approved by the Engineer-in-Charge. Surface preparation shall include cleaning of the substrate to remove dust, fungus, loose particles, oil and contaminants using mechanical cleaning and water washing wherever required, ensuring a dry and sound surface prior to application, all complete. The coating shall form a seamless, washable and stain resistant finish suitable for maintaining hygienic conditions in sensitive interior environments. The contractor shall provide assurance for antibacterial performance. coating durability, and cleanability of the surface, all complete as directed by the Engineer-in-Charge. | SQ.M | | |
| 10 | Providing and applying two coats of single component protective decorative coating suitable for, concrete, masonry and industrial substrates. designed to provide durable surface pitccion along with an aesthetic finish under industrial and outdoor exposure conditions of PRODECOAT OR EQUIVALENT. The coating shall exhibit good abrasion resistance, weather durability and surface protection, and shall be Zero VOC and suitable for application in operational environments. The coating thickness and methodology of application shall be strictly as per manufacturer's specifications and as approved by the Engineer-in-Charge. Surface preparation shall include cleaning of the substrate using mechanical methods such as wire brushing to remove dust, loose particles, oil, grease and contaminants, followed by water cleaning wherever required to obtain a sound and dry surface prior to application, all complete. The coating shall provide a uniform, washable and long-lasting finish with resistance to surface degradation under normal service conditions. The contractor shall provide assurance for coating durability, adhesion and finish performance, all complete as per direction. | SQ.M | | |
| 11 | Providing and applying two coats of high albedo heat reflective coating having minimum Solar Reflective Index (SRI) of 108 with solar reflectance and thermal emittance tested as per ASTM C 1549 and ASTM C1371 respectively, and VOC content less than 10 g/L... The coating shall provide solar heat reflection, surface temperature reduction, UV resistance and waterproof protective performance, suitable for application on concrete, metal and existing roof substrates Of SURFACOOL OR EQUIVALENT. The coating thickness and methodology of application shall be strictly as per manufacturer's specifications and as approved by the Engineer-in-Charge. Surface preparation shall include mechanical cleaning using wire brushing and water washing to remove dust, loose particles, fungus and contaminan followed by drying of the surface prior to application, all complete. The coating shall be applied in uniform coats to achieve the specified dry film thickness and shall provide durable heat reflective performance along with resistance to weathering and surface degradation. The contractor shall provide assurance for SRI performance, heat reduction efficiency and durability of the coating system, all complete as per direction of the Engineer-in-Charge. | SQ.M | | |
| 12 | Providing and applying one coat of single component primer/bonding coat designed to improve adhesion, scal substrate porosity and enhance the performance of subsequent coating systems on concrete, masonry and metal surfaces PRIMECOAT OR EQUIVALENT. The primer shall provide strong substrate bonding, surface consolidation and uniform absorption control, enabling better durability and finish of the topcoat system. The coating thickness and methodology of application shall be strictly as per manufacturer's specifications and as approved by the Engineer-in- Charge. Surface preparation shall include mechanical cleaning using wire brushing and water washing to remove dust, loose particles, oil, grease, fungus andcontaminants, followed by drying of the surface prior to primer application, all complete.<br>The primer shall be applied uniformly to form a sound bonding layer ensuring improved adhesion and durability of the coating system. The contractor shall provide assurance for bonding performance, substrate scaling and compatibility with subsequent coatings, all complete as directed by the Engineer-in-Charge. | SQ.M | | |
| 13 | Providing and applying two coats of transparent breathable water-repellent protective coating on advanced grafted co-polymer technology, specifically designed for protection of exterior ceramic tiles, natural stone and masonry surfaces without altering the natural colour, texture or finish of the substrate Of PRODECOAT CLEAR OR EQUIVALENT. The coating shall be a single component clear system providing deep penetration and water repellency, resistance to staining, algae and fungal growth, and excellent UV stability for long-term exterior durability. The coating shall allow vapour transmission to prevent moisture entrapment and surface deterioration. The coating thickness and application methodology shall be strictly as per manufacturer's specifications and as approved by the Engineer-in-Charge. Surface preparation shall include cleaning of ceramic / stone surfaces using mechanical cleaning and water washing to remove dust, cement residue, efflorescence, fungus and contaminants, followed by complete drying prior to application, all complete. as per directions and approval of Engineer-in-charge. | SQ.M | | |
| 14 | Providing and applying 3-in-1 metal surface treatment chemical for simultaneous degreasing, derusting and phosphating of metal surfaces to prepare the substrate for subsequent painting or coating application. The chemical shall effectively remove oil, grease, rust and surface contaminants while forming a conversion phosphate layer that improves paint adhesion and corrosion resistance OrCLEANOL OR EQUIVALENT. Application shall be carried out by brush, swabbing or immersion as per manufacturer's recommendations and as approved by the Engineer-in-Charge. Surface preparation shall include removal of loose scale and heavy contaminants followed by uniform application of the chemical solution allowing adequate contact time for effective cleaning and phosphating, after which the surface shall be wiped and allowed to dry prior to coating application, all complete. The treated surface shall provide a clean, adhesion-promoting base suitable for primers, paints and powder coatings. The contractor shall ensure proper surface treatment and compatibility with subsequent coating systems, all complete as per direction of the Engineer-in-Charge. | SQ.M | | |
| 15 | Providing and applying two coats of flexible waterproofing coating based on advanced polymer technology, capable of forming a seamless protective membrane to prevent water ingress and accommodate minor surface movements and cracks. The coating shall exhibit high adhesion, flexibility and crack-bridging properties, along with resistance to moisture penetration and surface deterioration Of POLYSEAL OR EQUIVALENT. The coating thickness and application methodology shall be strictly as per manufacturer's specifications and as approved by the Engineer-in-Charge. Surface preparation shall include cleaning of the substrate using mechanical methods and water washing to remove dust, loose particles, fungus and contaminants, followed by drying of the surface. Visible cracks shall be opened and treated with suitable sealant prior to coating application, all complete. The coating shall be applied in uniform coats to achieve the specified dry film thickness and shall provide durable waterproofing performance and surface protection. The contractor shall provide assurance for waterproofing effectiveness, adhesion and durability of the coating. | | | |
| 16 | Providing and applying Polymer Membrane Technology (PMT) waterproofing to system isting of liquid applied polymer coating reinforced with flexible membrane fabric, forming a seamless, durable and crack-bridging waterproof barrier for terraces. slabs and exposed concrete surfaces of MEMBRANE OR EQUIVALENT. The system shall comprise application of base coating followed by embedding of polymer membrane fabric and subsequent top coating to form a reinforced waterproof membrane capable of accommodating structural movement, expansion and contraction without failure. The coating thickness and application methodology shall be strictly as per manufacturer's specifications and as approved by the Engineer-in-Charge. Surface preparation shall include cleaning of the substrate using mechanical methods and water washing to remove dust, loose particles, fungus and contaminants, followed by crack treatment and drying of the surface prior to application, all complete. The PMT system shall provide excellent water impermeability, UV resistance, flexibility and abrasion resistance, ensuring long-term | SQ.M | | |
| 17 | Providing And Supplying Polytunnel Shade net 40 x 52= 2080 Sq Mir Round type tunnel total GI structure of column pipes. profile. Zig-Zag spring-locking, Gutter for Covering Poly fil 300 Micron and four side Shade net, 50% Side net with 5Mtr Center height as per directions and approval of Engineer-in-charge. | SQ.M | | |
| 18 | Providing And Supplying High-tech irrigation system including Inline Drip lateral. Inside main and ub main pvc pipes, Fogger system. Sand filter, Disc-filter. Ventury system with instillation & testing. (2080 Sq. Mtr.) as per directions and approval of Engineer lin-charge. | SQ.M | | |
| 19 | Providing And Supplying Naturally Ventilated Polyhouse as per NHB norms 1008 Sq. Mir28 x 36) Total GI structure of column pipes, profile, Zig-zag spring-locking Gutter, Drain out pvc pipes, Israel make Ginegar diffuse 200ml cron poly film, 50% Shade net, 30% Side net with 6.5 mtr center height. Above all includes, making foundation, complete structure- erection. Fix-Ing of Poly film, shade net including transportation cost.as per directions and approval of Engineer-in-charge. | SQ.M | | |
| 20 | Providing And Supplying High-tech irrigation system including Inline Drip lateral. inside main and sub main pvc pipes. Fogger system, Sand filter, Disc-filter. Ventury system With instillation & testing. (108 Sq. Mtr.) as per directions and approval of Engineer in-charge. | SQ.M | | |
| 21 | Providing and Supply Biopeat - SG (Cocopeat)Coco peat (coir pith) is a sustainable. organic growing medium with standardized specifications for horticultural use. Key properties include a pH of 5.5-6.8. low moisture (10-15%), and low Electrical Conductivity (EC) below (for washed types).as ner directions and approval of Engineer-in-charge | KG | | |
| 22 | Providing and supply Bx- 6oox4oox180 mm (TP) try of products comprises Plastic Pallets. Double Wall Plastic Crate. Heavy Duty Plastic Crate as per directions and approval of Engineer-in-charge. | NO | | |
| 23 | Providing and fixing stainless steel kitchen trolley baskets made of SS-304 / SS-202 grade stainless steel wire with chrome finish in modular kitchen cabinets including heavy duty telescopic sliding channels (ball bearing type). PVC/SS drip tray, screws. brackets and all necessary fittings complete as per approved design, size and direction of Engineer-in-Charge. | NO | | |

**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विभाग अकोला**

# श्रेयाच्या नशेत 'दुरंतो'चा तमाशा

## रिकाम्या खुर्च्या, भरलेले व्यासपीठ; सत्ताधाऱ्यांची उघडी पडली खेळी





### बॅनरबाजी, स्टेजबाजी आणि 'मीच केलं'च्या घोषणांत कार्यक्रमाचा फज्जा; शेवटी रेल्वे अधिकाऱ्यांनीच आवरली लगाम

**वर्धा/जनमाध्यम**
जनतेच्या सोयीसाठी मिळालेल्या दुरंतो एक्सप्रेसच्या थांब्याचा आनंद साजरा करण्याऐवजी, सत्ताधाऱ्यांनी श्रेयाच्या हव्यासात कार्यक्रमाचा अक्षरशः तमाशा करून टाकल्याचे चित्र बुधवारी रात्री वर्धा रेल्वे स्थानकावर पाहायला मिळाले. काम एकाचे, ढोल बडवणारे दुसरेच अशी म्हण अक्षरशः खरी ठरली.

खा. प्रतिभा धानोरकर यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दुरंतोला वर्धा येथे थांबा मंजूर केला. वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूरच्या प्रवाशांची मोठी गैरसोय दूर करणारा हा निर्णय असताना, सत्ताधारी नेत्यांनी या यशावर स्वतःचा शिक्का मारण्याचा केविलवाणा प्रयत्न केला.

कार्यक्रमाच्या नावाखाली रेल्वे स्थानक परिसरात परवानगीशिवाय स्टेज उभारण्यात आले. मोठमोठे बॅनर, स्वतःचे फोटो आणि शेकडो खुर्च्यांची मांडणी पण समोर बसायला लोकच नाहीत नेते जास्त, श्रोते कमी अशी अवस्था झाल्याने रिकाम्या खुर्च्यांनीच सत्ताधाऱ्यांची खिल्ली उडवली.

शेवटी हीच लाजिरवाणी परिस्थिती पाहून अनेक नेत्यांनी व्यासपीठावरून काढता पाय घेतला.

यात भर म्हणजे, कार्यक्रमाशी थेट संबंध नसतानाही माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची हजेरी. 'मान ना मान, मी तुझा मेहमान' या शैलीत ते व्यासपीठावर विराजमान झाले. मात्र, भाषण सुरू होताच रेल्वे अधिकाऱ्यांनी वेळेचे भान ठेवण्याचा इशारा देत भाषण आवरते घेण्यास सांगितल्याने सत्ताधाऱ्यांचा 'जोश' क्षणात ओसरला.दरम्यान, रेल्वे विभागाच्या अधिकृत कार्यक्रमात खासदार अमर काळे यांनी संयमित भूमिका घेतली. कोणतेही श्रेय न घेता त्यांनी रेल्वेमंत्र्यांचे आभार मानले आणि दुरंतो एक्सप्रेसला हिरवी झेंडी दाखवत गाडीला पुढील प्रवासासाठी रवाना केले. एकीकडे दिखाव्याचा गोंधळ, तर दुसरीकडे साधेपणाचा संदेश हा विरोधाभास ठळकपणे दिसून आला.

एकूणच, जनतेच्या सोयीचा विषय बाजूला पडून श्रेय कोणाचे याच स्पर्धेत सत्ताधाऱ्यांनी स्वतःचीच फजिती करून घेतली. दुरंतो एक्सप्रेसचा थांबा हा प्रवाशांसाठी दिलासा ठरला असला, तरी त्याच्या स्वागताचा कार्यक्रम मात्र राजकीय दिखाव्याच्या नादात हास्यास्पद ठरला हेच या संपूर्ण प्रकारातून अधोरेखित झाले.

# अपुऱ्या ३५३ (आय) रस्त्याचा प्रश्न तापला

## नगराध्यक्षांनी थेट नितीन गडकरी यांच्याकडे धाव



### सहा वर्षांपासून रखडलेल्या कामामुळे सिंदीकर त्रस्त; ३२० कोटींची घोषणा

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**
सहा वर्षांपासून रखडलेल्या सेलडोह–सिंदी–सेवाग्राम–पवनार या ३५३ (आय) महामार्गाच्या अपूर्ण कामामुळे सिंदी शहरातील नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. दररोज वाहतूक कोंडी, धुरळा आणि जीवघेणे प्रसंग यांचा सामना करताना नागरिकांचा संताप टोकाला पोहोचला आहे. अखेर या ज्वलंत प्रश्नावर नवनिर्वाचित नगराध्यक्षा राणी स्नेहल कलोडे यांनी थेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे साकडे घालत निर्णायक पाऊल उचलले.

आजनसरा येथे झालेल्या कार्यक्रमात नगराध्यक्षा कलोडे यांनी निवेदन सादर करत या महामार्गाच्या कामाचा पाठपुरावा केला. या वेळी आमदार समीर कुणावार यांच्या पुढाकारातून त्यांची भेट घडवून आणण्यात आली.या मागणीची गांभीर्याने दखल घेत केंद्रीय मंत्री गडकरी यांनी मंचावरूनच मोठी घोषणा केली. नव्या डीपीआरनुसार या रस्त्यासाठी तब्बल ३२० कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली असून येत्या तीन ते चार महिन्यांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या घोषणेनंतर उपस्थितांमध्ये आनंदाची लाट उसळली. शहरातून जाणारा हा मार्ग अरुंद असल्याने बसस्थानक ते पळसगाव दरम्यान दिवसातून अनेक वेळा वाहतूक कोंडी होते. समृद्धी महामार्गावरील सेलडोह इंटरचेंजमुळे वाहतुकीचा ताण प्रचंड वाढला असून मोठ्या वाहनांच्या रांगा लागणे हा नित्यक्रम झाला आहे. यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

नगरपालिकेच्या निवडणुकीत स्पष्ट बहुमत देत नागरिकांनी भाजपकडे अपेक्षांची मोठी जबाबदारी सोपवली आहे. त्यानुसार नगराध्यक्षा कलोडे यांनी पदभार स्वीकारताच या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली. आमदार कुणावार यांच्या सहकार्याने हा मुद्दा थेट केंद्रापर्यंत पोहोचवण्यात यश आले.दरम्यान, गडकरी यांच्या घोषणेने दिलासा मिळाला असला तरी 'घोषणा नुसती कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरणे गरजेचे' अशी स्पष्ट भावना सिंदीकरांनी व्यक्त केली आहे. आता प्रत्यक्ष कामाला गती मिळते का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रपतींच्या दौऱ्यातील काही क्षण



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू बापुकुटी येथे प्रार्थनेस उपस्थित राहिल्याचा क्षण



सेवाग्रामातील बापुकुटी येथे राष्ट्रपती मुर्मू यांचे बेल वृक्ष रोपण



बापुकुटी भेटीदरम्यान राष्ट्रपती मुर्मू यांनी साधेपणाचा घेतलेला अनुभव.



प्रार्थना स्थळी राष्ट्रपती मुर्मू यांची उपस्थिती; परिसरात शांततेचा संदेश



सेवाग्राम आश्रमात राष्ट्रपती मुर्मू यांचे पर्यावरणपूरक रोपण उपक्रम



बापुकुटी येथे राष्ट्रपतींची ऐतिहासिक भेट; प्रार्थना व वृक्षारोपण कार्यक्रम

# चन्नावार्स ई विद्या मंदिरचा १००% निकाल

## १३ विद्यार्थ्यांचा ९०% पेक्षा अधिक गुणांनी यश

**वर्धा/जनमाध्यम**
चन्नावार्स ई विद्या मंदिरने यंदाच्या शैक्षणिक निकालात शतप्रतिशत यश संपादन करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शाळेच्या १३ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखली.

या निकालात तनुश्री नाखले हिने ९८.२ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. मराठी विषयात तिने शंभर पैकी शंभर गुण मिळवले. श्रावणी देशमुख (९६.६%), पार्थ वानखेडे (९६.२%) यांनीही उत्कृष्ट कामगिरी केली. सगुण वंजारी (९६%) याने आर्टिफिशियल इंटेलिजन्समध्ये १०० गुण मिळवले, तर निश्का गोयंका (९४%) हिने इंग्रजी विषयात शंभर गुणांची नोंद केली.इतर गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये प्रद्युम्न शिंदे (९३.४%), विनीत भोयर (९२.८%), आहाना झाडे (९२.४%), नीती जैन (९२.२%), सहाणी गुजरकर (९१.४%), अन्वर (९१.४%), दिव्या काळे (९१.२%) आणि कलश मिश्रा (९०.४%) यांचा समावेश आहे.विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले. संस्थेचे अध्यक्ष दिनेश चन्नावार, संचालिका शुभांगी चन्नावार, प्राचार्या अपूर्वा पांडे व उपप्राचार्या पूजा कपूर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## सेवाग्राम येथे चरख्यावर फिरले राष्ट्रपतींचे हात, जागा झाला बापूंचा विचार

**वर्धा/जनमाध्यम**
सेवाग्राम आश्रमातील शांत, प्रसन्न वातावरणात गुरुवारी एक वेगळाच भावस्पर्शी क्षण अनुभवायला मिळाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बापुकुटीच्या पवित्र भूमीत पाऊल ठेवताच जणू काळच मागे फिरला आणि बापूंच्या साधेपणाच्या जीवनशैलीचा प्रत्यय पुन्हा एकदा साऱ्यांना आला.

आदी निवास, बा कुटी, बापुकुटी आणि बापूंचे कार्यालय यांची पाहणी करत त्यांनी आश्रमाच्या प्रत्येक कोपऱ्यात दडलेला इतिहास जाणून घेतला. प्रार्थना सभेत सहभागी होत त्यांनी मन:शांतीचा अनुभव घेतला, तर वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.यावेळी सर्वाधिक भावनिक क्षण ठरला



तो चरख्यावर सूत कताई करतानाचा. राष्ट्रपतींच्या हातून फिरणाऱ्या चरख्याच्या घरघरात जणू स्वावलंबन, साधेपणा आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश पुन्हा जिवंत झाला.राज्यपाल जिष्णू देव वर्मा, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर जिल्हाधिकारी वामन्थी सी, पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सेवाग्रामात या भेटीने एक अनोखा प्रेरणादायी ठसा उमटवला.

## राष्ट्रभाषा पुस्तकालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात



**वर्धा-**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रभाषा पुस्तकालय, वर्धा येथे अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमात त्यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. समितीचे प्रधानमंत्री डॉ. हेमचंद्र वैद्य यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेत समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाची मूल्ये दृढपणे रुजविली. त्यांनी जातीव्यवस्थेचा तीव्र विरोध करत सर्वांना समान संधी मिळावी यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या कार्यातून प्रतिकूल परिस्थितीतही कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर यश मिळवता येते, हे त्यांनी दाखवून दिले. त्यामुळे बाबासाहेबांचे विचार भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरतात, असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाची सुरुवात बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. उपस्थित मान्यवरांनीही त्यांना आदरांजली वाहिली.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून छात्रपाल धाबर्डे, बाबुराव कोसमकर, अरुणा देशमुख, विलास गोटे, निवृत्ती बाभले, राजू ठाकरे, प्रदीप गुल्हाने, जयश्री कन्नाके, निर्मला कोसमकर, श्वेता तिवारी, आरती सोनारकर, अर्चना गुल्हाने आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन ग्रंथपाल योगेश शेंडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहायक ग्रंथपाल सचिन माकोडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्चना देशमुख व ऋषिकेश उरकुडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विरूळमध्ये भीमजयंतीचा उत्साह, पाच दिवस विविध कार्यक्रम

**विरूळ (आ.)/जनमाध्यम**
भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आनंद बौद्ध विहार, विरूळ (आ.) येथे ११ ते १५ एप्रिलदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या पाच दिवसांच्या उत्सवात धम्मप्रबोधन, सांस्कृतिक कार्यक्रम, रॅली आणि महाप्रसादामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमाची सुरुवात धम्मप्रबोधनाने झाली. प्रबोधनकार कृणालजी दंडाळे यांनी बौद्ध धम्माचे महत्त्व सांगत समाजाला दिशा दिली. प्रमुख पाहुणे म्हणून पुरुषोत्तमजी चालकुरे आणि प्रा. सतीश मनवर उपस्थित होते. १३ एप्रिल रोजी सम्राट अशोक ग्रुप कला मंच, विरूळ यांच्या वतीने बुद्ध-भीम गीतांचा प्रभावी कार्यक्रम सादर करण्यात आला.१४ एप्रिल रोजी सकाळी परित्राण पाठ, ध्वजारोहण व ग्रामपंचायत कार्यालयात डॉ. आंबेडकरांच्या



प्रतिमेचे पूजन झाले. यानंतर लहान मुलांचे भाषण व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. सायंकाळी भव्य रॅली काढण्यात आली. १५ एप्रिल रोजी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. भारतीय बौद्ध महासभा, विरूळ (आ.) यांच्या वतीने हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

### भवानी वार्डात संयुक्त जयंती साजरी

भवानी वार्ड - भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फूले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त अखिल भारतीय बौद्ध महाशाखा क्र. २ येथे कार्यक्रम उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी कैलासभाऊ उपासे होते, तर रत्नमाला मुन व अशोक काळे प्रमुख पाहुणे होते.

मान्यवरांनी दोन्ही महान व्यक्तींच्या विचारांचा जागर मांडत सामाजिक समतेचा संदेश दिला. कार्यक्रमाला सोमाजी भगत, सुभाष भोंगाडे, विलास उपासे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

## मलखांब प्रात्यक्षिकात तरुणी जखमा खा. अमर काळे यांची रुग्णालयात भेट



**वर्धा-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या उत्साहात रंगलेल्या शहरात एक दुर्दैवी घटना घडून आनंदावर विरजण पडले. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात सुरू असलेल्या मलखांब प्रात्यक्षिकादरम्यान १९ वर्षीय भूमिका मनोहर भगत ही तरुणी अचानक उंचावरून कोसळली आणि गंभीर जखमी झाली. सध्या तिच्यावर सावंगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.दरम्यान, १४ एप्रिलच्या रात्री सावंगी परिसरात जयंती कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या खासदार अमर काळे यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ रुग्णालय गाठले. त्यांनी भूमिकाची भेट घेत तिच्या प्रकृतीची नातेवाईकांना विचारपूस केली आणि उपस्थित डॉक्टरांशी सविस्तर चर्चा केली. उपचारासाठी लागणारी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन देत त्यांनी कुटुंबीयांना धीर दिला.या भेटीदरम्यान भूमिकाचे आई व नातेवाईक उपस्थित होते. खासदारांच्या भेटीमुळे कुटुंबीयांना मोठा मानसिक आधार मिळाला.

# माहिती अधिकार मागणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाला त्रास

## बुरकोणी ग्रामपंचायतीविरोधात 'बीडीओ' कडे प्रथम अपील

**हिंगणघाट/जनमाध्यम**
माहिती अधिकारांतर्गत ग्रामपंचायतीच्या कामकाजाची माहिती मागवणाऱ्या ७९ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला त्रास दिल्याचा प्रकार बुरकोणी येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी शंकर धोंडबाजी आष्टनकर यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे (BDO) प्रथम अपील दाखल केले आहे. आष्टनकर यांनी ग्रामपंचायतीच्या मागील पाच वर्षांच्या ऑडिट अहवाल, कॅश बुक व बँक स्टेटमेंटची माहिती मागितली होती. त्यासाठी त्यांनी २,०४४ रुपये शुल्क भरले. मात्र, मिळालेली माहिती अपूर्ण व अप्रमाणित असल्याची तक्रार त्यांनी केली आहे.दरम्यान,१४ एप्रिल रोजी ग्रामपंचायतीचे काही कर्मचारी त्यांच्या घरात परवानगीशिवाय गेल्याचा आरोप आहे. यावेळी संबंधितांनी कागदपत्रे दाखवण्याच्या नावाखाली छायाचित्रे काढली व दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचे आष्टनकर यांनी अपीलात नमूद केले आहे.तसेच, गावातील एका रस्त्याच्या कामात अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. हा रस्ता माजी सरपंचांच्या खासगी जागेकडे वळवण्यात आल्याचा आरोप आहे.या प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, संपूर्ण चौकशी करावी तसेच मागवलेली माहिती नियमांनुसार उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आष्टनकर यांनी केली आहे.या तक्रारीवर गटविकास अधिकारी कोणती भूमिका घेतात, याकडे लक्ष लागले आहे.



जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १४०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७०२/२०२६
**श्रीमती हिरा अधिक पांच -वि- निरंक**
पुढील ता.१०.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sau.Hira W/o Nandkishor Kankani, Age 74 Yrs. Occu.: Household work R/o House No.2-A, Mamta Vihar, Badnera Road, Near Center Point School, Chandra Nagar, Old Pardi Naka, Bhandewadi, Nagpur-440008 Aadhar No.414979722314
2. Bankatlal S/o Satyanarayan Laddha, Age 71 Yrs. Occu.: Business Aadhar No.896824239608
3. Shyamlal S/o Satyanarayan Laddha, Age 69 Yrs. Occu.: Business Aadhar No.435109679627
4. Sau.Chanda W/o Sushil Tapdiya, Age 68 Yrs. Occu.:Household work R/o 66, Vaishali Nagar, Bhopal, Tq.Hujur, Dist.Bhopal (M.P.) Aadhar No.825284323242
5. Jagdish S/o Satyanarayan Laddha, Age 66 Yrs. Occu.: Business Appli.No.2,3 & 5 R/o Shri Sadan, Walgaon, Tq.Dist.Amravati. Aadhar No.207783477475
6. Nandkishor S/o Satyanarayan Laddha, Age 64 Yrs. Occu.: Business R/o 80/2 6-Uday Residency, Baner Road, Near Sakal Nagar, Pune Aadhar No.488924850532

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Smt.Tara Wd/o Satyanarayan Laddha हे अनुकमे दिनांक 21.05.2019 रोजी **वलगांव, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **हिरा अधिक पाच विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **हिरा अधिक पाच विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६६२/२०२६
**श्रीमती कोकिला अधिक चार -वि- वैभव**
पुढील ता.०८.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kokila Rambhau Chapale, Age 63 Yrs. Occu.: Household R/o Shaskiya Abhiyantrik Mahavidyalaya Cotton Green Colony No.1, Kathora Naka V.M.V.Road, Amravati, Tq.Dist.Amravati
2. Sunita Satish Punse, Age 58 Yrs. Occu.: Household R/o Satish Prafullakumar Punse, Arya Residency Shashtri Nagar, Akola
3. Anita Prakashrao Shekar, Age 50 Yrs. Occu.: Household R/o At Post Karanja, Khardipura, Ward No.4, Karanja, Dist.Wardha
4. Rekha Satish Gawande, Age 55 Yrs. Occu.: Household R/o At Post Flat No.100, Raj Residency Kathora Road, Urwasi Nagar, V.M.V.Amravati, Tq. Dist. Amravati-444604
5. Lata Sanjay Chude, Age 52 Yrs. Occu.: Household R/o At Post Rameshwar Chunarkar, House Jawahar Nagar, V.M.V. Amravati. Tq. Dist. Amravati-444604

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Vaibhav Vilasrao Pawade, Age 30 Yrs. Occu.: Agriculturist R/o At Post Near Z.P.School, Khanapur, Nandura Bk. Tq.& Dist.Amt.

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सूर्यभान मोतीराम पावडे** हे अनुकमे दिनांक 19.10.2025 रोजी **खानापूर, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **चंद्रकला सूर्यभानजी पावडे** ही दिनांक **१०.०७.२००८** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **कोकीळा अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कोकीळा अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीरनामा

**अर्जदार -** १. जाईबाई ओंकारराव नव्हाळे
रा.वणी (बेलखेडा) ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत वणी (बेलखेडा) ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **जाईबाई ओंकारराव नव्हाळे,** रा.वणी (बेलखेडा) ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी स्वतःचे मृत्यू दि.१२.०३.२०२२ चा राहत्या घरी झाला परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत वणी (बेलखेडा), ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे नोंद करण्यात आली नाही. जन्माची नोंद मृत्यू कार्यालय ग्रामपंचायत वणी (बेलखेडा) पंचायत समिती, चांदूर बाजार, जि.अमरावती हद्दीमध्ये झालेला असल्यामुळे मृत्यू नोंदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत वणी (बेलखेडा) यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला आक्षेप अथवा हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अथवा हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १५.०४.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

शिक्का

तहसीलदार,
तथा तालुका दंडाधिकारी,
चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६०९/२०२६
**कविता अधिक दोन -वि- शिल्ला अधिक दोन**
पुढील ता.२२.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kavita Shashikant Mahalle, Age 48 Yrs. Occu.: Nil
2. Atharv Shashikant Mahalle, Age 20 Yrs. Occu.: Both R/o Nandgaon Peth, Amrvati, Tq. Dist. Amravati
3. Kusum Vinayakrao Mahalle Age 78 Yrs. Occu.: R/o Gavarakshan Colony, Morshi, Tq. Morshi, Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Shashikant Vinayakrao Mahalle हे दिनांक 26.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Kavita Shashikant Mahalle + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kavita Shashikant Mahalle + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०८.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

# मालू इंटरनॅशनल स्कुल चे घवघवीत यश

## १००% निकालाची परंपरा कायम

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक शेगाव- रहाटगाव रोड स्थित मालू इंटरनॅशनल स्कूल (सी.बी.एस.ई.) च्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच लागलेल्या सी.बी.एस.ई. बोर्डाच्या दहावीच्या निकालमध्ये नेत्रदीपक यश संपादन करून उत्तुंग यशाची परंपरा कायम राखली. निश्चितच हि बाब आपणा सर्वांसाठी अभिमानास्पद व गौरवास्पद आहे. या मध्ये आभा मिलिंद राऊत हि विद्यार्थिनी शाळेमधून प्रथम आली असून तिने (९६%) गुण संपादन केले आहे. तसेच समृद्धी दिनेश पवार (९२%), मनस्वी रवींद्र कडू (९२%), रीधिमा राम ठोंबरे (९१%), अथर्व गजानन डोले (९०%), अन्वेषा विलासराव कावळे (८४%), श्रेयश्री प्रशांत बागल (८३%), प्राशब्दी प्रशांत वासनिक (८०%) या सर्व विद्यार्थ्यासह जवळजवळ सर्वच विद्यार्थ्यांना डिस्टिंगशन मिळाले असून शाळेचा निकाल १००% लागला आहे.



या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. आशिष मालू, शाळेचे प्राचार्य लोकेशजी मते तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी कौतुक करून उज्वल भविष्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष डॉ. आशिष मालू, शाळेचे प्राचार्य लोकेश मते तसेच सर्व शिक्षक वृंद यांना दिले.

---

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, **श्रीमती संजीवनी दत्तात्रय जोशी, संदीप दत्तात्रय जोशी, राहुल दत्तात्रय जोशी,** सर्व रा.शिरजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी असून यांचे मालकी व ताब्यातील मौजे कारंजा बहिरम गट नं.८२, १ हे.११ आर, पोटखराब ० हे.०३ आर, आकार रु.६ रु.पैसे भो.वर्ग-१ असून सदर शेताचा विक्री सौदा **श्री.विजय दामोधर पाठक,** रा.शिरजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांचेशी केला आहे.

सदर शेताचे खरेदी-विक्री बाबत आपणास काही हरकत घ्यायची असेल किंवा पुरावा द्यायचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत तलाठी कार्यालय, कारंजा बहिरम येथे स्वतः हजर राहून द्यावी.

त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कोणालाही काही हरकत घ्यावयाची नाही असे समजण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

ही जाहीर नोटीस दि.१७.०४.२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

(ॲड.श्री.यू.एन.जावरकर)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

---

## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.

**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/ ८००७३४२३३५

---

**WALK-IN-INTERVIEW**
(Session-2026-27)
At Shri Shivaji Education Society, Amravati (Reg.No.F-89)
**SHIVAJI IDEAL ENGLISH SCHOOL, AMRAVATI**
(Self Finance) (Udise Code :27071505419)
Shivaji Nagar, In front of Matoshri Vimalabai Deshmukh Hall, Amravati.

**WANTED**

| Sr. No. | Name of Post | No.of Post | Required Qualification |
|---|---|---|---|
| 01 | Head Mistress | 01 | M.A./M.Sc., B.Ed. DSM candidates will be preferred. |
| 02. | Supervisor | 01 | M.A./M.Sc., B.Ed. SM candidates will be p referred. |
| 03. | Foundational Section Nursery | 01 | Any graduate (Montessori) trained and experience candidate will be preferred |
| | KG-I to STD-II | 11 | HSC, D.Ed. or its equivalent having acquired at least 50% Marks to teach Eng., Maths, Sci. & Others |
| 04. | Preparatory Section STD-III to STD-V | 13 | B.A.B.Ed/D.Ed (Eng. Litt, Marathi, Hindi, SST) B.Sc., B.Ed./D.Ed. (Maths, Sci. Bio.) |
| 05. | Middle Section STD-VI to VIII | 13 | B.A., M.A., B.Ed. (Eng.Litt., Mar., Hindi, Sanskrit, Hist.Geo.) B.Sc., M.Sc., B.Ed. (Maths, Physics, Chemistry, Biology) |
| 06. | Drawing Teacher | 01 | ATD Graduate |
| 07. | Physical Teacher | 02 | B.P.Ed. (Any Graduate) |
| 08. | Computer Teacher/Operator | 02 | B.C.A./B.E.(Compu) |
| 09. | Clerk | 02 | H.S.C.& Tally, Ms-CIT, Typing-30 wpm Mar, Eng. 40 WPM |
| 10. | Laboratory Asst. | 01 | H.S.C, B.Sc. |
| 11. | Librarian | 01 | B.Lib., M.Lib. |
| 12. | Peon/Helper | 03 | HSC, SSC |
| 13. | Helpers (Ladies Only) | 04 | SSC |
| 14. | Guard | 01 | SSC |

**Note -**
1) Preference will be given to the experienced candidates.
2) Should have acquired at least 50% Marks to teach Eng., Maths, Sci. and other subjects.
3) Fluency in English is must.
4) Candidate should have completed or appeared for Ms-CIT.
5) Eligible and interested candidates may walk in interview on 25th April 2026 at 10.00 am to 04.00 pm.
6) Application forms will be available in the school from 18.04.2026 to 25.04.2026 at 08.00 am. to 01.00 pm.
7) Apply to the Secretary, Shri Shivaji Education Society, Amravati.
8) Preference will be given to the candidates who have attempted TET/CTET/TAIT.
9) For details contact : 9975081828 / 9421738452

**President,**
**School Management Committee,**
**Shivaji Ideal Eng.School, Amravati.**

**Secretary,**
**Shri Shivaji Education Society, Amravati**
**Venue- Shivaji Ideal Eng.School, Amravati**
**Infront of Matoshri Vimlatai Deshmukh Hall,**
**Shivaji Nagar, Amravati**
**Time 10.00 am. to 04.00 pm.**

---

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती**
(e-mail - amravati.22@mahapwd.com)
**निविदा सुचना** क्र.२, सन २०२६-२०२७ (जा.क्र.३६३३/निलि/दि.१३.०४.२०२६)
निविदा सूचना (ई-निविदा प्रणालीद्वारे)

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचे मार्फत महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब-१ (परसेंटेज रेट) नमुन्यातील निविदा ई-प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १. | प्र.क्र.२ पी.डी.एम.सी.तपोवन अंतर्गत ओपन स्पेसला चेनलींक फेंसिंग/पेव्हींग ब्लॉक/ सौदर्यीकरण करणे | २४.३४ |
| २. | प्र.क्र.५ महेंद्र कॉलनी अंतर्गत ओपन स्पेसला चेनलींक फेंसिंग/पेव्हींग ब्लॉक/सौदर्यीकरण करणे | २४.३४ |
| ३. | प्र.क्र.१६ अलीम नगर रेहमत नगर अंतर्गत नालीचे बांधकाम करणे | २४.३१ |
| ४. | प्र.क्र.१ शेगांव रहाटगांव अंतर्गत ओपन स्पेसला चेनलींक फेंसिंग/पेव्हींग ब्लॉक/सौदर्यीकरण करणे | २४.३१ |
| ५. | प्र.क्र.२ पी.डी.एम.सी.तपोवन अंतर्गत नालीचे बांधकाम करणे | २४.३१ |
| ६. | प्र.क्र.३ नवसारी अंतर्गत नालीचे बांधकाम करणे | २४.३१ |
| ७. | प्र.क्र.५ महेंद्र कॉलनी अंतर्गत नालीचे बांधकाम करणे | २४.३१ |
| ८. | प्र.क्र.१६ अलीम नगर अंतर्गत नालीचे बांधकाम करणे | २४.३१ |
| ९. | प्र.क्र.५ महेंद्र कॉलनी अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे | २४.३१ |
| १०. | प्र.क्र.८ जोग स्टेडीयम अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे | १६.४० |
| ११. | प्र.क्र.६ विलास नगर मोरबाग अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे | १६.४० |
| १२. | प्र.क्र.७ जवाहर स्टेडीयम अंतर्गत नालीचे बांधकाम करणे | १६.४० |
| १३. | प्र.क्र.९ एस.आर.पी.एफ.वडाळी येथे खेळाचे मैदान विकसित करणे | १६.४० |
| १४. | प्र.क्र.१२ रुक्मिणी नगर अंतर्गत रस्त्याच्या कडेला लादीकरण करणे | १६.४० |
| १५. | प्र.क्र.१३ अंबापेठ अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे | २४.६० |
| १६. | प्र.क्र.८ जोग स्टेडीयम अंतर्गत नालीचे बांधकाम करणे | १६.४० |
| १७. | प्र.क्र.८ जोग स्टेडीयम अंतर्गत रस्त्याच्या कडेला लादीकरण करणे | १६.४० |
| १८. | प्र.क्र.४ जमिल कॉलनी अंतर्गत रस्त्याचे व नालीचे बांधकाम करणे | २४.६० |
| १९. | प्र.क्र.६ विलास नगर मोरबाग अंतर्गत नालीचे बांधकाम करणे | १६.४० |
| २०. | प्र.क्र.७ जवाहर स्टेडीयम अंतर्गत रस्त्याचे कडेला लादीकरण करणे | १६.४० |
| २१. | प्र.क्र.७ जवाहर स्टेडीयम अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे | २४.६० |
| २२. | प्र.क्र.९ एस.आर.पी.एफ.वडाळी येथे नालीचे बांधकाम करणे | २४.६० |
| २३. | प्र.क्र.९ एस.आर.पी.एफ.वडाळी येथे रस्त्याचे बांधकाम करणे | २४.६० |
| २४. | प्र.क्र.१२ रुक्मिणी नगर येथे नालीचे बांधकाम करणे | २०.५० |
| २५. | प्र.क्र.१४ अंबादेवी बुधवारा येथे नालीचे बांधकाम/लादीकरण करणे | १६.४० |
| २६. | प्र.क्र.१५ छाया नगर येथे रस्त्याचे व नालीचे बांधकाम करणे | २४.६० |
| २७. | प्र.क्र.१४ अंबादेवी बुधवारा येथे रस्त्याचे बांधकाम करणे | १६.४० |
| २८. | प्र.क्र.१ अर्जुन नगर येथे नालीचे बांधकाम करणे | १२.३० |
| २९. | अमरावती मनपा क्षेत्रातील लालखडी, इमाम नगर येथील रोड व नालीचे बांधकाम करणे | १६.०३ |
| ३०. | प्र.क्र.१५ छाया न गर पाठीपुरा अंतर्गत नालीचे बांधकाम करणे | २३.९६ |
| ३१. | प्र.क्र.१ रहाटगांव अंतर्गत रस्ता व नालीचे बांधकाम करणे | १६.४० |
| ३२. | प्र.क्र.३ छत्रसाल नगर अंतर्गत रस्ता व नालीचे बांधकाम करणे | १६.४० |
| ३३. | प्र.क्र.१ विश्वप्रभा कॉलनी येथील मुख्य रस्त्यावरील नालीचे बांधकाम करणे | १६.४० |
| ३४. | प्र.क्र.२ नागार्जून कॉलनी येथील मनपाच्या ओपन स्पेसमये चेनलींक फेंसिंग करणे | २०.५० |
| ३५. | प्र.क्र.५ संतोषी नगर येथील नालीचे बांधकाम करणे | १६.४० |
| ३६. | प्र.क्र.६ रमाबाई आंबेडकर नगर येथील संविधान चौक जवळील नालीचे बांधकाम करणे | २८.७० |
| ३७. | भानखेडा ता,अमरावती येथील महानुभाव आश्रम परिसराजवळील ग्रा.पं.अंतर्गत रस्त्याचे कॉंकीटीकरण करणे | १६.४९ |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी - निविदा वेळापत्रकाप्रमाणे**
**ई-निविदा उघडणे दिनांक - निविदा वेळापत्रकाप्रमाणे**

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com, 2. http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वृत्तपत्रीय शुध्दीपत्रक न देता वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अमरावती कार्यालयातील सुचना फलक

**Note :**
१. Please note the further changes regarding this work will not be published through corrigendum by press notice. The changes will be available on electronic tendering system of Government of Maharashtra which is available on th e Portal http://mahatenders.gov.in
2. The Bidder shall submit the Hard Copy within 72 Hrs.
३. कंत्राटदारांनी ई-निविदा ऑनलाईनद्वारे भरतांना E.M.D. ही ज्या नावाने जसे (वैयक्तिक संस्था/भागीदारी संस्था/कंपनी) निविदा भरली आहे त्याच्याच बॅंक खात्यातून सादर करणे आवश्यक आहे.
४. प्रमाणित करण्यात येते की, या कार्यालयाकडून सादर करण्यात आलेली निविदा सुचना प्रकाशित करण्याकरीता होणाऱ्या खर्चाची तरतूद शासन संदेश प्रसार नियमावली २०१८ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज-२०१८/प्र.क्र.३४८/३४/दि.२०.१२.२०१८ अन्वये करण्यात आलेली आहे.

**(प्रतिक गिरी)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती**

---

## पाहिजेत

अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्था
अभिनव शिक्षण संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती द्वारा संचालित
अभिनव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, जनुना, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | वेतन-श्रेणी | अनुदान प्रकार | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | उच्च माध्य. शिक्षक | ०१ | एम.ए.इंग्रजी/ भूगोल, बी.एड. | शासकीय नियमा-प्रमाणे | अंशतः अनुदानित ६० टक्के | सकाळी १० ते १२.०० |
| ०२ | कनिष्ठ लिपिक | ०१ | एच.एस.सी. पदवीधर/ टंकलेखक ३०/४० संगणकीय ज्ञान एमएस-सीआयटी इंग्रजी/मराठी टंकलेखन ३०/४० | शासकीय नियमा-प्रमाणे | अनुदानित १०० टक्के | दुपारी १.०० ते ३.०० |

वरील पदाकरीता पात्रताधारक ईच्छुक उमेदवारांनी दिनांक २६.०४.२०२६ रविवार रोजी उपरोक्त वेळेनुसार शैक्षणिक प्रमाणपत्रासह मुलाखतीसाठी स्वखर्चाने अभिनव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, जनुना, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे उपस्थित रहावे. अनुभव असणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल.

**अध्यक्ष / सचिव**
अभिनव शिक्षण संस्था,
अमरावती

**मुख्याध्यापक/प्राचार्या**
अभिनव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,
जनुना ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

---

## जाहीर खुलासा

सर्वत्र आम जनतेस सुचित करण्यात येत आहे की, माझे नांव **रामेश्वर अरुणराव गाडखे,** असे आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, इलेक्ट्रिक बील, पॅन कार्ड व बॅंकेचे पासबुक व इतर दस्ताऐवजावर सुध्दा असेच नाव आहे. परंतु शैक्षणिक बोर्ड सर्टीफिकेट मध्ये माझे नांव गाडखे रामेश्वर अरुणराव असे आहे. महाराष्ट्र शैक्षणिक मंडळामध्ये पहिले आडनांव व नंतर नांव व नंतर वडीलांचे नांव असे लिहिण्यात येते, ही महाराष्ट्र शैक्षणिक मंडळाची पध्दती आहे. तरी दोन्ही नांवे ही माझीच आहेत आणि प्रचलित नांव हे माझे **रामेश्वर अरुणराव गाडखे** हेच आहे. मला **रामेश्वर अरुणराव गाडखे** या नावाने संबोधण्यात यावे.

दिनांक १६.०४.२०२६
अमरावती

**रामेश्वर अरुणराव गाडखे,**
**पत्ता - फॉरेस्ट कॉलनी जवळ,**
**साई नगर, पी.ओ.साई नगर, अमरावती**
**मो.नं.८६९८२५६७८३**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३४५/२०२६
**राजकन्या व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२८.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Rajkanya Shaligram Dongare, Age 55 Yrs. Occu.: Household R/o Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.
2. Sau.Rupali Yogeshrao Ingale Age 34 Yrs. Occu.: Household R/o Madala, Tq. Arvi, Dist. Wardha
3. Sau.Harshali Chetan Raut, Age 33 Yrs. Occu.: Household R/o Falegaon, Tq. Babhulgaon, Dist.Yavatmal
4. Priyanka Akshay Bobade, Age 31 Yrs. Occu.: Household R/o Brahmanwada Thadi, Tq.Chandur Bazar, Dist. Amravati.
5. Shri Chandrashekhar Shaligram Dongare, Age 29 Yrs. Occu.: Labour R/o Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शालिग्राम महादेवराव डोंगरे** हे अनुकमे दिनांक 23.10.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **राजकन्या व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **राजकन्या व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७७२/२०२६
**श्रीमती शेषराव अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०८.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sheshrao Champatrao Jambhulkar, Age 61 Yrs. Occu.: Labour R/o Datta Nagar, MIDC Shivar, Akola, Tq.Dist.Akola
2. Suraj Sheshrao Jambhulkar, Age 33 Yrs. Occu.: Service R/o Dhone Colony, Shivar, Po.MIDC Shivar, Akola, Tq.Dist.Akola
3. Akash Sheshrao Jambhulkar, Age 31 Yrs. Occu.: Service R/o C/o Maya Ganeshrao Vanjari, Rahul Nagar, Bicchu Tekdi,Amravati.
4. Karishma Pravin Sahare, Age 29 Yrs. Occu.: HOusehold R/o Pimpal Vihir, Po.Pimpal Vihir, Tq.Dist.Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **लिना शेषराव जांभुळकर** हे दिनांक 06.03.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शेषराव** + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शेषराव** + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६५४/२०२६
**पार्वताबाई अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sau.Parvatibai W/o Ramesh Sahu, Age 73 Yrs. Occu.: Household work
2. Smt.Savita Wd/o Satish Sahu, Age 48 Yrs. Occu.: Household work
3. Ku.Simran D/o Satish Sahu, Age 26 Yrs. Occu.: Education All R/o Chetandas Bagicha, Ratanganj, Near Choti Mata Mandir, Amt.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Satish Ramesh Sahu हे दिनांक 23.06.2009 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Sau.Parvatibai W/o Ramesh Sahu + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sau.Parvatibai W/o Ramesh Sahu + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३४०/२०२६
**शुभांगी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२८.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shubhangi Sudhir Zagade, Age 34 Yrs. Occu.: Household R/o Nijampur Bopapur, Amravati,. Tq.Achalpur, Dist.Amravati
2. Rahul Rameshrao Choudhari, Age 32 Yrs. Occu.: Agriculturist R/o Ward No.4, Tayde Pura, Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.
3. Vrushali Kishorrao Thombare, Age 30 Yrs. Occu.: Household R/o W/o Kisanrao Thombare, Ward No.6, Brahmanwada Thadi, Tq.Chandur Bazar, Dist. Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रमेश नथ्थुजी चौधरी आणि शोभा रमेश चौधरी** हे अनुकमे दिनांक 01.05.2025 व 22.11.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शुभांगी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शुभांगी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २१९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### सरस्वती सार्वजनिक वाचनालयामध्ये डॉ.आंबेडकरांना अभिवादन



**राजना**-येथील सरस्वती सार्वजनिक वाचनालय मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. यावेळी उपस्थित अंजु गवई तिने फोटोचे पूजन केले उपस्थितांमध्ये ज्योती निघोट, राजश्री गवई, परी मुंडे, कृष्णाली मुंडे, मनस्वि नींगोट, अन्वि निंगोट, हजर होते. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त मसाला खिचडी वाटप

**अमरावती**-सामाजिक समतेचा संदेश या विचारधारेवर भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सोहळयानिमित्त श्री गणेश साई गजानन मंदिर खापर्डे बगीचा येथे गजानन महाराज सेवेकरी सिंधुबाई हंसवार (संयोजक) प्रदीप शिष्टे (संचालक) चेतन राऊत (संचालक) अनिल ताटे (सेवेकरी) गजानन गुंड, विवेक गुप्ता, संजय भाऊ मकवाने,बजरंग भाऊ गोयल, रामचंद्र सेवानी, पवन दयालकर, विशाल लटाये, अनिकेत देशमुख, सतीश पत्रे, पांडे भाऊ या सर्व सेवेकरी मंडळींनी दिवसभर सेवा देऊन मोलाचे योगदान दिले! गजानन भक्त चेतन राऊत समाजवादी विचारधारा जोपासून अनेक वर्षापासून मानवतावादी कार्य करीत आहेत. सामाजिक बांधिलकी व मानवतावादी सहजीवन, बंधुभाव वृध्दिंगत होण्यासाठी गेल्या पाच वर्षापासून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अन्नदानाचा उपक्रम त्यांनी व संचालक मंडळाने सुरू केला.

### गांधी विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**बडनेरा** - गांधी विद्यालय, बडनेरा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब



आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या वंदना टिक्कस होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक दिगंबर करडे, कमल चांडक यांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण, दीपप्रज्वलन करून अभिवादन केले. प्रास्ताविकात करडे यांनी केले.ज्येष्ठ शिक्षिका गंगा भैसने यांनी 'बाबासाहेबांचे विचार हे आजच्या युवकाचे खरे धन' असल्याचे प्रतिपादन केले, तर शोभा खंडारे यांनी बाबासाहेबांवरील सुंदर कविता सादर केली. अध्यक्षीय भाषणातून प्राचार्या टिक्कस यांनी भारतीय संविधानातील महत्त्वाच्या कलमांवर आणि शिक्षण विषयक धोरणावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन अभय राऊत यांनी केले, तर आभारप्रदर्शन रितेश खुळसाम यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनिश बडगुजर, सुधीर अवघड, मिलिंद चिरडे, दीपक जाधव, सतीश गुर्जर, महेंद्र स्वामी, संदीप काळे, संजय गवई तसेच सर्व शिक्षकवर्गाचे मोलाचे सहकार्य लाभले.

### जि.प.शाळा गायवाडी येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**खल्लार** - जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी शाळा गायवाडी



येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख पाहुणे म्हणून थिलोरी केंद्राचे केंद्रप्रमुख संजय बोबडे, तसेच गायवाडी ग्रामपंचायतचे सरपंच विजय जामनिक, उपसरपंच वसंत साखरे, ग्रामपंचायत सदस्य योगेश बुंदे, शरद पाचडे, ग्रामविकास अधिकारी के बी मदने, तसेच हरिभाऊ नागे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य प्रतिभाताई भांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात आला. कार्यक्रमाला मुख्याध्यापक डी. आर. जामनिक, विषय शिक्षिका सरिता फुले, कल्पना इंगळे, अमृता दळवी, अंगणवाडी सेविका मदतनीस, स्वयंपाकी उपस्थित होते. शेवटी मुख्याध्यापक डी आर जामनिक यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### ग. भा. नभुबाई ठाकरे यांचे निधन

**कुऱ्हा**- तिवसा तालुक्यातील श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते विजय विनायकराव ठाकरे यांच्या मातोश्री नभुबाई विनायक ठाकरे यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, स्नुषा, जावाई, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. नभुबाई ठाकरे यांना सामूहीक श्रध्दांजली देण्यात आली.

# केवळ १७२ कर्मचाऱ्यांवर चालतो जिल्हा स्त्री रुग्णालयाचा कारभार

## रिक्त पदामुळे रुग्णसेवा प्रभावित



**अमरावती/का.प्र.**

स्त्री रुग्णालय (डफरिन) येथे वैद्यकीय अधीक्षक, स्त्रीरोगतज्ज्ञ, परिचारिका आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता असल्याचे समोर आले आहे. वर्ग एक ते वर्ग चारची तब्बल ८२ पदे रिक्त आहेत. या कमतरतेमुळे विशेषतः रात्रीच्या वेळी प्रसूती सेवा, आपत्कालीन उपचार आणि निदानावर गंभीर परिणाम होत असून, रुग्णांना इतरत्र रेफर तसेच खाजगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो. सद्या ४०० खाटांच्या रुग्णालयात केवळ १७२ मनुष्यबळ काम करीत असून त्यांच्यावर रुग्णालयाची मदार आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या डॉक्टरांच्या रिक्त पदांमुळे इतर डॉक्टरांवरील कामाचा भार वाढला असून याचा रुग्ण सेवेवरही परिणाम होत आहे. त्यामुळे रिक्त पदे कधी भरणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जिल्हा रुग्णालय (डफरीन) येथे शहराबरोबरच ग्रामीण भागातूनही मोठ्या संख्येने महिला प्रसूतीसाठी दाखल होत असतात. जुन्या इमारतीमध्ये आवश्यक सुविधांचा अभाव लक्षात घेता रुग्णालय परिसरात चारशे बेडची नवी इमारत उभारण्यात आली आणि या नव्या इमारतीमध्ये मागील ९ महिन्यांपासून रुग्णालयाचे कामकाज देखील सुरू झाले आहे. नव्या सर्व सुविधायुक्त या इमारतीमध्ये आता रुग्णांची संख्या देखील वाढली आहे. चारशे बेडची सुविधा असली तरी येथे प्रत्यक्षात भरती महिलांची संख्या ही साडेचारशे ते पाचशे इतकी आहे. परंतु प्रत्यक्षात येथे पदांचा अनुशेष आहे.

त्यामुळे येथे कार्यरत वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचा-यांवरील कामाचा ताणदेखील वाढला आहे. येथे रोज सरासरी २५ ते ३० महिलांची प्रसूती होते.त्यामुळे रुग्णालयातील कामाचा ताण लक्षात घेता येथील रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी होत आहे. वर्ग एक १५ पदे मंजूर असून ४ पदे भरली आहेत. ११ पदे अद्यापही रिक्त आहेत. तसेच वर्ग तीनचे १५० पदे मंजूर असताना ११८ पदे भरली आहे तर ३२ पदे रिक्त आहे. याशिवाय वर्ग चार मधील ६१ पदे मंजूर आहे. यामध्ये ३८ पदे भरली असून २३ पदे रिक्त आहेत.

| वर्गवारी | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वर्ग-१ | १५ | ४ | ११ |
| वर्ग-२ | २८ | १२ | १६ |
| वर्ग-३ | १५० | ११८ | ३२ |
| वर्ग-४ | ६१ | ३८ | २३ |

### बालरोग व स्त्रीरोग तज्ज्ञांची पदे रिक्त

जिल्हा स्त्री स्णालय येथे महिला व नवजात शिशू दाखल असतात. परंतु, असे असताना देखील येथील बालरोग तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ, बधिरीकरण तज्ज्ञ, क्ष-किरणतज्ज्ञांची पदे रिक्त आहेत. क्लास वन डॉक्टरांबरोबरच येथे क्लास टू डॉक्टरांचीही पदे रिक्त आहेत. यामध्ये मंजूर पदांची संख्या २८ असून यात १२ पदे भरण्यात आली असून १६ पदे रिक्त आहेत. याचबरोबर प्रशासकीय अधिकाऱ्याचे पद देखील रिक्त आहे.

## श्री क्षेत्र जहागीरपूर येथे खंजेरी भजनाचा कार्यक्रम

**कुऱ्हा** - विदर्भातील लाखो भाविक भक्ताचे असलेल्या श्रीक्षेत्र जहागीर पूर येथीद श्री. महारुद्र मारुती संस्थान मध्ये श्री. गुरुदेव लहानुजी भजन मंडळ चेनुष्ठा यांचा खंजेरी भजनाचा मधूर स्वारात रंगतदार असा कार्यक्रम पार पडला. या भजन मंडळाचे सक्रिय गायक सर्वश्री सुरेश आमले, शंकर उइके, गुरुदेव आमले, प्रभाकर मेहरे, सुभाष आमले, दिवाकर ठाकरे, तबलावादक आशीष सावदे (बोर्डा) हार्मोनियम चंचल भगत, मुकुंद भगत, धनराज आमले, विक्की शेळके, दिलीप आमले, वाघमारे बुवा, समस्त भजनी मंडळ चेनुष्ठा यांचा समावेश होता.ज्ञगेल्या हनुमान जयंती पर्वावर श्री.महारूद मारुती संस्थान मध्ये चैत्र महिन्यात विविध धार्मिक कार्यक्रम यामध्ये किर्तन, महा अभिषेक, काल्याचे किर्तन, दहीहांडी, तसेंव शनिवार व मंगळवार,या दिवशी सुंदर कांड, धामणगांव, रेल्वे पुलगाव येथील मंडळीचा सहभाग होता.या कार्यक्रमाला कार्यकारी विश्वस्त मंडळ, व संस्थान व्यवस्थापक सुनील भोंगाडे, मंदिराचे पुजारी व कर्मचारी यांनी व्यवस्था केली होती.

## विद्याभारती महाविद्यालयात ११ वी ऑनलाईन प्रवेश मार्गदर्शन केंद्र सुरु

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग यांचे निर्णयानुसार अमरावती महानगर पालिका सोबतच इतर शहरी व ग्रामीण क्षेत्रातील इ. ११ वी विज्ञान, वाणिज्य व कला शाखांचे सर्व प्रवेश फक्त ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. विद्यार्थी व पालकांना इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशासंबधी येणाऱ्या अडचणी लक्षात घेता त्यांना ऑनलाईन नोंदणी करणे, ऑप्शन फॉर्म भरणे, कागद पत्र अपलोड करणे इ. बाबत उचित मार्गदर्शन मिळावे या अनुषंगाने अमरावती कॅम्प परिसर स्थित विद्याभारती महाविद्यालय येथे इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. केंद्र सुट्टीचे दिवस वगळता दररोज स. ९ ते दु. १ वाजेपर्यंत सुरु असणार आहे.

विद्याभारती शैक्षणिक मंडळ, अमरावती संचलित विद्याभारती महाविद्यालय, कॅम्प, अमरावती येथे इ. ११ वी चे विज्ञान (जनरल सायन्स, कॉम्पुटर सायन्स, इलेक्ट्रोनिक्स, फिशरी, इन्फोर्मेशन टेकनॉलोजी), वाणिज्य (इन्फोर्मेशन टेकनॉलोजी, मॅथेमॅटिकस) व कला (मराठी माध्यम) इ.




अभ्यासक्रम आणि विद्याभारती इंग्लिश स्कुल व जुनिअर कॉलेज, पत्रकार कॉलोनी, रामपुरी कॅम्प, अमरावती येथे इ. ११ वी चे विज्ञान (जनरल सायन्स, कॉम्पुटर सायन्स), वाणिज्य व कला (इंग्लिश माध्यम) इ. अभ्यासक्रम आहेत. संस्थेला हिंदी भाषिक अल्प संख्यांक दर्जा प्राप्त असल्यामुळे येथील एकूण प्रवेश क्षमतेच्या ५० % जागांवर हिंदी मातृभाषिक विद्यार्थ्यांना शासकीय नियमानुसार प्रवेश मिळू शकतो.इ. ११ वी प्रवेशासंबधी संपूर्ण मार्गदर्शना करिता विद्यार्थी व पालक एच. के. सिसोदिया (९८६०१३४७८४), पवन आडगावकर (९०११३७२१५५), जे. बी. बडीये (९८९०६६१९२५), एस. पी. राठोर (९५४५९२६९२८), जी. एम. कासदेकर (८९८३०८२१७२) यांना संपर्क करू शकतात असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जामखेड बस सेवेचा यश खोडके यांच्या हस्ते शुभारंभ

**अमरावती/का.प्र.**

अमरावती मध्यवर्ती बसस्थानक येथून 'अमरावती ते जामखेड' एस.टी.बससेवेचा शुभारंभ युवा नेते यश सुलभा संजय खोडके यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळाचे अमरावती येथील विभाग नियंत्रक - सचिन डफळे, बडनेरा येथील आगार व्यवस्थापक - पवन देशमुख उपस्थित होते. याप्रसंगी अमरावती ते जामखेड या एसटी बसचे चालक व वाहक यांचा यश सुलभा संजय खोडके यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.



सध्या अमरावती ते बीड या मार्गावर सकाळी ०५.३० वा. व ०९.०० वा. अशा दोनच बससेवा सुरु आहेत. परंतु या सेवांमध्ये विलंब अथवा बिघाड झाल्यास प्रवाश्यांना बीड येथे अडकून राहावे लागते. परिणामी बीडपासून पुढे जामखेड, पाटोदा, आष्टी, करमाळा या तालुक्यांतील प्रवाश्यांना, विशेषतः वृद्ध नागरिक व मुलांना, रात्रभर बसस्थानकात मुक्काम करावा लागतो व नाहक त्रास सहन करावा लागतो. या संदर्भात अमरावती विधानसभेच्या आ.सुलभा खोडके यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांना पत्र देवून अवगत केले होते. तसेच अमरावती ते जामखेड अशी थेट एस.टी. बस सेवा सुरु झाल्यास प्रवाश्यांना बीड येथे थांबावे लागणार नाही, तसेच सकाळी नियोजित ठिकाणी वेळेत पोहोचणे शक्य होईल. यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा व मानसिक त्रास वाचेल.नागरिकांना दिलासा देण्याचे दृष्टीने अमरावती ते जामखेड अशी बस सेवा सुरु करण्याबाबत संबंधितांना योग्य ते आदेश द्यावेत, अशी विनंती आमदार महोदयांनी मंत्रीमहोदयांना केली होती. त्याअनुषंगाने मंत्री महोदयांनी राज्य परिवहन महामंडळ अमरावती विभागात संबंधिताना निर्देश दिल्याने अमरावती मध्यवर्ती बसस्थानक येथून अमरावती ते जामखेड' एस.टी.बससेवा सुरु करण्यात आली.

## मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या; चौघांना अटक

**कुऱ्हा** - येथील एका विवाहित तरुणीने सासरच्या मंडळींकडून



होत असलेल्या मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना १४ एप्रिल रोजी सायंकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गार्गी अनिकेत वैद्य (२२) हिने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. मंगळवारी सायंकाळी सुमारे पाच वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. गार्गी हिला सासरच्या मंडळींकडून सतत मानसिक व शारीरिक त्रास दिला जात असल्याची माहिती समोर आली आहे. या छळाला कंटाळून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप तिच्या माहेरच्या कुटुंबीयांनी केला आहे.याप्रकरणी गार्गीच्या भावाने कुऱ्हा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ कारवाई करत पती अनिकेत नारायण वैद्य, सासरे नारायण वैद्य, सासू तसेच नणंद यांना अटक केली आहे. घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. पुढील तपास सुरू आहे.

## राज्यातील नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण पुढे ढकला

**अमरावती/का.प्र.**

जनगणना व वाढती उष्णता याचा विचार करून राज्यातील इ. २ री ३ री ४ थी वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांना नवीन अभ्यासक्रम अंमलबजावणीच्या अनुषंगाने होणारे मे महिन्यातील प्रशिक्षण पुढे ढकलण्याची मागणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संचालक यांच्याकडे प्राथमिक शिक्षक संघटना यांनी केली आहे.

नवे शैक्षणिक वर्ष दि. १५ जून २०२६ पासून सुरु होणार असलेमुळे त्यापुर्वी नवीन अभ्यासक्रम लागू होणाऱ्या वर्गाच्या शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण होणे आवश्यक आहे. इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी च्या सर्व शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तर प्रशिक्षण नियोजन करण्यात आलेले आहे.प्रत्येक वर्गात अपेक्षित विषयांच्या निर्धारित तासिका पूर्ण होण्यासाठी दुसरीसाठी ०३ दिवसांचा आणि तिसरी व चौथीसाठी ०४ दिवसांचा प्रशिक्षण कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे.तथापी १मे ते १४ जून या कालखंडामध्ये राष्ट्रीय जनगणना कार्यक्रमाचे आयोजन देशपातळीवरून करण्यात



आले असून, या कामी राज्यातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांच्या सेवा अधिगृहीत करण्यात आल्या आहे. तसेच जनगणने संदर्भात सर्व कर्मचाऱ्यांची दोन प्रशिक्षणे होणार असल्याचे समजते.सध्या राज्यभर उष्णतेचे प्रमाण वाढले असून मे महिन्यामध्ये मोठया उष्णता वाढ होऊ शकते. सदरचे राज्यस्तरीय,जिल्हा व तालुकास्तरावरचे प्रशिक्षण ४ मे ते ३० मे या कालखंडामध्ये होणार आहे.तरी वरील गोष्टींचा विचार करता सदरचे प्रशिक्षण पुढे ढकलण्यात यावे अशी विनंती प्राथमिक शिक्षक संघटना यांच्या कडून करण्यात आली आहे.

## संत गाडगे महाराज महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**अमरावती/का.प्र.**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वलगाव येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर च्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ दिनेश निचित सर यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले . आपल्या भाषणात प्राचार्य निचित यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या तत्वांवर आधारित समाजरचना मांडली.



त्यांनी दिलेले संविधान सर्व नागरिकांना समान हक्क देणारे आहे.'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांचा संदेश आजही प्रेरणादायी असल्याचे सांगितले.महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणात डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करून सामाजिक समता शिक्षण आणि न्याय या मूल्यांचे पालन करा तसेच डॉ. आंबेडकर यांनी सामाजिक, आर्थिक व राजकीय समतेसाठी आयुष्य वेचले त्यातून मार्ग काढून पुढे दिशा दिली याबाबत सांगितले. या याप्रसंगी डॉ. संजय वाघ प्रा प्रिया खोरगडे, डॉ.भटकर, डॉ केदा, सोळंके, रौराळे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

**पोदार इंटरनॅशनल स्कूलचे १०वीतील गुणवंत विद्यार्थी**



**१५ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण प्राप्त करून बोर्ड परीक्षेमध्ये मारजी बाजी**

# ‘मृत्यूच्या उंबरठ्यावर’ उभा आहे पोपटखेड धरणाचा पूल

## जड वाहतुकीवर तात्काळ बंदीची मागणी - लघु पाटबंधारे विभागाचे परिवहन, महसूल व पोलिसांना पत्र

### - गाजीपूर-रुदाळीतील खदान-क्रशरमुळे परिस्थिती गंभीर




**अ‍ॅड. समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील पोपटखेड धरणावरील पुलावरून सुरू असलेल्या अवजड वाहतुकीमुळे मोठा अपघात होण्याचा धोका निर्माण झाला असून, या पार्श्वभूमीवर लघु पाटबंधारे विभागाने जड वाहनांना तात्काळ बंदी घालण्याची शिफारस केली आहे. प्रादेशिक परिवहन विभाग, महसूल यंत्रणा व पोलिस प्रशासनाला याबाबत लेखी पत्र देण्यात आले असून, आता प्रशासन कितपत गांभीर्याने कारवाई करते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्याशी असलेल्या पोपटखेड–रुदाळी मार्गाला जोडण्यासाठी सुमारे २० वर्षांपूर्वी हा पूल उभारण्यात आला होता. पुलाच्या माध्यमातून १० ते १२ आदिवासी बहुल गावांतील नागरिकांना अकोट शहराशी संपर्क साधणे सुलभ झाले होते. मात्र गेल्या काही वर्षांत परिस्थिती पूर्णतः बदलली आहे. सन २००८ पासून गाजीपूर व रुदाळी परिसरातील काही शेतजमिनी विविध मार्गांनी अकृषक करून त्यांचा खाणकामासाठी वापर करण्यात आला. त्यानंतर येथे स्टोन क्रशर व खदानांची संख्या झपाट्याने वाढली. परिणामी या ठिकाणांहून निघणाऱ्या मुरूम, गिट्टी व इतर बांधकाम साहित्याने भरलेली अवजड वाहने मोठ्या प्रमाणात या पुलावरून धावू लागली.

शासकीय नोंदीनुसार दररोज तब्बल १५० ते २०० जड वाहने या पुलावरून वाहतूक करीत आहेत. विशेष म्हणजे, केवळ १० टन क्षमतेचा असलेला हा पूल या ३५ ते ५० टन वजनाच्या असलेल्या अवजड वाहनांच्या भाराला तोंड देऊ शकत नसल्याने तो गंभीररीत्या क्षतिग्रस्त झाला आहे. लघु पाटबंधारे विभागाने केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्येही पुलाच्या रचनेत बिघाड झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर विभागाने इशारा दिला आहे की, तत्काळ जड वाहतुकीवर निर्बंध घातले नाहीत, तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही संबंधित विभागांकडून अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. पोपटखेड धरणावरील पूल हा ग्रामीण व आदिवासी भागासाठी जीवनरेखा असताना, खनन माफियांच्या बेफाम वाहतुकीमुळे तोच ‘धोक्याचा सापळा’ बनला आहे. प्रशासनाने तात्काळ निर्णय घेतला नाही, तर भविष्यातील दुर्घटनेची जबाबदारी कोण घेणार ? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**क्रशरधारकांनी रस्ता व पुलाची केली चाळणी**



पोपटखेड धरणाच्या पलीकडे अनेकांची शेती असून, त्या ठिकाणी जाण्यासाठीच हा पूल उभारण्यात आला होता. मात्र स्टोन क्रशर व खदानधारकांनी अवजड वाहने चालवून रस्त्याची अक्षरशः चाळणी केली असून पुलालाही मोठे नुकसान पोहोचवले आहे. या मार्गावरून जड वाहनांना तात्काळ बंदी घालावी.

**-श्याम देशमुख, शेतकरी, रुदाळी**

**आदिवासी गावांचा जीव धोक्यात**



पुलाच्या पलीकडे १० ते १२ आदिवासी बहुल गावे आहेत. मौजे गाजीपूर येथे माझी सुद्धा वडिलोपार्जित शेतजमीन आहे. त्या भागातील नागरिकांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे. शेतकऱ्यांच्या व पुलाकडील गावातील रहिवासी यांच्या सोयीसाठी बांधलेला पूलच आज धोकादायक बनला आहे. ओव्हरलोड वाहतुकीमुळे पुल क्षतिग्रस्त झाला असून, जड वाहनांना तात्काळ बंदी घालावी.

**-मनीष कराळे,** आरोग्य सभापती, नगर परिषद अकोट

# नवसारी मार्गावरील फॉर्म हाऊसमध्ये अग्नी तांडव

### २५ लाखांपेक्षा अधिकचे नुकसान



**अमरावती/प्रतिनिधीः-** नवसारी मार्गावर राजपूत धाब्या समोर असलेल्या फार्म हाऊस मध्ये गुरुवारी (दि.१६) दुपारी अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. या आगीत बांबूचे झाड आणि इतर साहित्य जळून २५ ते ३० लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. माहितीनुसार राजपूत धाब्यासमोर पंकज सुभाषराव सावरकर यांचे फार्म हाऊस आणि हॉटेल आहे. या मध्ये गुरुवारी दुपारी २.४५ वाजता अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. बांबूचे झाड असल्याने पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केले. आगीचा लोळ दिसताच सावरकर यांनी अग्निशमन विभागाला याची माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन ☞(पान २ वर)

# चाकू घेऊन दहशत पसरविणारा ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** चाकू घेऊन दहशत पसरविणाऱ्या आरोपीला गाडगे नगर डीबी पथकाने ताब्यात घेतले आहे. हर्षित प्रकाश नंदेश्वर (वय २४,गाडगे नगर ) असे अटक आरोपीचे नाव आहे. त्याच्या कडून चायना चाकू जप्त करण्यात आला आहे. माहितीनुसार गाडगे नगर डिबी पथकातील कर्मचारी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना त्यांना गुप्त



माहिती मिळाली की पीडाएमसी हॉस्पिटलच्या ☞(पान २ वर)

# विहिंप पदाधिकाऱ्याचा महिलेवर अत्याचाराचा प्रयत्न

## तिवसा येथील घटना, आरोपी फरार

**तिवसा/प्रतिनिधीः-** राज्यभरात परतवाडा येथील लैंगिक शोषण प्रकरणाची चर्चा सुरू असताना अमरावती जिल्हयात तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीने एका महिलेला वारंवार



फोन करून शारीरिक सुखाची मागणी केल्यानंतर पीडित महिला जेव्हा आरोपीला जाब विचारण्यासाठी गेली, तेव्हा तिच्यावर त्याने अत्याचाराचा प्रयत्न केला. रुपेश राऊत (वय ५०, रा. गुरूदेवनगर) ☞(पान २ वर)

**घर घ्यायचे असल्याने झाली होती ओळख**

काही वर्षांपुर्वी पतीचे निधन झाल्याने पीडित महिला ही दोन मुलांसह गुरूदेव नगर येथे वास्तव्याला असून किरकोळ व्यवसाय करते. घर घ्यायचे असल्याने काही वर्षांपुर्वी तिची आरोपी रुपेश याच्या सोबत ओळख झाली. या ओळखीचा गैरफायदा घेत आरोपीने पीडित महिलेशी मोबाईलवर अश्लील संभाषण केले. महिलेने त्याचे घर गाठून विचारणा केल्यावर आरोपीने अत्याचाराचा प्रयत्न केला. या झटापटीत महिलेचे मंगळसूत्र तुटून पडले. तिने आरडा ओरड करून स्वतःची सुटका करून घेतली. पोलिसांनी या प्रकरणी आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल केला असला, तरी त्याला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. याविषयी आश्चर्य व्यक्त केले जात आहे. एका संघटनेचा पदाधिकारी असल्याने त्याला अभय दिला जात आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

# धामणगाव मतदारसंघात काँग्रेसचे ‘संघटन सृजन अभियान’

**कार्यकर्त्यांच्या मुलाखतींनी चांदुर रेल्वेत उत्साह**

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची पाळेमुळे तळागाळापर्यंत अधिक घट्ट करण्यासाठी आणि आगामी आव्हानांना सामोरे जाण्यासाठी राज्यभर ’संघटन सृजन अभियान’ राबविले जात आहे. याच अभियानाचा एक भाग म्हणून आज चांदूर रेल्वे येथील आनंद सभागृह येथे धामणगाव विधानसभा मतदारसंघाची अत्यंत महत्त्वाची आढावा बैठक आणि



कार्यकर्ता मेळावा पार पडला. या मेळाव्याला मिळालेला ८०० हून अधिक कार्यकर्त्यांचा प्रतिसाद पाहून काँग्रेसची या मतदारसंघातील पकड किती मजबूत आहे, याची प्रचिती पुन्हा एकदा आली.

या कार्यक्रमाला माजी मंत्री तथा आमदार यशोमती ठाकूर यांनी विशेष उपस्थिती लावून कार्यकर्त्यांना विजयाचा मंत्र दिला. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या की, ’काँग्रेस हा केवळ पक्ष नसून ती एक विचारधारा आहे. आजच्या ☞(पान २ वर)

# परतवाडा प्रकरणातील आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करा

## महिला काँग्रेस कमिटीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा येथे समोर आलेल्या लैंगिक शोषण प्रकरणामुळे संपूर्ण जिल्ह्यात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. संबंधित आरोपीला अटक करण्यात आली असली तरी या प्रकरणातील सर्व पैलूंची सखोल, निष्पक्ष व जलद चौकशी करून दोषींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने आज गुरुवार १६ एप्रिल रोजी



जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, या प्रकरणातील सर्व पीडिताना त्वरित न्याय मिळावा तसेच त्यांच्या सुरक्षेची, सन्मानाची व गोपनीयतेची पूर्ण हमी प्रशासनाने द्यावी. तपास प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा राजकीय किंवा इतर दबाव येऊ न देता पारदर्शक पद्धतीने चौकशी पूर्ण करण्यात यावी. या अत्यंत संवेदनशील ☞(पान २ वर)

## अमरावती ते जामखेड बस सेवेचा शुभारंभ

# प्रवासी सेवा अधिक सुलभ व गतिमान होईल - यश खोडके

**अमरावती/प्रतिनिधीः-** बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीद वाक्य घेऊन प्रवाशांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असलेल्या महाराष्ट राज्य परिवहन महामंडळाची सेवा दिवसेंदिवस अधिक सुलभ, गतिमान व आरामदायक होत चालली आहे. गाव -खेडे जिल्हे -तालूके एक एकमेकांशी जोडण्यात बससेवेचे फार मोठे महत्व असून यातून केवळ ☞(पान २ वर)



# नवसारीत आदिवासींच्या ६० पेक्षा अधिक झोपड्या पाडल्या

### पीडित कुटुंबीय धडकले जिल्हाधिकारी कार्यालयावर



**अमरावती/प्रतिनिधीः-** नवसारी रिंग रोड मार्गावर राजपूत धाब्यासमोर राहणाऱ्या ६० ते ७० आदिवासींच्या झोपड्या आज गुरुवार १६ एप्रिल रोजी मनपा पथकाने कारवाई करून पाडल्या. त्यांच्या सामानाची नासधूस केली. यामुळे संतप्त आदिवासी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले आणि त्यांनी न्यायाची मागणी केली. त्यामुळे येथे तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. माहितीनुसार राजपूत ☞(पान २ वर)

# महात्मा बसेश्वर जयंती उत्सव उद्यापासून

## तीन दिवस विविध कार्यक्रम,शोभायात्रा निघणार



**अमरावती/प्रतिनिधीः-** वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही महात्मा बसेश्वर जयंती उत्सव उत्साहाने साजरे करण्यात येत आहे. या निमित्त १८ ते २० एप्रिल पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन अंबागेट येथील मृगेंद्र मठ संस्थान मध्ये करण्यात आले आहे. उत्सव अंतर्गत १९ एप्रिल रोजी सायंकाळी भव्य शोभायात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती आज गुरुवार १६ एप्रिल रोजी पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली. त्यांनी सांगितले की, १८ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता भजन संध्या आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये सारेगामा लिटिल चॅम्प फेम हभप सार्थक गायकवाड यांची भजन संध्या होणार आहे. सार्थक गायकवाड यांना पखवाज वादक अक्षर चव्हाण, वासुरी वादक जगदीश ☞(पान २ वर)

# आधारभूत योजनेतंर्गत ज्वारी, मका खरेदीची नोंदणी प्रक्रिया सुरु

### शेतकऱ्यांनी तातडीने नोंदणी करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यामध्ये रब्बी हंगाम २०२५-२६ अंतर्गत ज्वारी, मका खरेदी करण्यासाठी किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत दहा खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे.

अचलपूर, मोर्शी, वरूड, नांदगाव खंडेश्वर, चांदुर बाजार, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, चांदूर रेल्वे, तिवसा, धामणगाव या केंद्राच्या तालुका खरेदी विक्री संघाचा समावेश राहील. हमी भावाने खरेदीसाठी नोंदणी कालावधी ३० एप्रिल २०२६ पर्यंत राहील. तसेच तुर, चना पिकाच्या खरेदीसाठी आवश्यक बारदाना लवकरच उपलब्ध केल्या जाईल व खरेदी केंद्र पूर्ववत कार्यान्वित होतील ☞(पान २

# अचलपूर येथे तीन दिवसीय भव्य पालकमंत्री चषक विदर्भ केसरी कुस्ती स्पर्धेला प्रारंभ

### -माजी खासदार रामदास तडस,आ.प्रवीण तायडे,संजय तीरथकर,अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने यांच्या सह मान्यवरांची उपस्थिती

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर येथे विदर्भातील मल्लांसाठी प्रतिष्ठेची पालकमंत्री चषक ३८ वी विदर्भकेसरी कुस्ती स्पर्धेला १६ एप्रिलपासून प्रारंभ झाला आहे. तीन दिवस विदर्भ केसरी कुस्ती स्पर्धेला कालपासून आयोजित करण्याचा मान यंदा जिल्ह्यातील अचलपूर शहराला मिळाला. मॅटवर सर्वच गटातील

**विजेत्याला मोटारसायकल, चांदीची गदा**

कुस्ती स्पर्धा रंगत आहेत. यावेळी उद्घाटक ☞(पान २ वर)



# आज रंगणार बुद्ध-भीम गीतांची बहारदार मैफील

### समाज कल्याण विभागाचा पुढाकार

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाचे औचित्य साधून आयोजित ’सामाजिक समता सप्ताहा’ निमित्त प्रबोधनात्मक कार्यक्रमाची मेजवानी मिळणार आहे. समाज कल्याण विभाग, अमरावतीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे बुद्ध-भीम गीतांच्या बहारदार मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात शुक्रवार, दि.१७ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतीय संविधानाचे शिल्पकार नव्हते, तर ते समता, न्याय आणि बंधुतेचे प्रणेते होते. समाजातील अस्पृश्यता, जातीयता आणि भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. महिला आणि कामगारांच्या ☞(पान २ वर)